नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

[यु]गवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

संपादक

वा. ना. देशपांडे

[ए]प्रिल-मे १९४८

किंमत १२ आणे

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

यु ग वा णी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ
अमरावती (वऱ्हाड).

★ एप्रिल-मे अंक ★

अनुक्रमणिका

* * *

युगवाणी

पायदळ !

होतें भरवित बाळा !
 काउचिऊचे मी घास
होतें खेळत-माळत
 माझें जेवित पाडस ! १

घास घेतांना हळूच
 दूर पदर करून
करी चिमणें वदन
 अधिमधि स्तनपान ! २

होतें दार टेकून मी
 बसलें ग आडोशाला
पायदळ होऊं नये
 म्हणून ग लडिवाळा ! ३

माझी कराया गंमत
 अवचित येणं केलं !
बाळजेवण थांबलं
 झाला गडे पायदळ ! ४

—ना. मा. सरपटवार

अनुक्रमणिका

स्वर्गामधली कुणी अप्सरा

स्वर्गामधली कुणी अप्सरा
मोहविते ती मज जादूने
नेणिवेंतल्या नवदुनियेंत
फुलती अंतरि मधुर स्वप्नें !

रेंगाळति जे सुस्वर दूर
कधी न आले वास्तवतेंत
निद्रेच्या या रंगभूमिवर
देह तयांचे होती मूर्त !

अंतरांतल्या गूढ भावना
जागृतींत नच त्यांचें विकसन
घेउनिया त्या रूप पऱ्यांचें
स्वप्नभूमिवर करिती नर्तन !

जीवा लागे कसली ओढ ?
कुणासाठि हें मन हुरहुरतें ?
कल्पनेंतली रम्य देवता
स्वप्नांमधुनी प्रकटुन हसते !

नाहित फसव्या या मधुसृष्टिंत
आकांक्षांचे भग्न मिनार
परी चुंबिती ते गगनाला
जादूचे हे किमयागार !

जरी निमाल्या हृदिंच्या आशा
वाट्या आलें उदास जीवित,
जगेन मी या स्वप्नांवरती
जीवितांतल्या तिमिरा उजळित

● —मा. रा. मोहोळकर

अनुक्रमणिका

मंजुळ मैना

★

बोलकी मैना–
सुरेल वीणा
पक्षांची राणी
पक्षांत दैना
माझी सगुणा–
मंजुळ मैना ! ! १

स्वैर विहारी
सुख न कांही
गुणी पाखरा
किंमत नाही
त्रासी ससाणा–
मंजुळ मैना ! ! २

किती सुन्दर– !
तूं काळी राणी
गाणी गात जा
अमृत वाणी !
घेत जा ताना–
मंजूळ मैना ! ! ३

ऐनक नेत्रीं
रौप्य किनारी
पैठणी काळी
शुभ्र झालरी
स्वर्ण वदना–
मंजूळ मैना ! ! ४

घरटें न हे
पिंजरा नामी
भोग विलास
ऐष आरामी
झुला पाळणा–
मंजूळ मैना ! ! ५

खाया न वाण
विविध फळं
स्नानास पाणी
ताजें शीतल
मिळे कां वनां ?
मंजूळ मैना ! ! ६

आतां कशास–
राना बनांत
शोधाया घास
दऱ्या खोऱ्यांत
भोगशी दैना ! ! ७

सुखाने रहा
आपलें घर
समजून हें
हो सर्वो प्यार !
हीच याचना–
मंजूळ मैना ! ! ८

—तु. ना. काटकर

वेड्या पाखरास

पाखरा ! जाऊं नको रे दूर
विश्वाच्या या विशाल अंगणिं
लावुन मज हुरहूर—
आकाशाच्या अवकाशांतुनि
घेइ भराऱ्या धुंद होउनी
सुवर्णकिरणा गानें भरुनी
करिशिल त्यांना चूर १

निळ्या नभामधि वायूलहरी
खेळ कराया येतिल सत्वरि
तोल आपुला तूंच आवरी
होइल की काहूर २

केव्हा कोठे सायंकाळीं
मेघमालिका काळी काळी
कडाडेल अन् वीज वादळी
प्रलयाचा जणु नूर ३

अथवा अंधाऱ्या रात्रींतुनि
उंच उंच जरि जाशिल गगनीं
नेइल तुजला तरी वाहुनी
स्वर्गंगेचा पूर. ४

भेटो तुजला पहाट-वारा
शुक्राचा पूर्वेस पहारा
आम्रवृक्ष तुज चित्त-निवारा
देइल कोकिल सूर ५

—चन्द्र सापत्नेकर

हृदय-द्वीप

—द. चिं. सोमण

मृत्तिकामय अति विशाल गरगरत्या
भूगोलावर
सप्त-सागरांच्या पलीकडे दूर कुठेसें होतें
द्वीप सान एक !
जलयानस्थ मानव सदा
बघत लक्ष्यून उत्सुकतेने
काढिती उद्गार,
हृदय-द्वीप चिमुकलें छान
तें पहा तें तेथे !
होतें आकाराने हृदयासारखें हृदय-द्वीप

रक्तकमलाच्या रंगाची मृत्तिका
होती द्वीपावर रंगवीत त्यास
करीत सार्थ अभिधान त्याचें
‘ हृदय-द्वीप ! ’
–जणु कुणाचे शुष्क हृदय ठेविलें होतें
जलांत निळ्या कराया आर्द्र
निसर्ग—देवीने ! !
उजाड होतें हृदय–द्वीप
मानव–पद–स्पर्श पारखा
होता तेथील मृदु भूमीस !

जिंकून धरा अनेक जेते
येतां जिंकाया भू--भाग तेवढा
अचूक होती
पूर्ण पराभूत ! तात्काल जित ! !
द्वीपाच्या नजीक येतां तयांची
भव्य गलबतें
उभारून शीडें, कापीत जल, घेऊन वीर,
घेऊन पेट जागच्या-जागीं
होती भस्मसात !
जळून रक्षा वीरहि होतां

किंकाळ्या फोडीत टाकिती उड्या
अथांग जलीं दाह विझवाया
पडली परंतु राखेचे कण पर्जन्यापरी
निळ्या जलावर !!
द्वीपावरून आणिक येती गंभीर शब्द
अर्थ तयांचा कुणां न कळे,
द्वीपाची भाषा दुर्बोध होती
मानवांस साऱ्या !
कधीं दुरून करितां वर्षाव सम्राट् कोणी
अग्निगोलकांचा

वरच्यावर बदलून दिशा
गोलक जाती मागे परतून
कराया संहार
गति-दात्यांचाच ! .
अद्भुत शक्ति द्वीपांत होती !
अनेक नृपती बलाढ्य, शूर ।
महत्त्वाकांक्षी
तेजांत येऊन तमांत गेले
व्हावया अखेर कायमचे गुत
'हृदय-द्वीप' तथापि राहिलें

तसेंच अजिंक्य !!

× × ×

अनेक वर्षे आलीं नी गेलीं
आणि नंतर—

× × ×

अति विशाल गरगरत्या
भूगोलावर
सप्तसागरांच्या पलीकडे दूर कुठल्याशा देशीं
कुटी एक सान समुद्रकाठीं !
कुटींत त्याच जन्मास आला योग्य काळीं कुणी
मानव एक ! अत्यंत सुरूप !!
अनेक वर्षे आलीं नी गेलीं

मानव आला यौवनांत आणि.
लागला दिसाया अधिक देखणा
विशाल निळे स्वप्नमग्न नेत्र बघून त्याचें
वदती जिव्हा
' कवि हा खरा–

‘ म्हणूनच बसे तासन् तास निरखित कुठे
‘ एखादें पुष्प !
‘ कवि म्हणूनच असा गुणगुणे कांहीतरी गोड
‘ भ्रमरांच्या संगें, कुठे उद्यानांत !
‘ कवि म्हणूनच लोचन याचे भरून येती

‘ पहातां दु:खित समोर कुणी !
‘ कवि म्हणूनच चढून शैल
‘ हृदय-द्वीप पहात उभा रहातसे हा
‘ कितितरी वेळ विसरून क्षुधा तृषा आणखी !
‘ कवि हा खरा—कळे नच परि
‘ कशास आसवें साठवी आपुली उंच धातुपात्रीं ?
‘ कशास तराफा तयार करीत
बसे अलिकडे एकीकडे हा !!
—कवीच पण–!!! ’

× × ×

उगवला दिन आणिक अखेर

एक स्मरणीय !!
आकाश-हृदय-आरक्त सविता
आला जों न वर पुरतेपणीं
गातच उठला कुटीं-कवि तो
आणि धांवला तराफ्याकडे
घेऊन आपलें अश्रूंचें पात्र
आणिक सुमनें मिळालीं तितकीं–!
धांवले जनहि चकित मागून !!
मंत्रमुग्ध जणू झाले होते सारे !!
पुष्पांनी आपुला सजवून छान

तराफा सान
आ(। घेऊन अश्रूपात्र तें
निघाला कवि !
निवाले जन दिसली ती नौका
हाकारीत मागे !!

* * *

लागले दिसाया हृदय-द्वीप
भास्कर जेव्हा लागे तळपाया
माथ्यावरती
भंगली तंद्री निमिषीं जनांची
जेधवा हो ध्वनि भयद गंभीर
प्रगटलेल्या झंझावातांतून

“ थांबा जन सारे—व्हाल भस्मरूप ! ”
आणिक फिरल्या थांबल्या नौका
कवीचा तराफा जलावरती घसरत परी

चालला पुढे-पुढे—पुढेच !
उठला कल्लोळ जनमेळ्यांतून
" फिर, फिर, मागे !— अरेरे !
मूढ होणार राख ! "

* * *

परंतु जन झाले विस्मित चार क्षणांतच !
मधुररव यावया लागला द्वीपावरून
सुस्वागतार्थ कुटी-कवीच्या
उग्र झंझावात जाहला शांत

जाहल्या शांत उन्मत्त लाटा
—आणिक लागला तराफा द्वीपा !
अश्रूपात्रांतील आसवें आपुलीं
आणि फुलांच्या ओंजळी चार
टाकितां कवीने द्वीपभूवर
हृदयद्वीपीं पाहतां पाहतां
तरू लतिकांची जाहली व्याप्ति
उमलून पुष्पें विविध रंगांचीं
निस्तुल नटलें हृदय-द्वीप
सुगंधित वातें वेष्टून टाकिला

दूरचा जमाव !
चारी दिशांतून भर माध्यान्हीहि
पक्षांचे थवे करीत मंजूळ किलबिलाट
द्वीपावर आले
जाहली जनता अत्यंत विस्मित
कुटी-कवीचें पाहून स्वागत !
सहज जग ! !

* * *

जणू कवीचा तराफाच तो पुष्पमंडित—
निघालें डौलांत
हृदय-द्वीप

निळ्या जलावर हळू घसरत
आणि जाहले
दिसेनासें अंतीं
सम्राट आपुला-घेऊन सर्व

* * *

-परतले जन बावरलेले झालेले विस्मित ! !

* * *

पुन्हा न कोणा दिसलें कुठे तें
हृदय-द्वीप
विशाल सागरीं ! ! !

अनुक्रमणिका

गेय कविता

वि. ज. सहस्रबुद्धे

● 'गेय' शब्द आपल्याकडे कांहीसा शिथिलतेने वापरण्यांत येतो. पण 'गेय' म्हणजे 'सताल गेय'चा होय, हा मुद्दा मिरजचे रा. सहस्रबुद्धे यांनी या लेखांत मांडला आहे.

★

कवितेच्या चर्चेत 'गेय' हा शब्द अनेक वेळां वापरला जातो. परंतु त्याचा निश्चित अर्थ काय समजावयाचा, याबद्दल शंका उत्पन्न होत असते. छन्दः शास्त्रांत वापरण्यांत येणाऱ्या पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या ठरल्या असल्या, म्हणजे वादास फारशी जागा रहात नाही. मराठी छन्दः शास्त्राची अजून पूर्णता झाली नसल्याने पारिभाषिक शब्दांच्या अर्थाबद्दल मतभेद होणें साहजिक आहे. 'गेय,' 'ताल,' 'लय,' 'गण' इत्यादि कांही पारिभाषिक शब्द वादग्रस्त आहेत, असें दिसून येईल. म्हणून 'गेय' या शब्दाची चर्चा करण्याचें मी आज योजिलें आहे.

बॅ. सावरकर यांनी 'राजफुलें' या पुस्तकास जोडलेल्या परिशिष्टांतील लेखामध्ये 'गेय' हा शब्द अनेकवार वापरला आहे. वैनायक वृत्ताचा विशेष सांगतांना ते म्हणतात की, 'हें वृत्त पाठ्य असल्यामुळे गद्याप्रमाणें आवेश, उद्वेग, प्रभृतींचे रसानुसारी ध्वनी इतर गेय वृत्तांपेक्षा अधिक सहज स्वरेनें बदलून या वृत्तांत 'ताल' संभाळूनहि व्यक्तवितां येतात. × × × हें वृत्त गेय नसून पाठ्य वाच्य आहे."

बॅ. सावरकर यांच्या वरील अभिप्रायावरून 'ताल' व 'गेय' यांचा परस्पर—संबंध दिसत नाही. कारण वैनायक वृत्त 'गेय' नसलें, तरी एक प्रकारचा 'ताल' वैनायक वृत्तास आहे, असें स्पष्ट होतें. वैनायक वृत्त 'गेय' नसलें, तरी 'सुरेल' म्हणतां येते, असें सुद्धा सावरकर म्हणतात.

हें एका बाजूचें मत निर्दिष्ट केलें.

आता, याच्या विरुद्ध असलेल्या बाजूचा विचार करूं.

'मौज' पत्राचा दिवाळी अंक सन १९४६ यामध्यें 'प्राचीन मराठी पदें' या विषयावर रा. वामन नारायण देशपांडे यांनी एक उद्बोधक लेख लिहिला आहे. त्या लेखांत 'गेय' हा शब्द त्यांनी वापरला आहे. सबब त्यांच्या लेखांतील कांही वाक्यें याखाली उध्दृत करतों:—

" पद हा शब्द प्रायः स्फुट व गेय रचनेस लावतात पदें ही गेय असतात, किंबहुना, गाऊन दाखविण्यासाठींच त्यांची निर्मिति झालेली असते. प्राचीन मराठी पदांचें ' गेय काव्यें ' या दृष्टीने फार महत्त्व आहे. अभंग हे ताल-सुरांत बसवावयाचे, तर त्यांची अल्प-स्वल्प ओढाताण केल्यावाचून भागत नाही. पदांचें तसें नसलें. ती गेयता घेऊनच जन्मास येतात. "

—याप्रमाणें देशपांडे यांचें म्हणणें आहे.

तालाचा संबंध गेय रचनेशीं आहे, या विधानाच्या पुष्ट्यर्थ कविवर्य साधुदास यांचें मत त्यांच्या ' मराठीची सजावट ' या पुस्तकांतून देतों, तें असें.—

" मराठी अस्सल मात्रावृत्तें उर्फ पदें हीं वाचण्यापेक्षा म्हणण्याच्या (गाण्याच्या) उद्देशाने बनवलेलीं आहेत. अर्थात् त्यांचा गायनांतील तालाशीं आधिक बंध येतो. "

क. न. चिं. केळकर यांनी छंदोरचना पुस्तकावर समालोचनात्मक लेख लिहिला होता, त्यांत — " अक्षरगणवृत्त हे जातिप्रकाराइतकें (म्हणजे मात्रावृत्ता-इतकें) ताल-वश होत नाही, म्हणून त्याची गेयता त्या मानाने कमीच असते "— असें ते म्हणतात.

येणेप्रमाणे रा. देशपांडे, साधुदास व तात्यासाहेब केळकर या तिघांचीं मतें असून त्यांचा एकत्रित विचार केला, तर तालाशी गेयतेचा अपरिहार्य संबंध असल्याचें ठरत आहे व ताल म्हणजे संगीतांतील ' ताल ' ही गोष्टसुद्धा स्पष्ट होणार आहे.

प्रा. माधवराव पटवर्धन यांचें म्हणणें याबाबतींत काय आहे, तेंहि पाहिलें पाहिजे. कारण छंदः शास्त्रविषयक चर्चेमध्ये त्यांच्या मताला विशेष महत्त्व आहे.

' पद्यप्रकाश ' मध्ये पान ५१ येथे प्रा. पटवर्धन यांनी सांगितलें आहे कीं,

" जाति-रचना ही बहुतांशीं गेय आहे.. आणि गाण्यांत ज्याला जो चरण वा चरण-विभाग आवडेल, तो तो घोळून घोळून म्हणतो. "

अनावर्तनी वृत्ताच्या विवेचनांत प्रा. पटवर्धन हें ' ताल ' शब्द वापरतात, म्हणून त्यासंबंधींचीं वाक्यें खालीं देतो:—

" गवई हा अनावर्तनी वृत्तसुद्धा जुळवून घेऊन तालांत म्हणूं शकतो " — ' पद्यप्रकाश, ' पान १३.

" जें गायकी पद्धतीने तालांत म्हणतां येतें, पण जें तसें बसवावयाला परिश्रम घ्यावे लागतात, तथापि ज्याची नेहमीची चाल परंपरेने चालत आल्याने सुकर वाटते, त्या वृत्ताला अनावर्तनी वृत्त म्हटलें आहे. "—' पद्यप्रकाश, ' पान १७

' गेय ' आणि ' ताल ' हे शब्द कोणत्या प्रसंगीं कसे वापरले आहेत, ही गोष्ट वरील अवतरणांवरून कळून येत असून त्या सर्वांचा मिळून विचार केला, तर संगीतांतील तालांत सरळ रीतीने जें म्हणतां येतें तें गेय होय, असा अर्थ प्रा. पटवर्धन यांस अभिप्रेत आहे असेंच वाटतें.

' सह्याद्रि, ' आगष्ट १९४० च्या, अंकामध्ये प्रा. जोगळेकर यांनी ' अपभ्रंश मराठीवृत्तें ' नांवचा एक लेख प्रसिद्ध केला आहे. तो लेख प्रा. वेलणकर यांच्या मूळ इंग्रजी लेखाचा अनुवाद आहे. या लेखांत ओवीच्या गेयतेसंबंधीं विस्तृत लिहिलें आहे. त्यांतील एक उतारा घेण्यासारखा आहे तो असा:—

" ज्या तालबद्धतेमुळे चरणाच्या लांबीचें आतापर्यंत नियंत्रण होई, तें तालबद्धतेचें नियंत्रण वाङ्मयीन स्वरूपांतील ओवीवर आता चालेनासें झालें. अशा रीतीने मूळची तालगेय असलेली ओवी तिच्या वाङ्मयीन स्वरूपांत स्वरगेय झाली.

अपभ्रंश कवींनी तालगेय वृत्तें म्हणजेच मात्रा–वृत्तें निवडली × × × त्यांनी तालाचें नियंत्रण मोठ्या आनंदाने स्वीकारलें × × × ज्या मराठी कवींनी ओवीला लेखी ग्रांथिक स्वरूप दिलें, त्यांनी तिची तालबद्धता नाहीशी केली × × ×

या उताऱ्यांत 'तालगेय' आणि 'स्वरगेय' असे भिन्न शब्द वापरले आहेत. वास्तविक विचार केला, तर 'गेय' या शब्दामागे 'ताल' अथवा 'स्वर' हा शब्द जोडण्याचें कारणच नाही. 'गेय' म्हटलें, म्हणजे त्यावरून ताला–सुरावर गातां येण्यासारखें आहे, तेंच खरोखर 'गेय' या अन्वर्थक संज्ञेस पात्र ठरूं शकतें. त्याकरतां निराळा खुलासा करण्याची आवश्यकताच राहत नाही.

बहुतेक मात्रावृत्तें (म्हणजे जाति) गेय आहेत व गेय आहेत व गेय आहेत याचाच अर्थ 'सताल' आहेत. जातीमध्यें चरणान्तीं अथवा चरणाच्या अन्तर्भागांत एखाद्या ठिकाणीं विश्रान्तीने किंवा आलापानें मात्रा भरून काढाव्या लागतात त्या तालाचें आवर्तन पुरे करण्यासाठीच होत. तात्यासाहेब केळकर यांनीं 'चाल' या शब्दाचा खुलासा करतांना म्हटलें आहे कीं,

"पुष्कळवेळां तितक्याच मात्रागण संख्येचीं पद्यें असतांहि केवळ चाल वेगळी म्हणून वेगळी वाटतात, पण 'चाल' ह्या शब्दांत नुसता 'ताल' नसून संगीत स्वर–रचना हि असते. यामुळे वेगळेपणा दिसतो. परंतु तो खरा नव्हे."

(छंदोरचना-समालोचन)

यावरू पद्य, चाल, ताल, संगीत स्वर–रचना–या गोष्टींचा कसा, किती परस्पर संबंध आहे हें कळून येईल.

आणखी एक मुद्दा विचार करण्यासारखा आहे. 'गेय' हें शब्द नुसता म्हणजे केवळ एकटा स्वतंत्रपणें वापरला जात नाहीं. तो विशेषण स्वरूपानेच येत असतो, गेय कविता, गेय पद्य, गेय ओवी, गेय अभंग,—अशा प्रकारें जोड शब्दप्रयोग होऊनच 'गेय' शब्द बहुधा दृष्टीस पडतो. अशा ठिकाणीं गेय याचा अर्थ कोणता अभिप्रेत असतो, हेंच मुख्यत: पाहावयाचें असतें. उदाहरणाने विशेष स्पष्टता करूं. रा. वामन नारायण देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणें अभंग 'गेय' नाहींत; एक अभंगच देतो.

"सुंदर तें ध्यान। उभे विटेवरी। कर कटावरी ठेवूनिया॥ हा अभंग तालांत बसवून म्हणावयाचा झाल्यास अक्षरांच्या उच्चाराची ओढताण करावी लागते. आता जातींतील एक पद्य घेऊन तुलना करतों:—

"लग्नाला जातों मी द्वारकापुरा" हें सौभद्रांतील पद्य गेय आहे, म्हणजे तालाच्या मात्रागणानुसार या मधील शब्द रचना सोयीची झालेली आहे. तसें म्हटलें, तर गद्यसुद्धा संगीत स्वर–रचनेंत म्हणून दाखवितां येतें. परंतु तें दिखाऊ गेय झालें. नुसती संगीतांतील एखाद्या रागाच्या स्वरांत अक्षरें म्हणून दाखविल्याने त्याला गेयता प्राप्त होणार नाही. त्याबरोबर त्या अक्षरांची रचना विवाक्षित तालाच्या मात्रा–गणाला अनुसरुन अशी स्वाभाविक पाहिजे.

असो. एकंदरींत पाहिलें असतां हेतुपुर्वक गेय हा शब्द वापरला जातो, त्या वेळीं 'सताल गेय' हाच त्याचा निश्चित अर्थ समजणें जरूर आहे. एरव्ही केवळ गेय या शब्दाला अन्वर्थकपणा तो काय ? तालमात्रानुसार शब्दरचना असलेल्या पद्यालाच गेय म्हणता येईल, म्हणजेच तें स्वभावत: गेय असूं शकतें.

गेयतेच्या दृष्टीने 'ताल' म्हणजे संगीतांतील ताल व तालाची अंगभूत लय, तीच 'लय' होय; तेव्हा त्या दोन शब्दांच्या अर्थाबद्दल आता स्वतंत्रपणें विवेचन करण्याचें कारण राहिलेंच नाही. ●●●

पं. द्वारकाप्रसाद मिश्र

विनायक वामन करंबेळकर, एम्. ए.

● वऱ्हाड-मध्यप्रांताचे गृहमंत्रि पं. द्वारकाप्रसाद मिश्र हे जसे राजकारणपटु मुत्सद्दी आहेत, तसेच श्रेष्ठ दर्ज्याचे साहित्यिकहि आहेत. त्यांचें 'कृष्णायन' हें हिंदी महाकाव्य चांगलेंच गाजलें. मा. पंडितजींचा हृद्यंगम परिचय नागपूरचे तरुण साहित्यिक रा. करंबेळकर यांनी या लेखांत करून दिलेला आहे.

★

निन्दन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु ।
लक्ष्मी:समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ।।
अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा ।
न्याय्यात्पथ: प्रविचलन्ति पदं न धीरा: ।।

भारतवर्षाला स्वातंत्र्याची देणगी मिळाली आणि त्यानंतर कांहीं दिवसांतच वादळी वारे वाहूं लागले. अशांतता उन्मत्त झाली; हिंसेचें उग्र थैमान सुरू झालें; आणि नाना प्रकारच्या किंवदन्तींनी लोक घाबरून गेले. मतामतांचा गलबला होऊन कोणी कोणाला विचारीत नाही, अशी स्थिति प्राप्त झाली. संप, दंगेधोपे, जाळपोळ, अत्याचार, उत्पात चळवळी वगैरे गोष्टींना ऊत येऊन, "आम्हाला हेंच स्वातंत्र्य मिळालें काय! ब्रिटिश राजवटीबरोबर स्वास्थ्य व शान्तता यांनाहि 'चले-जाव' करण्यांत आलें काय?—" असें लोक आपसांत बोलूं लागले. या परिस्थितींत कसा निभाव लागणार, म्हणून सर्वत्र चिन्ता पसरली असतांना ज्यांनी मध्यप्रांत विदर्भाची राज्यनौका भयावह झंझावातांतून मोठ्या कुशलतेने चालविली आहे, त्या गृहमंत्रि पं. द्वारकाप्रसाद मिश्रांचा परिचय या प्रांतांतील प्रत्येक व्यक्तीस आहेच. लोकनेतृत्व, यशस्वी राजकारण पटुत्व व साहित्य निर्मातृत्व या तीन गुणांमुळे आपल्या प्रांतांतच काय, पण साऱ्या भारतवर्षांत पंडित मिश्रांचें नांव विख्यात आहे. एवढ्या राजकार्यधुरंधर व्यक्तीचा परिचय कसा लिहावा हा एक मोठाच प्रश्न आहे. सुपरिचित व्यक्तीचा परिचय कसा लिहावा!

राजकारणाच्या या क्रान्तियुगांतून भारताच्या सर्वच नेत्यांना जावें लागलें. कायदेभंग, कारागृह, मुक्तता, पुन्हा सत्याग्रह अशा चक्रनेमिक्रमांतून पार पडून

लोकादरास व विश्वासास पात्र झाल्यावरच कांही लोकनायकांना अधिकारग्रहण करावा लागला. पं. द्वारकाप्रसाद मिश्र अशाच पुढाऱ्यांपैकी एक असून आजचें त्यांचें गृहमंत्रिपद लोकादराचें व विश्वासाचें निदर्शक आहे. विद्यार्थी दशेंत असतांनाच त्यांनी राजकारणांत उडी घेतली व त्यांत सहन करावे लागणारे आघात–प्रत्याघात सहन करून, कधी तुरुंग तर कधी मोकळीक; कधी अधिकार तर कधी बंदिवास– अशा मार्गानें ते गृहमंत्रिपदावर आरूढ झाले.

प्रथम दर्शन—

ज्यावेळीं पं. मिश्रांनी अधिकार–स्वीकार केला नव्हता, म्हणजे १९३७ पूर्वी, त्यावेळीं महाकोशलमधील लोकांना त्यांच्याशीं प्रत्यक्ष परिचय करून घेण्याचे योग लाभत असत. परंतु १९३७ सालीं त्यांनी राजकाजाची अवघड धुरा पत्करली, त्यानंतर १९४२ च्या क्रांतियुद्धांत त्यांना लांब मुदतीच्या तुरुंगवासांत जावें लागलें व तेथून बाहेर पडल्याबरोबर लगेच त्यांना राजकार्याच्या गाड्याला जुंपून घ्यावें लागलें. त्यामुळे आपल्या प्रांतांतील लोकांना गेल्या दहा बारा वर्षांत त्यांचीं भाषणें ऐकण्याचे फारच थोडे प्रसंग आले असतील. १९४६ पूर्वी मीं तर त्यांना प्रत्यक्ष पाहिलें देखील नव्हतें. वर्तमानपत्रांतून त्यांच्याविषयीं जो काय मजकूर येत असे, त्यावरून त्यांना प्रत्यक्ष पाहण्याचें व त्यांचें भाषण ऐकण्याचें कुतुहल माझ्या ठिकाणीं उत्पन्न झालें होतें, हें मात्र कबूल करणें भाग आहे. हें कुतूहल पूर्ण होण्याचा योग मात्र किती तरी वर्षांनी, म्हणजे २३ ऑक्टोबर १९४६ रोजीं, आला.

नागपूर विद्यापिठानें बोलाविलेल्या १३ व्या प्राच्य विद्यापरिषदेचें उद्घाटन पं. द्वारकाप्रसाद मिश्रांच्या हातून झालें. दूर उच्चासनावर बसलेली त्यांची गंभीर मूर्ति पाहून माझ्या शेजारी बसलेले परप्रान्तीय प्रतिनिधी त्यांच्याविषयीं आपसांत चर्चा करूं लागले व 'पंडितजींकडे कोणती खातीं आहेत?' 'लोकांत पंडितजी–बद्दल काय मत आहे?' 'प्राच्यविद्येबद्दल त्यांना कितपत आस्था आहे?' —असे प्रश्न, मी नागपूरचा आहें असें कळल्यावरून मला विचारूं लागले. आणि मीहि, प्रत्यक्ष कांहीच माहिती नसतांना, वर्तमानपत्रांत वाचलेल्या हकीकतींच्या आधारानें सुचतील तशीं उत्तरें देत होतों. परंतु लवकरच माझा पं. मिश्रांशी प्रत्यक्ष परिचय होण्याचा सुयोग आला व त्यानंतर त्यांच्याविषयीं माझें जें मत झालें त्याच्या प्रकाशांत पूर्वी मीं काय उत्तरें दिलीं असतील, याबद्दल नवल करीत राहिलों.

प्राचीन संस्कृतीचा अभिमान—

पं. मिश्रांनी त्या परिषदेंत जें भाषण केलें, त्यांत त्यांची स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा या तिहींबद्दलची आस्था स्पष्टपणें प्रतिबिंबित झाली होती. त्यावेळच्या त्यांच्या भाषणांतील कांही वाक्यें मला अद्यापिहि आठवतात.

"कुछ क्षणों के लिए ही सही राजनीति के पंकसे निकल भगवती सरस्वती के पुत्रों की सत्य, शिव तथा सुन्दर वाणी सुनने का अवसर पाकर कौन प्रसन्नता का अनुभव न करे गा?"

"प्राचीन संस्कृतिका गौरवपूर्ण चित्र जनता के संमुख अस्थित कर संस्कृति–प्रेम के द्वारा राष्ट्र–प्रेम की ओर जनमत को प्रेरित करना, एक ऐसा भव्य कार्य है जिसमें प्रत्येक व्यक्ति को यथाशक्ति योग देना चाहिए!"

याच भाषणांत त्यांनी ' ओरिएण्टल ' शब्द वापरण्याचें आतां प्रयोजन उरलेलें नसल्यामुळे पाश्चिमात्यांनी आपल्या सोयीसाठी प्रचारांत आणलेला हा शब्द बदलावा, अशी एक सूचना केली व त्यामुळे त्या परिषदेंत उपस्थित असलेल्या प्रत्येक पंडिताला विचार करावयास लावलें. त्याच बरोबर त्यांनी नर्मदेच्या तीरावर होऊन गेलेल्या प्राचीन संस्कृतीचें उत्खनन व्हावें अशी इच्छा प्रदर्शित केली होती. दक्षिणोत्तर भारताच्या इतिहासांतील सांधा जुळविण्यासाठी या संस्कृतीचा शोध होणें आवश्यक आहे असें त्यांचें मत आहे. या कार्याला प्रांतिक सरकार पूर्ण साहाय्य करील, असें त्यांनी त्यावेळीं आश्वासनहि दिलें होतें. परंतु अद्यापि त्या कार्याला आरंभ झालेला नाही. याबाबतींत त्यांनीच पुढाकार घ्यावयास हवा, व ते तसा पुढाकार घेतील, याबद्दल त्यांच्या सहवासांत आलेल्या व त्यांच्या मनांत भारतीय संस्कृति व इतिहास यांच्या विषयीं सतत वसत असलेल्या कळकळीची जाणीव असलेल्या व्यक्तीस खात्री वाटते. ' कृष्णायना ' च्या आरंभीची त्यांची काव्यभूमिका, राष्ट्राभिमान, धर्माभिमान व भारतीय संस्कृतीवरील जाज्वल्य निष्ठा यांनी ओतप्रोत आहे.

तर्ककर्कश राजकारण व नाजुक काव्यकला —

पंडित मिश्रांच्या प्रथमदर्शन प्रसंगींच त्यांच्या संबंधीची आणखी एक वार्ता परिषदेस जमलेल्या प्रतिनिधींस समजली. त्या वेळच्या नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूंनी न्या. मू. वा. रा. पुराणिकांनी, आपल्या भाषणांत पंडित मिश्रांच्या ठिकाणीं काव्यप्रतिभा वास करीत आहे व त्यांचें कृष्णायन नामक काव्य प्रसिद्धीच्या मार्गावर आहे, अशी माहिती सांगितली. या बातमीने सर्वांनाच सानंदाश्चर्याचा एक लहानसा धक्का बसला. धकाधकीचें राजकारण करणारा मंत्री महाकाव्य निर्माण करूं शकतो, हाच मुळीं ' वदतोव्याघात ' ठरण्याचा संभव. पं. मिश्रांनीच हें हालाहल आणि हें अमृत एक आणण्यांत यश मिळविलें, असें म्हणावें लागतें. बहुधा राजकारणी पुरुष गद्य व नीरस मनोवृत्तीचे असतात. त्यांची वृत्ति तर्कनिष्ठुर असल्यामुळें काव्यासारख्या नाजुक ललितकलांना मारक ठरते. राजकारणपटु लोक विद्वान असतात, असा नियम आहे. त्यावरून त्यांच्याकडून ग्रंथलेखन व्हावें, अशी आपण अपेक्षा करतों व ती बव्हंशी सफल होतें. परंतु राजकारणी लोकांचे ग्रंथ म्हणजे चरित्रें, आत्मचरित्रें, इतिहास, राज्यशास्त्र या व अशाच प्रकारच्या विषयावर असणार. काव्यरचना अशा लोकाकडून होईल, असा विचार चुकून देखील आपल्या मनाला शिवणार नाही.

याउलट काव्यप्रतिभेने ज्यांच्यावर कृपादृष्टि वळविली आहे. असे लोक राजकारण करतांना आढळत नाहीत. भारवि व माघ राजकारणी होते, पण काव्यांत संवाद रचण्यापुरते. कालिदास राजदूत होता, पण फक्त दंतकथेंतच.[1] मिल्टन

---

१ ' कुन्तलेश्वरदौत्य ' नामक एक ग्रंथ कालिदासाच्या नांवावर आहे. त्यांत कालिदास कुन्तलेश्वराकडे दूत म्हणून गेला होता. तेथे त्याचा अपमान झाला. राजसभेंत त्याला बसावयास आसन मिळालें नाही. तर जमिनीवर बसावयास लावलें. तेव्हा त्याने—

राजनीतिज्ञ होता परंतु लॅटिन भाषेंत पत्रकें काढण्यापुरता. धकाधकीचें राजकारण व मृदु ललितकला या दोघांची परस्परविरोधी तंत्रें संभाळण्याचें कार्य पूर्वीच्या महाकवींनी केलें नाही. तेव्हा तीं संभाळतां येणें शक्य आहे किंवा नाही. असा प्रश्न उद्भवल्यास शक्य आहे, असें म्हणावयाचें पं. द्वारकाप्रसाद मिश्रांच्या उदाहरणावरून! पं. मिश्रांचें 'कृष्णायन' म्हणजे काय 'रामायणा' प्रमाणें आर्षकाव्य आहे कीं 'रामचरित मानसा' प्रमाणे चरित्रकाव्य आहे, याचा त्यावेळी आम्हांस बोध झाला नाही. फक्त नवल वाटलें तें याच गोष्टीचें की, काव्य व राजकारण या विरोधी जोडीचा समन्वय घडविणारी बुद्धिमत्ता परमेश्वराने पं. मिश्रांना त्यांचें कोणतें पूर्वसुकृत पाहून दिली!

सौजन्य—

पंडित मिश्रांशी माझा निकट परिचय होण्याचा योग ता. १९-११-४६ रोजीं आला. तो दिवस माझ्या आयुष्यांत मोठ्या भाग्याचा होता. वास्तविक त्यांनी मला आदल्या दिवशीं सायंकाळीं आपल्या भेटीस बोलावलें होतें परंतु अचानक पावसाच्या सरी येऊं लागल्या व पावसांत जाणें मला शक्य नव्हते, म्हणून मीं ध्वनिवाहक यंत्राच्या मदतीने आपली अडचण त्यांच्या कानावर घातली व त्यांना दुसऱ्या दिवशी सकाळीं भेटण्याची परवानगी मिळविली; उद्या पं. मिश्रांसारख्या अत्यंत प्रभावी, उच्चपदस्थ व सर्व दृष्टींनी थोर असलेल्या व्यक्तीशीं मला कसें बोलतां येईल, याचीच माझ्या मनाला मोठी काळजी लागून राहिली. त्यामुळे रात्रभर धड झोपहि आली नाही. प्रातःकाळीं स्नान वगैरे आटोपून अस्वस्थ चित्ताने मी त्यांच्या शहराबाहेरील टेकडीवरच्या निवासस्थानाकडे जावयास निघालों. लांबच लांब रस्ता, अवघड चढ–उतार, गावाबाहेरची निस्तब्धता या सर्वांनी माझ्या आधीच्या अस्वस्थतेंत भर पडली. बंगल्याच्या बाहेरच्या फाटकाजवळ खांद्यावर बंदूक टाकलेला पोलिस पाहून येथून परत फिरावें, असें वाटूं लागलें. परंतु पुन्हा एकदा मनाला धीर दिला व पोलिसाकडे न पाहतांच फाटकाच्या आंत मायकल घातली. त्याबरोबर मनाची अस्वस्थता पूर्णपणें विराम पावली. तेथीच नोकर आदबीने पुढे आला. अगत्यपूर्वक माझी चौकशी करून मला एका खुर्चीवर बसवून व माझ्या नांवाची चिठ्ठी घेऊन तो पंडितजींच्या ऑफिसकडे निघून गेला. चिठ्ठी नेल्यापासून मला बोलावणें येईपर्यंत फार तर पांचसात मिनिटें गेली असतील. पण उत्सुकता व अस्वस्थता या भावनांची माझ्या मनांत जी गर्दी उडाली, तिने बंगल्याची टापटीप, नोकरा–चाकरांची आदब व विशेषत: तेथे चालणारा मंद मूक कारभार या कशाकडेच माझें लक्ष नव्हतें. अशा मनस्थितींतच मला ऑफिसकडे नेण्यांत आले. व पं. मिश्रांशी प्रत्यक्ष बोलण्यासाठी मी त्यांच्यापुढे उभा राहिलों.

इह निवसती मेरु:शेखर:क्ष्माधराणा
मिह विनिहितभारा: सागरा:सप्त चान्ये ।
इदमहिपतिभोगस्तम्भ विभ्राजमानं
धरणितलमिदैव स्थानमस्मद्विधानाम् ॥

असा श्लोक म्हटला. अशी एक दन्तकथा आहे. प्रस्तुत श्लोक क्षेमेन्द्राने 'औचित्यचर्चेत' उद्धृत केला आहे.

माझ्या मनाचा गोंधळ माझ्या चेहेऱ्यावर स्पष्ट उमटलेला असला पाहिजे. कारण पंडितजी मला सहानुभूतीने धीर देऊन माझें नांव मला विचारूं लागले व लगेच माझी ओळख पटल्यावर मला आपल्या खाजगी बैठकीच्या खोलीकडे घेऊन गेले. यावेळीं मात्र मनाचा तोल बराच सावरला गेला होता व त्या बैठकीच्यां खोलींतील साधेपणा व स्वच्छता, टापटीप आणि नेटकेपणा माझ्या नजरेंत भरूं लागला होता.

व्यक्तिमत्व –

पंडितजींची मूर्ति तशी फार उंच नाही. त्यांच्या चेहेऱ्यावर एक प्रकारचा गंभीर भाव सतत कायम असतो. त्यांची तीक्ष्ण दृष्टि नेहमी बोलणाऱ्या व्यक्तीच्या अंतःकरणाचा ठाव घेत असते. ओठांत एक आणि पोटांत एक अशी दुटप्पी वृत्ति ठेवून पंडितजींशी बालणें कठीण. त्यांचे कपडे शुद्ध स्वच्छ खादीचे असतात. त्यांचें भाषण नेहमी मोजकें, मुद्देसूद व अधिकारयुक्त असतें. गंभीर वृत्ति, तीव्र दृष्टि, माफक भाषण व झटादिशीं निर्णय घेणारी बुद्धि या गुणांतच पंडितजींचें व्यक्तिमत्व साठवलें आहे. या चार गुणांतच त्यांच्या सर्व मोठेपणाचीं बीजें आहेत. पंडितजींना लांबून जरी कोणी पाहील, तरी त्यांच्या या चार वैशिष्ट्यांची, त्याच्यावर छाप बसल्याशिवाय राहणार नाही. पंडितजींना फार बोलण्याचा कंटाळा असला, तरी परकेपणाचें अंतर कमी होत गेलें म्हणजे व त्याना आवडीचा विषय असला, तर ते मनमोकळेपणाने बोलतात, असा माझा अनुभव आहे. पंडितजींना बोलकें करावयास आवडीचे विषय दोनच–एक राजकारण व दुसरा वाङ्मय. माझ्याशीं त्यादिवशीं झालेल्या व नंतर घडून आलेल्या अनेक भेटींत ते या दोन्ही विषयांसंबंधीं बोलले. पण पहिल्या विषयाचें मला कांहीच ज्ञान नाही. त्यामुळे आम्ही–अर्थात् पंडितजींना सवड असली म्हणजे–काव्यशास्त्र याच विषयावर बोलत असतों.

आतिथ्य—

पंडितजींचा स्वभाव आतिथ्यशील आहे. त्यांची गृहस्थधर्माविषयीं आस्था व आतिथ्यशील स्वभाव यांविषयीं मला प्रथम बरेंच आश्चर्य वाटलें. एकतर गांधीतत्त्वज्ञानांत आश्रम जीवनाला बरेंच महत्त्व आहे व दुसरें म्हणजे ' अत्युचीं पदिं थोर ही बिघडतो हा बोल आहे खरा ' ही कव्युक्ति थोर व्यक्तिकडून आतिथ्य. सौजन्यादि गुणांची कोणीहि अपेक्षा करूं नये, असें अर्थापत्तीने शिकवीत असते. बोलण्याच्या ओघांत पंडितजींजवळ मी हे विचार बोलून गेलों. त्यावेळीं त्यांच्या व्यक्त झालेल्या विचारावरून पंडितजी राजकीय तत्त्वज्ञानाच्या बाबतींत महात्मा गांधीचे अनन्य उपासक आहेत. पण गृहस्थधर्माला ते भारतीय सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक समजतात. श्रुतिस्मृत्यादि ग्रंथांनी गृहस्थधर्माची मुक्त कंठाने स्तुति केली आहे. ब्रह्मचर्यादि इतर तीन आश्रम उपजीविकेसाठी गृहस्थावर अवलंबून असतात:—

यथेह क्षुधिता बाला मातरं पर्युपासते ।
एवमाश्रमिण: सर्वे गृहस्थं पर्युपासते ॥

त्यामुळे गृहस्थधर्माचे चारी पुरुषार्थ साध्य करण्याच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच आतिथ्य गृहस्थधर्माशी जोडून देण्यांत आलें आहे. गृहस्थाश्रम म्हणजे विलासप्रियता अशी जी प्रचलित गैरसमजूत आहे, तिने प्रेरित होऊनच

आश्रमजीवनाची तरफदारी करण्यांत येते. परंतु विलासप्रियता वगळून शुद्ध व निर्मळ अशा गृहस्थाश्रमाचें आचरण करतां येणें शक्य आहे, अशी पंडितजींची विचारसरणी व दृढ श्रद्धा आहे व तदनुसार त्यांचा जीवनक्रम आहे.

बहुश्रुतपणा—

पंडितजींशी बोलतांना त्यांच्या बहुश्रुतपणाची मजवर छाप पडल्याशिवाय रहात नाही. खरें सांगावयाचें म्हणजे मला जर कधी काळीं पांडित्याचा थोडा अहंभाव झाला असेल, तर तो पं. मिश्रांच्या सांनिध्यांत गळून जातो, हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. इतिहास, भूगर्भशास्त्र, संस्कृत, हिंदी, मराठी, बंगाली, गुजराथी वगैरे भाषांचें वाङ्मय, भारतवर्ष व इतर प्राचीन देश यांचा इतिहासपूर्वकालीन सांस्कृतिक संबंध, यूरोप व तेथील वाङ्मय–वगैरे कितीतरी विषयांवरील मौलिक ग्रंथांचें त्यांचें वाचन झालें असावें असा त्यांच्याशीं बोलतांना माझा ग्रह झाला. यापेक्षा कितीतरी विविध विषयांवर ते इतर मंडळींशीं बोलत असतील व राजकीय सभागृहांतील त्यांचीं भाषणें नेहमीच माहितींनी ओतप्रोत भरलेलीं असतात.

संस्कृत, हिंदी व इंग्रजी या तीन भाषांशिवाय पंडितजींचें बंगाली, मराठी व फारशी या आणखी तीन भाषांवर चांगलें प्रभुत्व आहे. अवधी हिंदींत त्यांनी 'कृष्णायना' ची रचना केली आहे. व्रजभाषेंतील कृष्णलीलावाङ्मय त्यांना जवळ जवळ मुखोद्गत आहे. काव्यरचनेस बंगाली व अवधी हिंदी अधिक सुखावह आहेत, असें त्यांना वाटतें. या दोन भाषांत काव्योपयुक्त माधुर्य व लवचिकपणा अधिक आहे. त्यांच्या तुलनेंत मराठी व खडी हिंदी आपल्या नांवाप्रमाणेंच कठोर व न वाकणाऱ्या भाषा आहेत. त्या भाषा तर्कप्रधान गद्याला अधिक शोभतात, असें त्यांचें मत आहे. आपण आपल्या 'कृष्णायनां' त 'शोरा' हा फारशी शब्द फक्त तीनच वेळां वापरला आहे, इतकी त्यांची स्वतःच्या शब्दसृष्टीची छाननी बारकाईची आहे. हिंदी वाङ्मयाच्या व भाषेच्या बाबतींत त्यांची कांही निश्चित अशीं मतें आहेत. मधून मधून त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या वाङ्मयविषयक संभाषणांवरून मला हिंदी भाषा, तिचे स्थलपरत्वें पडलेले भेद, त्यांपैकी प्रत्येकाचे विशिष्ट गुणदोष, त्या सर्वांत काव्योपयोगित्वाच्या धोरणानें अवधीचें श्रेष्ठत्व–वगैरे कितीतरी गोष्टींचें ज्ञान झालें. तुलसीदासावर त्यांची निरतिशय भक्ति आहे. आर्यावर्तातील सांस्कृतिक संघर्षांत तुलसीदासाच्या 'रामचरितमानसा' ने जें कार्य केलें, त्याचें वर्णन करून सांगत असतांना पंडितजींच्या चेहऱ्यावर अभिमानाचें तेज तळपत आहे, असें मीं पाहिलें आहे. "आज जर कोणी जगाच्या वाङ्मयांतील एकच ग्रंथ निवडून घे, असें सांगूं लागला, तर मी तुलसीदासाचें रामायण निवडून घेईन" असेंहि त्यांनी मला बोलून दाखविलें.

'कृष्णायना' कडे नुसती ओझरती नजर टाकली, तरी देखील पं. मिश्रांच्या प्रगाढ संस्कृत वाचनाची कल्पना येईल. विष्णुपुराण, गर्गसंहिता, महाभारत, हरिवंश, ब्रह्मवैवर्त— वगैरे अनेक ग्रंथांचें सूक्ष्म वाचन करून श्रीकृष्णाच्या जीवनांतील शेकडो घटनांची क्रमशः रचना करावयाची म्हटली, तरी केवढें अवाढव्य कार्य ! त्यांत पुन्हा सर्व संस्कृत महाकाव्यें, स्फुटकाव्यें, सुभाषित संग्रह, नाटकें, चम्पू,
 साहित्यशास्त्रावरील ग्रंथ चाळून त्यांतील सूक्तिरत्नांनी कृष्णायनाचा जामदारखाना

समृद्ध करण्यांत पंडितजींनी घेतलेल्या परिश्रमांची कल्पना देखील करवत नाही. पंडितजींचें संस्कृत भाषेवरील प्रेम 'कृष्णायन'च्या द्वारें मूर्त स्वरूपास प्राप्त झालें आहे. हिंदी, मराठी, इंग्रजी ग्रंथांबरोबर संस्कृत ग्रंथांचें त्यांचें वाचन अव्याहत चालू असतें. एकदा तर मी त्यांच्या हातांत 'विश्वगुणदर्शचम्पू' पाहिला. प्राचीन संस्कृतींचा संशोधनपर अभ्यास करण्याची त्यांना फार हौस आहे. 'ऋग्वेदांत झरथुष्ट्र,' संस्कृतांत भक्तिमार्गाचा प्रवेश व तामीळ भाषेंतील प्रबन्धचिन्तामणीचें कार्य,' 'श्रीकृष्णाचा कृष्णवर्ण' वगैरे विषयांवर विचार करून त्यांनीं त्यांपैकीं कांहींवर संशोधनपर लेख लिहिले आहेत. एकदा भागवत-पुराणाबद्दल ते मजजवळ बोलत असतां मला लक्षांत ठेवण्यास योग्य असे कितीतरी मुद्दे त्यांच्या बोलण्यांत आले. भागवताने श्रीकृष्णाचें चरित्र निवृत्तिपर बनवून टाकलें, परंतु मूळ महाभारताला अनुसरून त्यांनी आपल्या 'कृष्णायनां'त श्रीकृष्णाचा आदर्श प्रवृत्तिपरच ठेवला आहे. संस्कृतांत त्यांना जर खरा कंटाळा कशाचा असेल, तर तो व्याकरणाचा. त्यांना व्याकरणाची अगदी विद्यार्थी-दशेपासूनच नावड !

महाराष्ट्रियांच्या मनोवृत्तीसंबंधी—

मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या अभिमानी व ताठर वृत्तीविषयीं एकदा बोलणें निघालें असतां पं. मिश्रांनी मला त्याबद्दल एक सुंदर उपपत्ति सांगितली. हिंदुस्थानच्या इतिहासांत कोणत्या ना कोणत्या तरी शतकांत प्रत्येक प्रांताने स्वातंत्र्य-प्रेरणेने उठावणी करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रयत्नांच्या मालिकेंतील शेवटचा प्रयत्न महाराष्ट्रियांचा होता. ब्रिटिश साम्राज्य या देशांत पूर्ण प्रस्थापित होईपर्यंत महाराष्ट्रांत मराठ्यांचें राज्य होतें. त्यामुळे गतस्वातंत्र्याचें व अधिकाराचें स्पंदन अद्यापि त्यांच्या हृदयांत उमटत असतें. हें स्पंदनच त्यांच्या अभिमानी व ताठर वृत्तीचें खरें कारण आहे. मराठ्यांनी मुसलमानांशीं झगडून स्वातंत्र्य व स्वराज्य संपादन केलें, त्यामुळे इतर कोणत्याहि प्रांतांतील लोकांपेक्षा महाराष्ट्रीय मनोवृत्ति अधिक परधर्मासहिष्णु बनून गेली आहे. महाराष्ट्रियांची ही ताठर वृत्ति बरी की वाईट याबद्दल मात्र पंडित-जींनी आपलें कांहीच मत प्रकट केलें नाही.

पं. मिश्रांना महाराष्ट्रीय लोक व मराठी भाषा या उभयतांविषयीं विशेष अगत्य आहे व ही गोष्ट जगजाहीर आहे. हा जो त्यांना महाराष्ट्राविषयीं ओढा वाटतो त्याला थोडी पूर्वपीठिका आहे. त्यांच्या घराण्यांतील कांही पूर्वज व्यापाराच्या निमित्ताने पुण्यास कांही दिवस स्थायिक झाले होते. पंडितजींचे कांही दुय्यम शाळेंतील व कॉलेजांतील शिक्षक महाराष्ट्रीय होते. कै. पं. माधवराव सप्रे यांना तर ते आपले राजकीय गुरु मानतात. हिंदी भाषेला साहित्यिक स्वरूप देण्याचें बरचसें श्रेय कै. पं. माधवराव सप्रे यांना असल्यामुळे त्या दृष्टीनेहि त्यांच्याविषयीं संपूर्ण हिंदी जगतांत नितान्त श्रद्धा वसत असते. लोकमान्यांच्या 'गीतारहस्या'चा पं. मिश्रांवर किती परिणाम झाला आहे, हें पहावयाचें असेल, तर 'कृष्णायनां'तील गीतेचा अनुवाद पहावा. पंडितजींचे अनेक महाराष्ट्रीय मित्र आहेत व चहातेहि आहेत. फार काय, ते, ज्या पडरी खेडेगांवीं जन्मास आले त्या खेड्याच्या नांवावरून, विनोदाने स्वतःस 'डी. पी. पडरीकर' असेंहि म्हणवीत असत.

राजकारणाच्या आखाड्यांत

काव्य हा जर पंडित मिश्रांचा आत्मा असला, तर राजकारण हें त्यांचें शरीर आहे. आपल्या धडाडीच्या काळापासूनच त्यांनी राजकारणाच्या आखाड्यांत उडी घेतली. लोकाग्रणी होण्यास आवश्यक वक्तृत्व, प्रभावी व्यक्तिमत्व, सत्यनिष्ठा, विचारस्वातंत्र्य व त्यागबुद्धि हे त्यांचे गुणच क्रमाक्रमाने लोकांच्या डोळ्यांत भरत गेले. लोकानुयायित्व वश करण्यासाठी लेखणी प्रभावी असावी लागते. पंडितजी त्याहि बाबतींत यशस्वी ठरले. 'श्रीशारदा' व 'लोकमत' हीं दोन नियतकालिकें त्यांच्या संपादकत्वाखाली निघत असत. 'कृष्णायना' शिवाय त्यांनी आणखीहि एक अति प्रसिद्ध राजकीय विषयावर ग्रंथ लिहिला आहे. तो टोपण नांवावर प्रसिद्ध झालेला असल्यामुळे त्याचें कर्तृत्व पं. मिश्रांकडे आहे, हें लोकांना माहिती नाहीं. त्या ग्रंथाच्या नांवाचा रहस्यभेद मी या खेपेस करीत नाहीं.

आजपर्यंतचें भारताचें राजकारण कवि कालिदासाने वर्णन केल्याप्रमाणें

"नीचैर्गच्छत्युपरि च दशा"

अशासारखें होतें. सत्याग्रह आणि कारागृह यांची फिरून फिरून उजळणी हेंच आजपर्यंतचें देशसेवेचें व्रत होतें व पंडितजींच्या तें पूर्ण अंगवळणी पडलें होतें. त्यांच्या १९४२ सालच्या तुरुंगवासाने आपणांस 'कृष्णायना'चा लाभ करून दिला म्हणून तो तुरुंगवास देखील उपकारक ठरला.

त्यांनी अधिकारग्रहण केल्यापासूनचा काळ मोठ्या गडबडीचा व गुंतागुंतीचा होऊन गेलेला असल्यामुळे त्यांच्या राजकीय कर्तबगारीची आपणांस व्हावी तशी जाणीव होत नाही. पंडितजी नुसते पुस्तकपाठी राजकारणी पुरुष नाहीत. त्यांच्या हातांत आपल्या प्रांताचें सुखस्वास्थ्य सुखरूप आहे. त्यांची राजनीति औदार्य आणि न्याय या दोन सीमांनी परिमित आहे. परिस्थितींत उलटापालट झाली, म्हणजे त्यांना न्यायदंडाचा उपयोग करावा लागतो व मग दुखावलेला पक्ष त्यांच्या नांवानें आक्रोश करूं लागतो. परंतु त्यांनीच जर अन्याय, अत्याचार चालू दिले, तर पददलित लोकांचा रक्षणकर्ता कोण होईल?

महात्मा गांधींच्या मृत्यूमुळे ब्राम्हणावर आपत्ति कोसळल्या व कायद्याच्या कक्षांत येणाऱ्या व येत आहेत असें वाटणाऱ्या ब्राह्मणांना तुरुंगांत टाकणें पंडितजींना भाग पडलें. या प्रकारामुळे कित्येक ब्राह्मण त्यांची निंदा करूं लागले. त्याचप्रमाणें महात्मा-गांधींच्या वधाला एक ब्राह्मण जबाबदार आहे, असें पाहून अब्राह्मणांनी जातिविद्वेषाने प्रेरित होऊन ब्राह्मणांच्या वित्ताचा नाश आरंभिला अर्थात् हा उघड उघड अत्याचार होता. त्याला आळा घालणें पं. मिश्रांचें कर्तव्य होतें. तें त्यांनीं न चुकतां बजावलें. जाळपोळ व दंगल माजविणाऱ्या लोकांना त्यांनी बंदींत घातलें. पण दुर्दैव असें की जो कॉंग्रेसपक्ष आज अधिकारांत आहे, त्याच कॉंग्रेसमधील बरेचसे लोक या जाळपोळींत, अत्याचारांत व लुटालुटींत जातीने हजर होते. आता हे कॉंग्रेसचे लोक पं. मिश्रांवर दडपण आणून आपल्या तुरुंगांत अडकलेल्या भाई-बंदांना सोडा असा हट्ट घेऊन बसले आहेत! परंतु पंडितजी 'एकच इंडियन पिनल कोड' पुढे ठेवून राज्यशासन करीत आहेत. त्यांतील कायदे फक्त ब्राह्मणांना लावावयाचें व अब्राह्मणांना लावावयाचे नाहीत, असें त्यांना करतां येणार नाहीं. कॉंग्रेस

अधिकारांत असली, म्हणून तिच्या हातून गुन्हे घडल्यावर प्रायश्चित्त घेतल्याशिवाय, तिला स्वत:ची सुटका करून घेतां येणार नाही. पं. मिश्रांनी न्यायाने राज्य करण्याची शपथ घेतली आहे.

नुकताच जो देशव्यापी वणवा पेटला होता, त्यांत नागपूरला थोडीशी झळ लागली, यांत शंका नाही. पण पंडितजींच्या तत्परतेमुळे कोणाचा जीव दगावला नाही. आपल्या प्रांतांतील लोकांनी जो संयम दाखविला, त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

राज्यशासनाचा काटेरी मुकुट पं. मिश्रांनी आपल्या मस्तकावर घेतला तो लोकांच्या इच्छेला अनुसरूनच. तेव्हा ते राज्यकारभार न्यायाने चालवितात किंवा नाही, एवढे लोकांनी पहावें. वास्तविक स्वातंत्र्यसूर्य हिंदुस्थानावर उगवला, तोच मुळी दुर्दिनावर. तेव्हापासून अनेक आपत्ति सतत येत आहेत. त्यांना धीराने व नेटाने प्रतिकार करतां करतां प्रांतिक व केंद्र सरकारांतील कर्ते पुरुष थकून गेल्यासारखे झाले आहेत. अशा समयीं लोकांनी त्यांच्या हातांस बळकटी येईल, अशीच वृत्ति ठेवली पाहिजे. त्यांच्या मार्गांत अडचणी येणार नाहीत, अशी काळजी घेतली पाहिजे व येऊं पाहणाऱ्या अडचणी निवारण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या प्रांतांत आजपर्यंत जी शांतता व सुव्यवस्था टिकली ती या पुढेहि टिकावी अशीच सर्वांची इच्छा असणार. तदनुसार पंडितजींच्या होणाऱ्या प्रयत्नांस सर्वजण हातभार लावतील, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. पैशाचा मोह, जिवाचें भय किंवा अधिकाराचा लोभ न बाळगतां पं. द्वारकाप्रसाद मिश्र आपल्या गृहमंत्रिपदावरून या प्रांतांतील प्रत्येक व्यक्तीकडे समदृष्टीने पाहतील, भेदभाव न बाळगतां अपराध्यास दंड करतील, सज्जनास सौजन्य दाखवितील व कालिदासाने दुष्यन्ताचें जसें वर्णन केलें आहे तशा वर्णनास—

नियमयसि विमार्गप्रस्थितानात्तदण्ड:
प्रशमयसि विवादं कल्पसे रक्षणाय ।
अतनुषु विभवेषु ज्ञातय: सन्तु नाम
त्वयि तु परिसमाप्तं बन्धुकृत्यं प्रजानाम् ॥

पात्र होतील, असा आम्हांस दृढ विश्वास आहे.

भवभूतीच्या करुणरसाचे विवर्त

प्राध्यापक : गणेश त्र्यंबक देशपांडे, एम्. ए, एल्एल्. बी.

● उमरावतीच्या श्री शिवाजी महाविद्यालयांतील प्रा. देशपांडे हे अत्यंत रसिक असे संस्कृत पंडित आहेत. 'युगवाणीच्या' वाचकांस त्यांच्या सुंदर लेखनाचा परिचय आहेच. प्रस्तुत लेखहि प्रा. देशपांडे यांच्या लौकिकास साजेसाच आहे. हा लेख 'युगवाणी'तून क्रमशः संपूर्ण येईल.

★

एको रसः करुण एव निमित्तभेदात्
भिन्नः पृथक् पृथगिवाश्रयते विवर्तान् ।
आवर्त बुद्बुदतरङ्गमयान् विकारान्
अम्भो यथा सलिलमेव हि तत् समस्तम्[१] ॥

तमसेने हें विधान राम आणि सीता यांच्या शोकवृत्तीच्या संबंधांत केलेलें आहे. पण भवभूतीच्या सर्वच पात्रांच्या बाबतींत तें लागू पडेल. उत्तर रामचरितांत जेथून तेथून करुण रसच आहे. राम, सीता, जनक, कौसल्या इत्यादि सर्वच पात्रें शोक करितात. सर्वांच्याच भाषणांतून करुणरस प्रतीत होतो. पण व्यक्तिपरत्वें त्या करुणाचें स्वरूप भिन्न आहे. एकाच शोकवृत्तीनें निरनिराळ्या व्यक्तींचा आश्रय केल्यामुळे करुण रसाला भिन्न भिन्न स्वरूप प्राप्त झालें आहे. व्यक्तिभेदामुळे भासमान होणारी एकाच करुणाचीं भिन्न रूपें हींच करुणाचे विवर्त होते. केवळ व्यक्तिभेदा-

---

१. उत्तररामचरित, अंक ३-४८ जेथून तेथून एकच करुणरस भरलेला आहे. पण कारणपरत्वें भिन्न झाल्याने त्याने निरनिराळ्या रूपांचा आश्रय केला आहे. (कारणपरत्वें निरनिराळ्या ठिकाणी तो निरनिराळ्या रूपाने व्यक्त झाला आहे.) पाण्याचे भोवरा, बुडबुडे, लाटा इत्यादि अनेक विकार होतात. पण मुळाशी सर्व पाणी एकरूपच असतें.

मुळेंच ही भिन्नता दिसते, असें नाहीं, तर एकाच व्यक्तींच्या शोकवृत्तींत अवस्थाभेदानें हा भिन्नता दिसून येते. रामाच्या शोकवृत्तीचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास हें दिसून येईल. उत्तर रामचरितांत दिसून येणाऱ्या करुण रसांच्या सूक्ष्म छटांचें विवेचन या लेखांत करावयाचें योजिलें आहे.

डॉ. बेलवलकरांनी उत्तररामचरिताचें मराठींत फार सुंदर व सरस भाषांतर केलें आहे. या लेखांत जरूर तेथे त्यांतून उतारे दिले आहेत.

भवभूतीने करुण रसाच्या संबंधांत केलेलें हें विधान सामान्यतः सर्वच रसांच्या बाबतींत खरें आहे. रसरूपानें परिणत होणारी चित्तवृत्ति एकच असते. पण ज्या विभावादिकांतून ती प्रतीत होते, त्यांच्या वैचित्र्यामुळे ती चित्तवृत्तीहि वेगळ्या वेगळ्या प्रकारची वाटते व प्रत्येक वेळीं त्यांत वैचित्र्य येतें. अशा प्रकारें रसांचेंहि अपरिमितत्व भाशावयास लागतें. याचें विवेचन करतांना आनंदवर्धनानें सुद्धा, भवभूतीप्रमाणेच, 'विवर्त' हाच शब्द वापरला आहे. रसाच्या अनंत प्रकारांपैकी एका प्रभेदालासुद्धा अनुसरून कवि जेव्हा जगद्वृत्ताचें वर्णन करतो, तेव्हा एका स्वरूपाचें ते जग कवीच्या इच्छेनुरूप वेगळ्याच प्रकारचें भासू लागतें.[२] शृंगाराचेंच का उदाहरण घ्या ना. त्यांतहि 'रति' हा एकच भाव असला, तरीहि व्यंजकांच्या वैचित्र्यानें प्रत्येक वेळीं त्यांतील नवीनता रसिकाच्या प्रत्ययास येते. एवढेंच काय, पण एकाच व्यक्तीचें निरनिराळ्या प्रसंगानें काव्यांतून आलेलें वर्णन वाचतांनासुद्धा प्रत्येक वेळीं आपणाला ती व्यक्ति निरनिराळ्या स्वरूपांत दिसते. कुमारसंभवांत पहिल्या सर्गांत, तिसऱ्या सर्गांत आणि सातव्या सर्गांत असें तीन वेळा पार्वतीचें शृंगारपूर्णच वर्णन आलें आहे. पण तें वाचत असतांना आपल्या डोळ्यांसमोर पार्वती भिन्न भिन्न स्वरूपांत उभी राहते, असा रसिकांचा प्रत्यय आहे. आणि कवि-प्रतिभेचें कार्य तरी हेंच होय. ज्यांतून असें नाविन्य प्रत्ययास येत नाही, तें काव्य गचाळ आहे, असें खुशाल समजावें.[३]

लेखाच्या सुरवातीस भवभूतीचा जो श्लोक दिला आहे, त्याचाहि मतितार्थ हाच होय. शोकवृत्ति एकच आणि त्या शोकाचें कारणहि सीतात्याग हें एकच. असें असलें, तरी प्रत्येक व्यक्तीच्या शोकाचें स्वरूप मात्र सारखें नाहीं. तें व्यक्तिपरत्वें भिन्न आहे. तें कसें भिन्न आहे, हें आपणास येथे पाहावयाचें आहे. पण त्यापूर्वी या श्लोकाबद्दलच थोडें अधिक लिहिलें पाहिजे.

या श्लोकाचा दोन प्रकारें अर्थ करण्यांत येतो. ते दोन्हीहि अर्थ उत्तर रामचरिताचा टीकाकार 'वीरराघव' यानें दिले आहेत.[४] तें असे—

---

२. रसभावादीनां हि प्रत्येकं विभावानुभाव व्यभिचारि समाश्रयात् अपरिमितत्वम्। तेषां च एकैक प्रभेदापेक्षया अपि तावत् जगद्वृत्तं उपनिबध्यमानं सुकविभिः तदिच्छावशात् अन्यथा स्थितं अन्यथैव विवर्तते।... ध्वन्यालोक, उद्योत, ४ था.

३. ध्वन्यालोकाच्या ४ थ्या उद्योतांत या विषयाचें विवेचन आहे.

४. वीर राघवाच्या टीकेचा येथे सारांश दिला आहे. जिज्ञासूंनी ती मूळांतून वाचून पाहावी.

करुण रस एकच असला, तरीहि निमित्तभेदाने तो परस्पर विलक्षण अशा शृंगारादि रूपाने परिणत होतो. अशा अर्थ करण्याचें त्याने कारणहि दिलें आहे. तो म्हणतो, नाटकांत शृंगार किंवा वीररसच प्रधान असावेत, या सांप्रदायिक मताला भवभूतीला धक्का द्यावयाचा होता. तो त्याने या नाटकानें देऊन करुणच प्रधान रस आहे, असें त्यानें सांगितलें. इतर रसांच्या अपेक्षेने करुण रस सर्वांना सामान्य आहे. रागी किंवा विरागी या दोघांनाहि तो प्रतीत होतो. शृंगाराचें तसें नाही. इतर रसांच्या अपेक्षेने करुणाला प्रकृतित्व असल्याने त्याला प्रधानत्व आहे. याच श्लोकाचा त्याने दुसरा दिलेला अर्थ अशा-रसशब्दानें व्यपदेश्य असा करुण म्हणजे इष्टजन वियोग-जन्य शोक हा एकच असला, तरीहि निमित्तभेदाने म्हणजे सखित्व, पतित्व, पत्नीत्व इत्यादि उपाधिभेदाने भिन्न असल्यासारखा वाटून पृथक् पृथक् विवर्तांचा आश्रय करतो, म्हणजे सीता, राम, वासंती इत्यादिकांच्या त्या त्या अवस्थांप्रत पोचतो. थोडक्यांत म्हणजे सीता, राम, वासंती इत्यादिकांच्या अवस्था म्हणजे एकाच करुण रसाचे विकार होत.

मला स्वतःला यापैकी दुसरा अर्थ चांगला वाटतो. करुण रसच शृंगारादिकांत परिणत होतो, हें एकप्रकारें आग्रही म्हणणें आहे. एका टीकाकारानें या वात्तींत म्हटलें आहे कीं, या नाटकांत परिस्थिति भेदानें कोठें शृंगाराच्या छटा दिसतील, तर कोठें वीर रसाच्या छटा दिसतील. म्हणजे, करुण शृंगाराकडे झुकलेला दिसेल, किंवा वीराकडे झुकलेला दिसेल, तरीहि सर्वांच्या मूळाशी शोकवृत्तीच आहे.[५] पण असें हि मानण्याचें कारण नाहीं. या नाटकांतून दिसून येणाऱ्या शृंगाराच्या किंवा वीराच्या छटा ह्या स्थायी नाहीत. त्या केवल अंगत्वाने आलेल्या आहेत व म्हणून त्यांना भावच म्हटलें पाहिजे व ते भाव त्या त्या स्थळीं शोकवृत्तीला पुष्ट करितात. तेव्हा या दृष्टीने शोकवृत्तीच इतर रसांसारखी भासते, असेंहि म्हणतां यावयाचें नाही. शिवाय वीरराघवानें दिलेला दुसरा अर्थ घेतला, म्हणजे तो नाटकाच्या संदर्भात चांगला बसतो. तमसेने सीता, राम आणि वासंती यांच्या अवस्था पाहिल्या. त्यांच्यांत वेळोवेळीं झालेले बदल तिने पाहिले. रामाच्या शोकांत दिसून येणारी आपण दोषी व कटोर असल्याची जाणीव, सीतेच्या ठिकाणीं दिसून येणारी निराशा, कालुष्य, तिऱ्हाईतपणा व शेवटी आपुलकी इत्यादी भाव व वासंतीच्या ठिकाणीं दिसणारा सुरवातीचा रामावरील राग, त्याला चिडविण्याची वृत्ति, आणि शेवटची अलित धैर्यता व रामाच्या मोठेपणाविषयींचा विस्मय या सर्वांमुळे प्रत्येकाचाच शोक भिन्न भिन्न स्वरूपाचा वाटत होता. पंचवटींत रामाची भेट झाल्याबरोबर त्यांच्यांत उत्पन्न झालेल्या भावना आणि शेवटीं राम जावयास निघतो, त्या वेळेची त्यांची मनःस्थिति यांतील फरक पाहून तिला आश्चर्य वाटतें आणि— अहो संविधानकम्-असे तिच्या तोंडून उद्गार निघतात. " काय योगायोग आहे पाहा. प्रत्येकालाच शोक झालेला. पण निमित्त वेगळें असल्याने प्रत्येकाच्या शोकाचें स्वरूप किती वेगळे ! " असा तिच्या म्हणण्याचा आशय आहे. अहो संविधानकम्— हें वचन भवभूतीने आपल्या नाटकांतील कथानकास उद्देशून म्हटलें असणें शक्य आहे. आपल्या नाटकांच्या कथानकांची तारीफ त्याने आपल्या इतरहि नाटकांतून

५. पाहा. उ. रा. च. म. प्र. काव्यांची आवृत्ति ३-४७ वरील टीप.

केली आहे. पण त्यावरून इतर सर्व रसांच्या मानाने करुणरसच प्रधान आहे व इतर रस त्याचेच प्रकार आहेत, असें त्यास म्हणावयाचें होतें, असें मानतां येत नाही. याशिवाय आणखीहि एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. ती म्हणजे श्लोकाच्या उत्तरार्धांत दिलेल्या पाणी व तरंग वगैरेंच्या दृष्टांताची. वीरराघवाने दिलेल्या दुसऱ्या अर्थानेच हा दृष्टांत योग्य ठरूं शकतो, एरवीं नाही. आणि, वीरराघवालाहि याची जाणीव होती असें दिसतें. कारण दुसरा अर्थ दिल्यावर 'एवं दृष्टांतसामंजस्यम् उपपद्यते' असें त्यानें म्हटलें आहे.

तमसेनें जें तिघांच्या विषयीं म्हटलें, तेंच जनक, कौसल्या इत्यादिक पात्रांच्याहि बाबतींत म्हटलें म्हणजे उत्तर रामचरितांतील करुणरसाचे वेगवेगळे विवर्त होतात. तिकडे आता वळावयाचें.

२ उत्तर रामचरितांतील करुण रसाची पार्श्वभूमि—

उत्तर रामचरितांतील करुण रसाचें स्वरूप स्पष्टपणें कळण्याकरिता ज्या घटनेवर तो आधारला आहे, तिची पार्श्वभूमि लक्षांत येणें जरूर आहे. उत्तर रामचरिताचें कथानक फार थोडें आहे. किंबहुना, या नाटकाला कथानक नाहींच, असें म्हटलें तरी चूक होणार नाहीं. सर्व नाटकांत मुख्य अशा दोनच घटना आहेत. एक म्हणजे रामानें केलेला सीतेचा त्याग आणि दुसरी म्हणजे बारा वर्षांनंतर सीता आणि राम यांचें पुनर्मिलन. पहिली घटना पहिल्या अंकांत आणि दुसरी घटना सातव्या अंकांत आहे. आणि, मधले जे पाच अंक आहेत, त्यांत घटना अशा नाहीतच. पण बाह्य चक्षूंना यांत विविध घटना दिसत नसल्या, तरी त्यांत सबंध मानससृष्टीचा खेळ आहे. सीतात्यागाचा परिणाम केवळ राम आणि सीता यांच्यावरच झाला नाही, तर त्यांच्या जीवनाशीं ज्या ज्या म्हणून संबंधित व्यक्ति होत्या, त्या सर्वांच्याच मनावर झाला. या मानसिक परिणामाचें चित्र भवभूतीने नाटकांत आपल्या समोर उभें केलें आहे. नाट्यकृतीच्या बाह्य परीक्षणानें उत्तर रामचरिताचें परीक्षण केल्यास त्यांत अनेक दोष सांपडतील व ते विद्वानांनी दाखविलेहि आहेत. त्यांत कालसंगति नीट नाहीं, रंगभूमीवर हें नाटक फारसें यशस्वी होणार नाही—वगैरे अनेक दोष दाखविण्यांत येतात. पण नाटकाचा सर्व रोख मानससृष्टीवर आहे, ही एक गोष्ट लक्षांत घेतली, म्हणजे मग सर्व नाटकाकडेच वेगळ्या दृष्टीनें पाहावे लागतें. सीतेचा त्याग झाल्यावर पुन: तिचें पतीशीं मीलन होईपर्यंत मध्यंतरी कोणत्या गोष्टी झाल्या; त्यांनी त्यांचें पुनर्मीलन घडवून आणण्यांत किती कामे केलें वगैरे गोष्टींचा विचार करण्याचें कारण पडत नाही. या मानसिक भूमिकेवरून सर्व नाटकाकडे पाहिलें, म्हणजे राम व सीता यांचें बाह्यत: पुनर्मीलन भवभूतीने जें सातव्या अंकांत दाखविलें आहे, तें अगदीं गौण आहे, असें दिसलें. तें झालें काय, किंवा न झालें काय, त्याला फारसें महत्त्व नाही उत्तर राम चरितांतील प्रश्न अगदीच वेगळा आहे. रामाने सीतेचा त्याग केला, या

घटनेचा रामाशीं संबंधित असलेल्या सर्वच व्यक्तींवर परिणाम झाला. सर्वांनाच दुःख झालें आणि त्याचबरोबर रामाविषयीं त्यांचें मत कलुषित झालें. अरण्यांत टाकून दिल्यानंतर सीता जिवंत राहिली नसावी, तिला हिंस्र पशूंनी मारुन खाल्लें असावें, ही प्रत्येकाचीच खात्री होती.[६] तिचा मृत्यू झाला, याबद्दल सर्वांना दुःख झालें. पण हा प्रश्न येथे महत्त्वाचा नाही. अयोध्येंतच सीतेला इतर कांही कारणांनी मृत्यु आला असता, तर सर्वांना दुःख झालेंच असतें. पण तें दुःख व त्याची परिणति हा या नाटकाचा विषय नाही. यांतील प्रश्न वेगळाच आहे. रामाने कांही कारण नसतां सीतेला टाकलें. यामुळे उत्पन्न झालेलें दुःख व तदनुषंगिक भावना हा यांतील मुख्य आहे. सीतेचा कोणताहि अपराध नसतां रामाने तिचा त्याग केला, ह्याबद्दल सर्वांचाच रामावर रोष आहे; खुद्द रामाचाहि स्वतःवर रोष आहे असेंहि एका तऱ्हेने म्हणतां येईल. या रोषमिश्रित शोकाचें अखेर पर्यवसान रामाबद्दल सहानुभूति आणि आपुलकी निर्माण होण्यांत झालें. तें कसें झालें, हें कवीला या नाटकांत सांगावयाचें आहे. प्रत्येकाचा रामावर एक विशिष्ट प्रकारचा राग आहे. त्या रागाचें पलीकडे निर्मूलन झालें आहे. आणि रामाबद्दलचें कलुषित झालेलें मत शेवटी स्वच्छ झालें आहे. हे जे प्रत्येकाच्या मनांतील आपापले स्वतंत्र शोकाविष्कार, तेच करुणरसाचे विवर्त होत. हें सर्व लक्षांत येण्याच्या दृष्टीने सीतात्यागाच्या घटनेची पार्श्वभूमि आणि या घटनेचा ज्यांच्या मनावर परिणाम झाला, त्या सर्व व्यक्तींच्या मनाची सीतात्यागपूर्व अवस्था आपणास पाहिली पाहिजे. ही मानसिक पार्श्वभूमि लक्षांत आल्याशिवाय उत्तररामचरितांतील करुणरसाचें स्वारस्य कळणार नाहीं.

ही पार्श्वभूमि नीटपणे लक्षांत यावी, म्हणून नाटकाच्या प्रथमांकाचें कथानक थोडक्यांत देतों. रामाला राज्याभिषेक होऊन थोडासा काळ लोटला आहे. राज्याभिषेकाचा सोहळा पाहण्याकरिता थांबलेले सुग्रीव, बिभीषण, हनुमान् इत्यादि रामाचे सखे आणि तो समारंभ पाहण्यास देशोदेशींहून आलेले सर्व लोक, आपापल्या स्थानीं वापस गेले. राजजामात ऋष्यशृंग याने एक द्वादशवार्षिक सत्र आरंभिलें असल्याने त्याच्या निमंत्रणावरून कौसल्यादि सर्व राजमाता आणि भगवान् वसिष्ठ आणि अरुंधति हीं सर्व यज्ञाकरिता गेलेलीं आहेत. आणि, राज्याभिषेकाकरिता आलेला राजा जनक हा स्नेहास्तव इतके दिवस थांबून आजच विदेह देशाला वापस गेला आहे. जनक निघून गेल्यानंतर सीतामाई थोडी उदास आणि खिन्न झाली व तिचें सांत्वन महाराज रामचंद्र करूं लागले. अशा स्वरूपाची नाटकाची सुरुवात आहे. राम सीतेचें सांत्वन करीत आहे, अशांतच ऋष्यशृंगाचा निरोप घेऊन अष्टावक्र नांवाचा त्याचा शिष्य येतो. त्याने कौसल्या आणि वसिष्ठ यांच्या कडून निरोप आणलेला असतो. गर्भवती सीतेचे डोहाळे पुरवावे, असा कौसल्या आणि शांता वन्सं यांचा निरोप असतो; आणि तूं नवीनच राजा झाला आहेस, तेव्हा प्रजानुरंजनांत युक्त असावेंस ''-असा वसिष्ठांचा निरोप असतो. हा निरोप सांगितल्यानंतर अष्टावक्र निघून जातो. त्यानंतर लक्ष्मण येतो. लक्ष्मणाने आपल्या बरोबर एक चित्रपट आणलेला असतो. त्या चित्रपटांत रामाच्या आयुष्यांतील

(६) पहा- उ. रा. च अंक- II–६; III-- २८; IV-- ५, १७; V--२०; VI-- ३८;

विविध प्रसंगाचीं चित्रें रंगविलेलीं असतात. सीतेच्या मनाला बरें वाटावें या दृष्टीने राम व सीता यांना लक्ष्मण तीं चित्रें दाखवितो. चित्रें पाहात असतांच सीतेला थकवा येतो. तेव्हा लक्ष्मण तो चित्रपट गुंडाळतो इतक्यांत सीता गंगानदीचें दर्शन घेण्याची आपली इच्छा रामाजवळ प्रकट करते व त्याप्रमाणें राम रथाची तयारी करण्यास लक्ष्मणाला आज्ञा करतो व लक्ष्मण निघून जातो. सीता तेथेच रामाच्या वक्ष:स्थलावर मस्तक ठेवून झोंपी जाते. ती झोपली असताना रामाचा अंत:पुरपरिचारक दुर्मुख येतो व सीतेसंबंधी पसरलेल्या लोकप्रवादाची बातमी रामाला सांगतो. ती बातमी ऐकून रामाला फार मोठा धक्का बसतो व तो सीतेचा त्याग करण्याचा निश्चय करतो. आणि शेवटीं गंगेवर सहल करण्याकरिता जो रथ तयार ठेवण्यास लक्ष्मणाला सांगितलें होतें, त्याच रथांतून सीतेला गंगाकाठच्या अरण्यांत सोडून दिलें जातें.

उत्तर राम चरितांतलि करुण रस सीतात्यागाच्या एका घटनेवर आधारलेला आहे. वस्तुत: सीतेचा त्याग करावयास कांहिहि कारण नव्हतें. सीतेनें असा कोण–ताहि अपराध केला नव्हता कीं, ज्यामुळे रामानें तिचा त्याग करावा. सीतेच्या शुद्ध चारित्र्याबद्दल रामाला पूर्ण खात्री असते. जन्मापासूनच जी परमपवित्र तिला आणखी पवित्र करणार दुसरा कोण ? महातीर्थे आणि अग्नि यांना पवित्र करण्याला आणखी कोणूतेंहि साधन लागत नाहीं,[७] अशी रामाची भावना असते. लंकेत सीतेची अग्निदिव्यानें शुद्धि झाली पण अशी शुद्धि म्हणजे तिचा अपमान होय, असें रामाला वाटतें.[८] 'जनक, कौसल्या, अरुंधति रामाच्या संबंधांतील कोणत्याहि व्यक्तिला सीतेच्या शुध्दतेबद्दल यत्किंचितहि शंका नसते.[९] आणि म्हणूनच रामानें सीतेचा जो अकारण त्याग, केला त्याबद्दल सर्वांना अतिशय दु:ख होतें. आतां प्रश्न असा येतो कीं, रामाला जर सीतेबद्दल मुळींच संशय नव्हता, तर मग त्यानें तरी सीतेचा त्याग कां करावा ? सीतात्यागाशिवाय दुसरा मार्गच शिल्लक नव्हता काय ? याचे उत्तर नाही असेंच द्यावें लागेल. राम अशा प्रसंगांत सापडतो कीं, सीतात्यागा शिवाय त्याला दुसरा मार्गच सुचणें शक्य नव्हतें. भवभूतीनें या संबंधांत गंगेच्या तोंडी एक सुंदर श्लोक घातला आहे.

घोरं लोके विततमयशो या च वह्नौ विशुध्दि:
लंकाद्वीपे कथमिव जन: तामिह श्रद्धातु ।
इक्ष्वाकूणां कुलधनमिदं यत् समाराधनीय:
कृत्स्नो लोक: तादिह विषमे किं स वत्स: करोतु[१०] ॥

---

७ राम–उत्पत्तिपरिपूतायाः किमस्याः पावनान्तरैः।
तीर्थोदकंच वह्निश्च नान्यत:शुध्दि मर्हत: अंक १-१३

८ पाहा -- अंक १-१४; १-४३,

९ पाहा -- अंक ४-५; ४-११.

१० उ. रा. च. ७–६. " लोकामध्ये तसा तो दुर्लौकिक पसरलेला; आग्निशुद्धि लांब लंकाद्वीपांत झालेली; तिजवर इथल्या लोकांचा विश्वास कसा बसावा ? बरें, सर्व लोकांचें आराधन करणें हें तर इक्ष्वाकुवंशियांचें कुलव्रतच ठरून राहिलेलें; तेव्हा अशा अत्यंत विकट स्थितींत सापडल्यावर माझ्या रामभद्राला दुसरें काय करतां आलें असतें ? "

उत्तर रामचरिताचा पहिला अंक म्हणजे या श्लोकाचें विवरणच होय. अष्टावक्रानें वसिष्ठांचा निरोप आणला, त्यावर " आराधनाय लोकस्य " सीतेचाहि त्याग करीन, असें रामानें म्हटलें होतें,[११] आणि थोड्याच वेळांत तोच प्रसंग त्याच्यावर आला. दुर्मुखानें लोकप्रवाद रामाच्या कानावर घातला व रामानें सीतेचा त्याग करण्याचा निश्चय केला. तेव्हा दुर्मुख त्याला म्हणतो, — " महाराज, हें काय ? केवळ दुर्जनांच्या अपवादावरून आपण गर्भवती महाराज्ञीचा त्याग करणार ?" त्यावर रामाने काय उत्तर दिलें, तें पहा-राम म्हणतो " छे ! दुर्मुखा, असें म्हणूं नकोस. माझे प्रजाजन आणि दुर्जन ! इक्ष्वाकूचा वंश प्रजाजनांना अभिमत आहे. त्या वंशांत माझ्या कमनशीबानें आज लोकप्रवादास कारण झालें आहे, अग्निशुध्दिचें तें अद्‌भुत कृत्य दूरदेशी घडून आलें. येथें त्यावर कोणाचा बरें विश्वास बसावा?[१२]" बरें, अशा परिस्थितींत त्याने कोणाचा सल्ला घ्यावा, तर आई, गुरु किंवा इतर वडील माणसें गेलेलीं. आणि या सर्व गोष्टींचा निकाल तावडतोब लागला पाहिजे. या सर्व गोष्टी लांबणीवर टाकणें शक्य नव्हतें, अशा परिस्थितींत त्याला सीतात्यागाशिवाय कोणतें गत्यंतर होतें ? सीतात्यागाने तो सीतेला घोर अन्याय करित होता, याची त्याला जाणीव होती. त्याचें स्वत:चें आयुष्य धुळीला मिळणार होतें हें त्याला कळत होतें. पण त्याचा कांही इलाज नव्हता ! सीतेने अयोध्येंत राहावें, हें प्रजेला अभिमत नव्हतें[१३] आणि लोकाराधन करणें हें रामाचें आद्यकर्तव्य होतें. रामाने राजाचें व्रत घेतलें होतें. आणि, तें व्रत जर त्याला आपल्या सुखाचा होम करावयास लावीत असेल, तर रामाला तसें करणें भाग होतें. व्रतस्थ माणसाला इच्छा-स्वातंत्र्य नसतें. भवभूतीने नाटकाच्या सुरवातीसच खुद्द रामाच्याच तोंडी एक वचन घातलें आहे—

> किंत्वनुष्ठाननित्यत्वं स्वातंत्र्यमपकर्षति
> सङ्‌कटा ह्याहिताग्नीनां प्रत्यवायैर्गृहस्थता[१४] ॥

नाटकाच्या आरंभीचा हा श्लोक सबंध नाटकावर झगझगीत प्रकाश टाकतो.

सीतेचा त्याग करावयाचा, हें तर ठरलें. पण तो कसा करावयाचा ? रामाच्या वक्षःस्थलावर मस्तक ठेवून सीता अत्यंत विश्वासाने निजली होती. तिला उठवून हें रामाने कळवावें काय ? तिला उठवून रामाने असें कळविलें असतें, तर सीता आपण होऊनच वनांत जाण्यास तयार झाली असती. लोकाराधनाकरिता 'मी सीतेचाहि त्याग करीन' असें जेव्हा रामाने अष्टावक्राला सांगितलें, त्यावेळीं "म्हणूनच तर आर्यपुत्र रघुकुलाचे धुरंधर होत"[१५] असें तिने मोठ्या अभिमानाने

---

११ स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकस्य मुञ्चतो नास्ति मे व्यथा ॥ १-१२

१२ उ. रा. च. १-४४

१३ वासंती—तत् किमिदमकार्य मनुष्ठितं देवेन ।
राम:—लोको न मृष्यति इति । अंक ३ रा. तसेच III--३२ पाहा.

१४ अंक १--८ अनुष्ठानाचें नित्यत्व माणसाचे स्वातंत्र्य हिरावून घेते.
आहिताग्नींचा गृहस्थाश्रम हा अडचणींनी गजबजलेला असतो.

१५ सीता—अत एव रघुकुल धुरंधर आर्यपुत्र: ।—अंक १ ला.

म्हटलें होतें. मग रामाने तसें का केलें नाही? सीतेला सर्व खुलसेवार सांगूनहि तिला दु:ख झालेंच असतें. आणि, न सांगता तिचा त्याग करण्यांतहि तिला दु:ख होणार होतेंच. मग रामाने असें का केलें ? त्याचें कारण हेंच कीं, रामाला तें सांगणेंच शक्य नव्हतें. सीता ही शुद्ध चारित्र्याची आहे, अशी त्याची खात्री होती. एवढेंच नव्हे, तर लंकेमध्ये केलेलें अग्निदिव्यसुद्धा एक प्रकारें तिचा अपमान होता. तिच्या अग्नि दिव्याची गोष्ट ऐकतांना सुद्धा त्याला कसेंसें वाटत असे. तेव्हा ती गोष्ट तो सीतेला आपण होऊन कशी सांगणार ? अशा परिस्थितींत त्याने दुसरेंच केलें. भागीरथी तीरावर जाण्याकरिता म्हणून जो रथ लक्ष्मणाला तयार करण्यास सांगितला होता, त्याच रथांतून त्यानें सीतेला कायमचें पाठविण्याचें ठरविलें आणि तो तेथून निघून गेला. आपण यांत सीतेला फसवितों, याची त्याला जाणीव होती. पण त्या दोषाचें खापर तो स्वत: घ्यावयास तयार होता. थोड्या वेळाने सीता जागी झाली. पाहते तों राम तेथें नाही. " हें काय ? आर्यपुत्र, मला एकटीलाच येथे सोडून गेला ? ठीक आहे; पुन: भेट झाली म्हणजे चांगलें रागावलें पाहिजे. पण स्वारीला पाहून राग तर आला पाहिजेना !" असें ती म्हणाली. इतक्यांत रथ तयार असल्याची वर्दी आली. सीतेने रघुकुलदेवतेला नमस्कार केला आणि ती रथांत बसली.

सीता भागीरथीच्या तीरावर चालली होती ''रामाने तिचा त्याग केला होता.

उत्तररामचरितांतील शोकवृत्तीला ज्या घटनेमुळे चालना मिळाली. त्या घटनेचें वर्णन वर केलें आहे. रामाला ज्या परिस्थितींत सीतेचा त्याग करावा लागला ती परिस्थितीहि वर सांगितली आहे. ती पाहिल्यानंतर, रामाने सीतेचा अकारण त्याग केला असला, तरीहि त्याच्याबद्दल आपल्या मनांत राग न येतां कीव येते व उत्तररामचरितांतील सर्व पात्रांचें तसेंच झालें आहे. सीतात्यागाची बातमी ऐकल्यावर सर्वांना धक्का बसला व रामाविषयीं त्यांचें मन कलुषित झालें. पण जेव्हा त्यांना या परिस्थितीची जाणीव झाली आणि त्याचबरोबर सीतात्यागाने खुद्द रामाची काय अवस्था झाली, हें त्यांनी पाहिलें, तेव्हा त्यांचें मन साफ होऊन सीतात्यागापेक्षाहि रामाच्याच दु:खाने ते गहिवरूं लागले.[१६] रामाच्या आयुष्यांतील तो एक दैवदुर्विपाक होता. त्यांत सीता किंवा राम कोणाचाहि दोष नव्हता. आणि या नियतीच्या फेऱ्यावर कोणाचाहि ताबा नव्हता. त्यामुळेच असें म्हणावेसें वाटतें कीं, उत्तररामचरितांतील शोक रामामुळे किंवा सीतेमुळे उत्पन्न झाला नसून त्या परिस्थितीतील त्यांच्या अगतिकतेमुळे उत्पन्न झाला आहे एते हि हृदयमर्मच्छिद: संसारभागा : ।

ज्या परिस्थितींत ही सीतात्यागाची घटना घडली, ती परिस्थिती आपण पाहिली. त्याचबरोबर, आपणाला मानसिक पार्श्वभूमीचेंहि निरीक्षण केलें पाहिजे. शोकवृत्ति मानसिक आहे. आणि, ती कोणत्याहि एका घटनेमुळे चलित झालेली असली, तरीहि शोक करणाऱ्या व्यक्तीच्या इतर मनोभावनांचे तिजवर परिणाम झालेले असतात. मृतव्यक्तींसंबंधी इतर व्यक्तींच्या मनांत जे जे भाव असतील, त्या त्या भावांचे परिणाम त्या शोकवृत्तीवर झाल्याशिवाय राहणार नाहीत. आणि,

---

१६ प्रत्येकाच्या शोकवृत्तीचें विवरण करीत असतांना हें म्हणणें अधिक स्पष्टपणें कळेल.

म्हणूनच त्या शोकवृत्तीचें करुण रसांत रूपांतर होत असतांना व्यक्तिपरत्वें तो रस भिन्नस्वरूपाचा दिसेल. उत्तररामचरितांतील करुण रसाचे विवर्त नीटपणे कळण्यास ही मानसिक पार्श्वभूमि लक्षांत घेणें अवश्य आहे.

सीतात्यागाची घटना घडून आली, त्यावेळीं राम आणि सीता यांची मनःस्थिति कशी होती, हें आपण पाहूं. ही मनःस्थिति म्हणजे त्यांनी आपल्या आयुष्यांत भोगलेल्या अनेक सुखदुःखांचें संमिश्र असें फळ होतें. विवाहानंतर कांहीं काळ आनंदांत जातो न जातो तोंच त्यांना वनांत जावें लागलें. पंचवटींतील कांहीं सुखाचे दिवस गेले, तोंच रावण सीतेला घेऊन गेला. त्यानंतरचा काळ रामाच्या शोकाचा आणि दुःखाचा. इतकेंच की त्या शोकांत प्रतिकृतीचा अंश असल्यामुळे तो शोक आणि विरह रामाला सहन करतां आला.[१७] रावणवधानंतर राम अयोध्येला आला. राज्यारोहणानंतर कांहीं सुखाचे दिवस जातात न जातात, तोंच ही दुर्दैवी घटना घडून आली. मनुष्याच्या आयुष्यांत सुखाचे दिवस येतात न येतात तोंच दुःखाचा प्रसंग यावा, हा जणू नियतीचा नियमच आहे.

दुःखाच्या प्रसंगाचा अनेकवार अनुभव घेतल्यानंतर जेव्हा कांहीं सुखाचे दिवस येत त, त्यावेळीं मागील सर्व घटनांची फिरून आठवण होत असते.[१८] त्यावेळीं त्या मागील गोष्टींचाच आपण मानसिक अनुभव घेत असतो.[१९] पूर्वीचेच आनंदाचे दुःखाचे, कारुण्याचे, उत्साहाचे, भीतीचे भाव आपल्या मनांत उभे राहातात. सीता आणि राम यांचा हा अनुभव भवभूतीने आपणास चित्रदर्शनाच्या निमित्ताने सांगितला आहे.

नाटकाच्या सुरवातीसच सीता थोडीशी उदास असते. पण चित्रें पाहात असतांना हळूहळू त्यांत ती रंगून जाते. विवाहाचें चित्र-पाहिल्यावर आपण अगदी त्याच अवस्थेत आहों, अशी तिची भावना होते.[२०] इतकेंच नव्हे, तर क्षणापूर्वीचा तिचा उदासपणा मावळून ती लक्ष्मण भावोजींची थोडी थट्टाहि करावयास लागते.[२१] पलीकडील परशुरामाचें चित्र पाहून झाल्यानंतर ते सर्व अयोध्येत आले असल्याचें चित्र येतें. तें पाहतांच रामाच्या डोळ्या समोर तो सर्व प्रसंग मूर्तिमंत उभा राहतो. " हाय हाय ! तें सर्व मूर्तिमंत डोळ्यासमोर उभें राहतें ! त्यावेळीं आमचे परमपूज्य

---

१७ उ. रा. च. अंक १ – ३०

१८ रामाचा हा अनुभव होता. पाहा.

यस्यां ते दिवसास्तया सह मया नीताः पुनः स्वगृहे
यत्संबंधकथाभिरेव सततं दीर्घाभिरास्थीयत। अंक २--२८

१९ सीता--अहो जानामि तस्मिन्नेव प्रदेशे, तस्मिन्नेव काले वर्ते। – अंक १ ला.

२० मागील टीप १९ पहा.

२१ लक्ष्मणः—इयम् आर्या। इयमपि आर्या माण्डवी। इयमपि वधूः श्रुतकीर्तिः।
सीताः—वत्स, इयमपि अपरा का ?
लक्ष्मणः—(सलज्जास्मितम्, अपवार्य) अये, उर्मिलां पृच्छति आर्या।

वडील होते; आमचा सर्वांचा नुकताच विवाह झाला होता; मातोश्री आमची सर्व प्रकारें काळजी वाहात असत; गेले ते आमचे दिवस—गेले!"[२२] चित्रपट भराभर पुढे सरकत जातो. तें यमुनेच्या तीरावरील चित्रकूटाच्या रस्त्याने असणाऱ्या श्याम वृक्षाचें चित्र ! एक रस्ता आणि त्याच्या बाजूचा तो वृक्ष ! या चित्रा वरून आपणास काय बोध होणार ? कांहीच नाही. पण त्या चित्राकडे पाहात सीता रामाला काय विचारीत आहे तें पहा !

सीता—आर्य पुत्रा, आठवतो का हा प्रदेश ?

राम—हो तर ! ती आठवण कशी जाईल ?

त्या दोघांची एक गोड आठवण या प्रदेशाशीं निगडित होती ! "श्रमामुळे जड झालेलीं, प्रवासाच्या दगदगीने विकळ झालेलीं व ज्यांचें संवाहन परस्परांच्या आलिंगनांनींच झालें आहे, अशीं तीं आपलीं कोमल, मनोहर, आणि ठेचलेल्या कमलनालाप्रमाणें दुर्बळ गात्रें रामाच्या वक्षःस्थलावर ठेवून सीता याच स्थलीं झोपली होती !"[२३]

या सुखकारक स्मृतीमध्ये तीं दोघें क्षणैक रममाण होतात न होतात, तोंच लक्ष्मणाने त्यांना विरोधाचें चित्र दाखविलें आणि त्यांच्या सुखस्वप्नाचा भंग झाला. मानवी सुखाची क्षणभंगुरता हा जणू भवभूतीचा आवडता विषयच आहे. चित्रदर्शनांत त्याने चित्रांची अशाच प्रकारें योजना केली आहे की, एकाद्या रम्य प्रसंगाच्या स्मृतींत राम व सीता गुंगून जातात, तोंच एकादा भीतिकारक किंवा शोककारक प्रसंग समोर यावा ! सीतेला विराधाचें चित्र बघवेना. तिने लागलीच म्हटलें, "हें एवढेंच पुरें, मला दक्षिणारण्यांतील आपल्या प्रवेशाचें चित्र पाहूं द्या." तो प्रसंग फारच सुंदर होता. तिथेहि अरण्याकडे चाललीं होती वरून ऊन तळपत होतें. आणि रामाने सीतेच्या डोक्यावर ताडपत्राची छत्री करून धरली होती.[२४] तें चित्र पाहिल्याबरोबर रामाला तो सर्व प्रदेश आठवला. तीं तपस्व्यांची तपोवनें, डोंगराळ प्रदेशांतून वाहणाऱ्या त्या नद्या, त्यांच्या तीरावरील मुनिजनांना आश्रय देणारे ते वृक्ष आणि आतिथ्यतत्पर, शमप्रधान आणि केवळ मूठभर नीवारावर वृत्ति चालविणारे ते मुनिजन.[२५] तो सर्व देखावा रामाच्या मनश्चक्षूंसमोर जशाचा

---

२२ जीवत्सु तातपादेषु नूतने दारसंग्रहे।
मातृभिश्चिन्त्यमानानां ते हि नो दिवसा गताः॥ अंक १९.

२३ अलसलुलितमुग्धान्यध्वसंपातखेदात्
अशिथिलपरिरम्भैर्दत्तसंवाहनानि।
परिमृदितमृणालीदुर्बलान्यङ्गकानि
त्वमुरसि मम कृत्वा यत्र निद्रामवाप्ता॥ अंक १–२४

२४ सीता—पश्यामि तावत् आर्यपुत्रस्वहस्तधृततालवृंतातपत्रं
आत्मनोऽत्याहितं दक्षिणारण्यपथिकत्वम्। —अंक १ ला.

२५ एतानि तानि गिरीनिर्झरिणी तटेषु
वैखानसाश्रिततरूणि तपोवनानि।
येष्वातिथेयपरमा यमिनो भजन्ते
नीवारमुष्टिपचना गृहिणो गृहाणि॥ अंक १–२५

तसा उभा राहिला. पलीकडलें ते प्रस्रवण पर्वताचें चित्र. त्याच्या पायथ्याशीं असलेली ती स्निग्ध आणि निळसर अरण्यें, ते गोदावरीचे प्रतिनिनादित धबधबे आणि शिखरांना वेढणाऱ्या त्या नील मेघमाला ! तो सर्वच देखावा अत्यंत आकर्षक होता ! याच पंचवटीच्या परिसरांत रामाचे सुखाचे दिवस गेले होते. चित्र पाहतांच रामाने सीतेला विचारलें, " प्रिये, यांच पर्वतांवर आपण असतांना लक्ष्मणाने आपली सर्व बरदास्त ठेवली. आणि, आपले फार सुखाचे दिवस गेले ते दिवस तुला आठवतात का ? तसेंच, गोदावरी काठचा तो सरस प्रदेश आणि त्या प्रदेशांत आपण अनेक वेळां फिरलों, तें सर्व तुला स्मरतें का ? — तसेंच —
एकमेकासंनिध अगदी गालास गाल लावून कोणताहि विशिष्ट क्रम न ठेवतां अगदी जशा सुचतील तशा आपण आपल्या बहारदार गुजगोष्टी एकमेकांस सांगत असतां आणि गाढ आलिंगनांत उभयतांचा एक एक हात गुंतून गेला असतां घटका प्रहर कसे निघून गेले, याचें भानहि न राहून—रात्रच संपून जात असे. "[२६]

पलीकडेच तें शूर्पणखेचें चित्र होत. सीतेला एकदम धक्का बसला. " आर्यपुत्रा, येथवरच तुमचें दर्शन काय ? " ती एकदम उद्‌गारली.

" अग भित्रे, हें चित्र आहे ! " राम म्हणाला.

" दुर्जनाशीं प्रसंग प्रत्यक्षांत असो वा चित्रांत असो, भीतिदायक खराच ! " [२७]

पण सीतेला धीर देणाऱ्या रामाचीच काय अवस्था झाली होती ! तो जनस्थानांतील वृत्तांत आताच घडत आहे की काय, असें त्यासहि वाटावयास लागलें. मोत्याच्या सराप्रमाणें रामाच्या डोळ्यांतून अश्रूंचा ओघ सारखा खाली येत होता; शोकावेगाचा निरोध केल्याने हृदयाचें स्पंदन वाढलें होतें; ओठ स्फुरण पावत होते; आणि नाकपुड्या फुगीर झाल्या होत्या. लक्ष्मणाने विचारलें, 'दादा, हें काय ?' रामाने उत्तर दिलें, " त्यावेळीं प्रिय जानकीच्या वियोगामुळे उद्‌भवलेला तो दुःखाग्नि तीव्र तर खराच, पण सूड घेण्याच्या इच्छेने कसा तरी सहन केला. तोच मनांतील दुःखाग्नि आता पेट घेत आहे व हृदयांत मर्म व्रणाप्रमाणें वेदना करीत

---

२६ स्मरसि सुतनु तस्मिन् पर्वते लक्ष्मणेन
प्रतिविहितसपर्यासुस्थयोस्तान्यहानि ।
स्मरसि सरसनीरां तत्र गोदावरीं वा
स्मरसि च तदुपान्तेष्वावयोर्वर्तनानि ॥

किंच—
किमपि किमपि मन्दं मन्दमासत्तियोगात्
अविरलितकपोलं जल्पतोरक्रमेण ।
अशिथिलपरिरम्भव्यापृतैकैकदोष्णोः
अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् ॥ अंक १–२६,२७

२७ सीता—हा आर्यपुत्र, एतावत् ते दर्शनम् ।
राम: —अयि वियोगत्रस्ते । चित्रमेतत् ।
सीता:—यथा तथा भवतु । दुर्जन: असुखम् उत्पादयति । —अंक १

आहे. " आणि सीतेनेहि कबूली दिली, " माझेंहि दुःख परमावधीस गेल्याने आर्य पुत्रांचा वियोग झाला, असाच मलाहि भास होत आहे. "[२८]

यांचें चित्त दुसरीकडे. वळविलें पाहिजे, हें लक्ष्मणाने ओळखलें. त्याने भराभर कांही चित्रें उलटलीं आणि जटायूचें चित्र दाखविलें. पलीकडे ती श्रमणा शबरी आणि नंतर ते पंपा सरोवर येथे रामाने अगदी मुक्त कंठाने शोक केला होता आणि सीतेने ती गोष्ट काढलीहि.[२९] पण लक्ष्मणाने लागलीच हनुमानाचें चित्र दाखविलें. मारुतीचें चित्र पाहतांच सर्वांचें हृदय प्रेमाने आणि कृतज्ञतेने भरून आलें. त्याच्याच प्रभावाने खरोखर रामादिक व सर्वहि भुवनें धन्य झालीं होतीं.[३०] सीतेचें लक्ष पलीकडल्या चित्रावर गेलें. पर्वतावरील एका कदंब वृक्षावर मोर नाच करीत होता व एका वृक्षाखाली शोकाकुल लक्ष्मण मूर्च्छा आलेल्या रामाला सावरून धरीत आहे, असें दाखविलें होतें. सीतेने विचारलें, " भाऊजी, काय बरें या पर्वताचें नांव ? " आणि लक्ष्मण सांगू लागला—

" हाच तो ककुभ पुष्पांनी सुगंधित माल्यवान् नांवाचा पर्वत, ज्याच्या शिखरावर हा स्निग्ध आणि नीलवर्ण मेघ नुकताच येऊन ठेपला आहे. (चित्रांत दाखविला आहे). दादांनी येथे – "

पण रामाने लक्ष्मणाला मध्येच अडविलें, " पुरें, लक्ष्मणा, पुरें कर. आता यापुढे माझ्याने सहन करवत नाही. जानकीचा वियोग फिरून एकदा आला की काय, असें मला वाटत आहे— "[३१]

आयुष्यांत अनुभवलेल्या आपत्तींनीं राम व सीता यांचीं मनें किती हळवीं झालीं होतीं, हें यावरून दिसेल आणि अशा त्यांच्या मनावर आकस्मिक आलेल्या सीतात्यागाच्या संकटाने केवढा परिणाम केला असेल, याचीहि कल्पना करतां येईल.

---

२८ रामः—तत्कालप्रियजनविप्रयोगजन्मा
तीव्रोऽपि प्रतिकृतिवांछया विसोढः ।
दुःखाग्निर्मनसि पुनर्विपच्यमानो
हृन्मर्मव्रण इव वेदनां तनोति ॥ अंक १–३०

सीताः—हा धिक् । अहमपि अतिभूमिं गतेन रणरणकेन आर्यपुत्रशून्यमिव आत्मानं पश्यामि ।

२९ सीताः—यत्र किल आर्यपुत्रेण विच्छिन्नामर्षधीरत्वं प्रमुक्तकण्ठं प्ररुदित मासीत ।

३० दिष्ट्या सोऽयं महाबाहुरञ्जनानन्दवर्धनः ।
यस्य वीर्येण कृतिनो वयं च भुवनानि च ॥ अंक १-३२

३१ लक्ष्मणः—सोऽयं शैलः ककुभसुरभिर्माल्यवान् नाम यस्मिन्
नीलः स्निग्धः श्रयति शिखरं नूतनस्तोयवाहः ।
आर्येणास्मिन्—

रामः—
विरम विरमातः परं न क्षमोऽस्मि
प्रत्यावृत्तः पुनरिव स मे जानकीविप्रयोगः ॥ अंक १–३३

सुखापेक्षा दुःखाच्या प्रसंगांनी दांपत्यप्रेमाची परिणति होते. तशी परिणति राम–सीतेच्या आयुष्यांत झाली आहे. शृंगार आणि विलास हें पति–पत्नी–प्रेमाचें आवश्यक अंग असलें, तरी तें केवळ बाह्यांग आहे. तें परस्परांच्या आकर्षणाचें द्योतक असेल, पण दांपत्यप्रेमाचें पर्यवसान नाही. परस्परांच्या हृदयाची ओळख आणि सुखदुःखांतील एकात्मता हें दांपत्यप्रेमाचें रहस्य होय. अशांचींच हृदयें परस्परांचा 'प्रीतियोग' जाणतात. या प्रीतियोगाची ओळख सुखापेक्षा दुःखाच्या प्रसंगांनीच होत असते. आणि, अशा प्रीतियोगाच्या आधाराने पति–पत्नीच्या शृंगारांतहि उदात्तता येते. खरें पाहिलें, तर रहोविलासांना स्वतंत्र अशी कांहीच किंमत नसते. ते ज्या भावनेचे द्योतक असतील, तीवरून त्यांची किंमत होत असते. त्यांतून केवळ वैषयिक विलासप्रियताच दिसून येत असेल, तर ते हीन दर्जाचे होत. उलट दांपत्यांतील हृदयैक्याचें जर त्यांना अधिष्ठान असेल, तर तेच उदात्त वाटतात. राम व सीता यांच्या प्रेमांतील ही उदात्तता भवभूतीने स्पष्ट वर्णन केली आहे.

उत्तररामचरिताच्या सहाव्या अंकांत कुशाच्या तोंडीं भवभूतीने रामायणांतील खालील श्लोक घातले आहेत—

> प्रकृत्यैव प्रिया सीता रामस्यासीन्महात्मनः ।
> प्रियभाव: स तु तया स्वगुणैरेव वर्धित: ॥
> तथैव राम: सीताया: प्राणेभ्योऽपि प्रियोऽभवत् ।
> हृदयं त्वेव जानाति प्रीतियोगं परस्परम्[३२] ॥

आणि कुशाच्या तोंडचे हे श्लोक ऐकतांच रामाच्या तोंडून कोणते उद्गार बाहेर पडले तें पहा. राम म्हणतो–" हाय ! हा प्रसंग अति दारुण आणि हृदयाचीं मर्में विदारण करणारा आहे. हे देवि, असेंच त्यावेळीं अक्षरशः होतें बरें ! हर हर ! संसारांतील सर्वच प्रसंग असे घडोघडी बदलत जाऊन अंतःकरणाचा विरस करणारे आणि मृगजलाप्रमाणें ठरून दुःख देणारे होतात. — — परस्परावरील निःसीम विश्वासाने दुणावलेला तो त्यावेळेचा आनंद आता कोठे गेला ? आमचें तें परस्पर प्रेम आणि परस्पराविषयीं वाटणारें तें कौतुक कोठें गेलें ? सुख असो वा दुःख असो आमची ती हृदयाची एकतानता आता कोठे लय पावली ?...[३३]" अशा प्रकारच्या

---

३२ उ. रा. च. ६–३१, ३२. हे श्लोक वाल्मीकिरामायणांत बालकांडाच्याशेवटं आहेत. "त्या महात्म्या रामाला सीता स्वभावतःच प्रिय झाली होती व पतीचें आपल्यावरील प्रेम तिने आपल्या गुणांनी वाढविलें होतें. त्याचप्रमाणें सीतेला सुद्धा राम प्राणाहूनहि प्रिय होता. परस्परांविषयींचें त्यांचें प्रेम कसें होतें, हें त्यांचें हृदयच एक जाणे."

३३ राम:—कष्टं अति दारुणोऽयं हृदयमर्मोद्घात: । हा देवि, एवं किल एतत् आसीत् । अहो निरन्वयविपर्यासविरसवृत्तयो विप्रलंभपर्यवसायिन: तापयन्ति संसारवृत्तान्ता: ।

> क्व तावानानन्दो निरतिशयविश्रंभबहुल:
> क्व चान्योन्यं प्रेम क्व च नु गहना: कौतुकरसा: ।
> सुखे वा दु:खे वा क्व नु खलु तदैक्यं हृदययो:
> (तथाप्येषप्राण: स्फुरति न तु पापो विरमति) अंक ६-३३

प्रेमग्रंथीनें राम आणि सीता बांधलीं गेलीं होतीं. सीतेच्या प्रेमाविषयीं राम दुसऱ्या ठिकाणीं काय म्हणतो, तें पाहा—

त्वया सह निवत्स्यामि वनेषु मधुगन्धिषु
इतीहारमतेवासौ स्नेहस्तस्याः स तादृशः ॥
अकिञ्चिदपि कुर्वाणः सौख्यैर्दुःखान्यपोहति ।
तत् तस्य किमपि द्रव्यं यो हि यस्य प्रियो जनः ॥ [३४]

सीतेचाहि अनुभव असाच होता. सीतात्यागानंतर बारा वर्षांनी राम आणि सीता यांना पंचवटींत भवभूतींनें एकत्र आणलें आहे. त्यावेळीं रामाला आपल्या करिता शोक करतांना पाहून सीता बुचकळ्यांत पडते. परंतु रामाचे ते हृदयोद्‌गार ऐकून ती गहिंवरून येते आणि तिच्या मनांतील रामाविषयींची अढी मोकळी व्हावयास लागते. त्यावेळी तिच्या तोंडून असेच उद्‌गार निघतात. "ज्यांच्या तोंडून या मंदभागिनीला उद्देशून असे प्रेमाचे उद्‌गार निघतात, त्या माझ्या आर्यपुत्रावर मी का बरें निर्दय व्हावें ! अहमेव एतस्य हृदयं जानामि, मम एषः।"

आणि आता या भूमिकेवरून उत्तररामचरिताच्या पहिल्या अंकांतील रामाच्या कांही वाक्यांकडे लक्ष्य दिलें, म्हणजे दुर्मुखाकडून लोकप्रवादाची बातमी रामाला कळण्याच्या क्षणीं रामाच्या मनाची स्थिति कशी होती, हें कळेल.

चित्रपटांतील विविध प्रसंग पाहून मागल्या स्मृति जागृत झाल्याने सीतेचें मन थकून गेलें व तिला विश्रांति घ्यावीशी वाटली. रामाने तिला आधार देऊन खिडकीकडे नेलें. सीतेने आपला बाहू—रामाचें तें जीवितरसायन [३५] रामाच्या गळ्यांत घातला. त्याच क्षणीं रामाच्या तोंडून शब्द बाहेर पडले "प्रिये, हें मी काय समजूं ? हें सुख की दुःख ! मोह की निद्रा ? हा विषाचा प्रसर की मदाचा ? कांहींच निश्चय करवत नाही ! तुझ्या स्पर्शास्पर्शागणिक माझीं गात्रे सर्वथा विकल होतात व अशी एक मनोवृत्ति उचंबळते की, तिजमुळे हें चैतन्य क्षणैक भ्रमण पावतें आणि लगेच लुप्त होतें." [३६] थोड्याच वेळांत रामाच्या वक्षःस्थलावर मस्तक ठेवून सीता झोपीं गेली. राम प्रेमार्द्र दृष्टीने तिजकडे पाहात होता. त्याच्या मनांत विचार आले— "ही माझ्या गृहाची जणूं लक्ष्मीच, माझ्या नेत्रांना जशी काय अमृतशलाका; इचा हा स्पर्श म्हणजे जशी अंगास चंदनाची उटी; गळ्यांत असलेला हा इचा हात म्हणजे

---

(३४) उ. रा. च. २।८।१९. "मीहि पण आपणाबरोबर वनामध्यें राहीन वनें किती मधुर आणि सुगंधित असतात"— केवळ याच विचारानें तिनें ते दिवस आनंदानें काढले. तिचें प्रेमच कांहि तसें होतें. परस्पराकरिता कांही प्रत्यक्ष करावयास हवें, असें नाही. केवळ एकमेक जवळ असणें या आनंदानेंच सर्व दुःख लयास जातें, ज्याचा जो प्रियजन, तो त्याला खरोखर अमूल्य ठेवा असतो."

३५ उ. रा. च. १।३४; ३।११ वगैरे स्थळें पाहा.

३६ रामः— प्रिये, किमेतत्—

विनिश्चेतुं शक्यो न सुखमिति वा दुःखमिति वा
प्रमोहोनिद्रा वा किमु विषविसर्पः किमु मुदः ।
तव स्पर्शे स्पर्शे मम हि परिमूढेन्द्रियगणो
विकारश्चैतन्यं भ्रमयति च संमीलयति च ॥ अंक १।३५

स्निग्ध आणि शीतल मौक्तिकांचा हारच; हिची कोणती गोष्ट म्हणून प्रिय नाही ? –केवळ एकच अपवाद––तो दुःसह वियोग ! "३७

" आर्यपुत्रा, तुम्ही कोठे आहांत ! "—सीता झोपेंत बरळूं लागली. रामाच्या मनांत विचार आला, " अरे, चित्रदर्शनामुळे उद्भवलेल्या उद्वेगजनक विरहाच्या कल्पनेमुळे इला स्वप्न तर पडत नाही ना ? अत्यंत प्रेमभराने त्याने तिच्या अंगावरून हात फिरवला. त्या समयीं त्याच्या तोंडून निघालेले उद्गार तर दांपत्यप्रेमाचा आदर्श पुढे ठेवतात.—' सुख असो वा दुःख असो, ज्याच्यामध्ये अद्वैत कायमच राहतें, कोणत्याहि अवस्थेमध्ये जो निर्वाणीचा साथीदार असतो, ज्याच्या ठिकाणीं हृदयाला विश्राम मिळतो, ज्यांतील गोडी वार्धक्यामुळे मुळीच कमी होत नाही आणि कालक्रमाने लज्जेचा पडदा दूर झाला, म्हणजे ज्याची परिणति स्नेहसर्वस्वांमध्ये होते—असा तो दाम्पत्यरूपी परब्रह्मानन्द, अनेक घाव सोसावेत तेव्हा, केवळ भाग्यवंतांनाच लाभतो ! "३८

रामाच्या सुखाचा येथे अगदी कळस झाला. क्षणार्धात आपल्यावर कोणतें संकट कोसळणार, याची त्याला कल्पनाहि नव्हती. पर्वताच्या कड्यावर बेगुमानपणें खेळणाऱ्या अर्भकाप्रमाणे ती त्याची अवस्था होती. आणि, बाजूलाच खालीं संकट 'आ' वासून उभें होतें ! ३९

दुर्मुख आला; त्याने रामाच्या कानांत कांही सांगितलें— " अहह, अतितीव्रोऽयं वाग्वज्रः " रामाच्या तोंडून शब्द बाहेर पडले आणि त्याच क्षणीं त्याला मूर्च्छा आली !

[अपूर्ण]

---

३७ इयं गेहे लक्ष्मीरियममृतवर्तिर्नयनयोः
असावस्याः स्पर्शो वपुषि बहुलश्चंदनरसः ।
अयं बाहुः कण्ठे सरसमसृणो मौक्तिकसरः
किमस्या न प्रेयो यदि परमसह्यस्तु विरहः ॥ अंक १।३८ ।

३८ अद्वैतं सुखदुःखयोरनुगतं सर्वास्ववस्थासु यत्
विश्रामो हृदयस्य यत्र जरसा यस्मिन्नहार्यो रसः ।
कालेना वरणात्ययात् परिणते यत् स्नेहसारे स्थितं
भद्रं तस्य सुमानुषस्य कथमप्येकं हि तत् प्राप्यते ॥ अंक १–३९

३९ डॉ. बेलवलकरः उ. रा. च. भाषांतर, पान ९४, टीप २

सर्वंध समारंभांत गळ्याजवळची बटन दाटत होती. मानेला हासके हिसके देऊनहि तंग पोशाखाचा जाच टाळतां आला नव्हता. तेव्हांपासून तीं दरबारीं वस्त्रं त्यांनीं चढविलीं नव्हतीं !...

सोन्याचा स्टॅन्ड असलेलं तें कॅलेंडर !

त्या स्टॅन्डला इतिहास होता. फार मोठ्या घबाडाच्या मोबदल्यांत थोरल्या 'हिज हायनेस' मरहूमना एका व्हाइसरॉयनं तो नजर केला होता.

इंग्रजी कृपेची ही फार मोलाची खूण म्हणून वागविण्यात येत होती. 'इंग्रजी शतक जोवर या स्टॅन्डवर राहील, तोवर 'हरताळा संस्थानाला कसलाच धोका नाही असं व्हाईसरॉयानं बोलून दाखविलं होतं. एकोणीसाव्या शतकाचा शेवट करणारी दसकडी आणि विसाव्या शतकातली सत्तेचाळीस वर्षे त्या कॅलेंडरवरून सरकली होतीं आता त्यावर स्पष्ट आकडे दिसत होते, '१९४८' (1948)

त्या इंग्रजी लिपीतल्या अंकसमूहांतून त्यांच्या आकारावरून हरताळ्याच्या राजघराण्याचा-सत्तेचा-उत्कर्ष आणि उतरण दिसून येत होती. राज्यस्थितीचा आणि आजच्या अगतिकतेचा बोध होत होता !

दोनशे वर्षांपूर्वी हरताळ्याची सत्ता एकाच्या आकड्यासारखी एकतंत्री स्तंभवत् ताठ होती. कंपनी सरकार बलिष्ठ झालं, आणि संस्थानिकांना त्यापुढं नवाच्या आकड्यासारखं नम्र मस्तक व्हावं लागलं. डलहौसी न् वेलस्लीच्या कार-किर्दीत तर संस्थानी सत्तेचं कंबरडं मोडून स्तंभाची भूमिका इंग्रजांकडे आली. संस्थानांचें अस्तित्व वेगळें दिसलें, तरी इंग्रजी सत्तेच्या राजदंडाशीं ते चाराच्या प्रथमार्धासारखं निगडित होतं आणि नव्या संवत्सराचं रूप घेऊन थांबलेला आठाचा आकडा आजची गुंतागुंतीची परिस्थिती दाखवीत होता. त्या आठाच्या वेटोळ्याचं प्रथम सूत्र कुठं सुरू झालं होतं न् कुठं संपलं होतं, किंवा ती उकल सोडविण्यासाठीं त्यांतलं एकादं टोक कुठून काढावं न् कुठं नेऊन सोडावं अथवा जोडावं, कांही कळत नव्हतं ! इंग्रज होते तोंवर संस्थानिकांना आपले मुगुट सावरतां येत होते. इंग्रज गेले आणि जातांना त्यांनी संस्थानिकावर झटकलेली लाथ मात्र सिंहासनाला हादरून टाकणारी ठरली ! आणि आता 'लोकांना जबाबदार असलेलं सरकार हवं' अशा मागणीनं न् चळवळीनं तर आणखी हिसके बसूं लागले. यापुढें राजवंशाचं काय ?...

असे विचार मनांत आल्यावर 'हिज हायनेस' 'बे' पद्धतीच्या खिडकींतून बाहेर नजर टाकतात. वृक्षांच्या दुहेरी गुंफणींतून गेलेला सरळ, काळा भोर, निर्जन रस्ता दूरवर वक्र आणि अदृश्य होतो. रस्त्याची रेषा दृष्टींतून दडवून ठेवणारी त्या टोकाची वृक्षराजी दाट आणि निश्चल दिसते. आजचे झळाळणारे सर्वच दृश्यविषय काळ असेच गडप करून टाकील की काय, कळत नाही !

'हिज हायनेस' वडिलांच्या पुतळ्यावर डोकं टेकतात. हताशा आणि अश्रु-पात झाकण्याचा दुसरा कसलाच राजमार्ग त्यांना उरत नसावा !...

●

शंका चर्चा समाधान

रामचंद्र लक्ष्मण गुप्ते
प्रिन्सि. ह. ना. नेने, एम्. ए.

● उमरावतीचे प्रिन्सिपॉल ह. ना. नेने यांनी 'युगवाणी' च्या मार्चच्या अंकांतील आपल्या लेखांत 'ज्ञानेश्वरी' तील 'कातले' शब्दाचा 'श्वेत' असा अर्थ केला आहे. त्यावर बुलडाण्याचे रा. ल. गुप्ते यांनी 'कातले' ऐवजीं 'कासले' असा भिन्न पाठ सुचवून त्याचा 'बांधले, जुंपले' असा अर्थ केला आहे. पण आपला मूळ अर्थच बरोबर असल्याचें प्रिन्सिपॉल नेने यांनी आपल्या उत्तरांत साधार दाखविलें आहे.

★

'युगवाणी'च्या मार्च १९४७ च्या अंकांत प्रिन्सिपॉल नेने यांचा 'ज्ञानेश्वरींतील एका ओवीविषयीं प्राचीन मराठीच्या दृष्टीने अधिक अर्थप्रकाश' हा लेख आला आहे. त्यास उत्तरः—

प्रस्तुत ओवी अशी आहे:—

हो का निजसार विजयाचें ।
की तें भाण्डार महातेजाचें ।
जेथ गरुडाचिये जावळिचे ।
कातले चाऱ्ही ॥

परंतु गीतेच्या 'ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ (माधवः पाण्डवः)' या श्लोकार्धाचा सगळा अर्थ वरच्या ओवींत आला नाही. तो पूर्ण करण्याकरिता वरील ओवीच्या पुढच्या दोन ओव्याहि घेणें इष्ट आहे. त्या ओव्या अशा:—

की पाखांचा मेरु जैसा ।
रहवर मिरवतसे तैसा ॥
तेजें कोंदाटलिया दिशा ।
जयाचेनि ॥
जेथ अश्ववाहक आपण ।
वैकुंठींचा राणा जाण ।
तया रथाचे गुण ।
काय वर्णू ॥

या तीन ओव्या मिळून रथाचें व घोड्यांचें वर्णन पूर्ण झालें आहे; पण या प्रत्येक ओवींत स्वतंत्र क्रिया दाखविली गेली आहे. तेव्हा पहिल्या ओवींतील 'कातले' हा शब्द विशेषण नसून क्रियेचा दर्शक आहे, असें ठरतें व त्याचा अर्थ (कातलेल्या = वळलेल्या दोऱ्यांनी रथाला चारहि घोडे) कासले = बांधले = जुंपले, असाच असणें युक्त वाटतें. तेव्हा 'कातले'चा अर्थ 'कासले' असा केला, तर 'श्वेत' शब्दाच्या अर्थाची वाट काय, असा प्रश्न उत्पन्न होतो. परंतु त्याचें उत्तर कठीण नाही.

वास्तविक रीतीने पाहतां या ओव्यांत श्वेतत्वदर्शक बरेच शब्द आल्यामुळे त्यांच्या प्रत्यक्ष अर्थाच्या प्रतिशब्दाचा आग्रह धरणें हा गौण पक्ष आहे. कारण त्याचा शोध लावण्याने एखादें तत्त्व अथवा वाङ्मयसौन्दर्य पदरांत पडत नाही. तथापि नीट पाहूं गेलें असतां 'श्वेत' या शब्दाच्या प्रत्यक्ष अर्थाचें वैशिष्ट्य 'गरुडाचिये जावाळिचे' या दोन शब्दांच्या अर्थवाहकत्वांतच अनुस्यूत झाल्याचें आढळून येईल. कारण 'श्वेत' शब्दाचा अर्थ 'शुभ्र' इतकाच नसून त्याच्या अनुषंगाने 'रुचिर', 'तेजस्विन्', 'बलवान्' असाहि आहे; आणि हे सर्व गुण गरुडामध्ये असल्याने ते गरुडाच्या 'जावळी'तून म्हणजे जुळेपणांतून निघालेल्या ..(अश्वांत) अनायासेंच संभवतात व हययुक्त रथावर केलेली 'पाखांच्या मेरू' चा उत्प्रेक्षाहि शोभून दिसते. तथापि याहि स्पष्टीकरणाने समाधान होत नसल्यास व 'श्वेत' शब्दाला प्रत्यक्ष प्रतिशब्द पाहिजेच असल्यास तो 'जावळिचे' या शब्दांत सांपडतो, 'कातले' या शब्दांत नाही. मात्र 'जावळिचे' रूपांतर 'झावळिचे' असें करावें लागतें, तें स्वाभाविकपणें होऊं शकतें व तें सरळपणाला धरून आहे, असें मला वाटतें. कारण 'झावळिचे' याचा अर्थ 'झळईचे' 'झळाळीचे' 'कान्तीचे' असा होत असल्याने 'श्वेत' शब्दाच्या अर्थाचा प्रत्यक्ष प्रतिशब्द आपल्याला सांपडतो.

तेव्हा माझ्या मतीप्रमाणें वादांतल्या ओवीचें शेवटचे दोन चरण

जेथ गरुडाचिये झावळिचे ।
कासले चाऱ्ही ॥

असे वाचले असतां अपपाठाचा दोष उत्पन्न न होतां सहजसुबोध अर्थ पदरात पडतो व 'कातले' चा अर्थ मारून मुटकून 'पांढरा' करावा लागत नाही.

रामचंद्र लक्ष्मण गुप्ते.

१ रा. रा. ल. गुप्ते यांचा चर्चात्मक लेख माझ्या अवलोकनार्थ पाठवून माझ्या मागील लेखांतील विषयाचें अधिक स्पष्टीकरण करण्याची संधि मला दिली, म्हणून मी 'युगवाणी'कारांचा आभारी आहे.

२ मध्यंतरींच्या काळांत माझ्या प्रतिपादनाला पोषक अशी मिळालेली माहिती मी वाचकांना प्रथम सादर करून नंतर रा. गुप्ते यांच्या सूचनेविषयीं माझें मत सांगेन.

नवीन पुरावा

(अ)'कातळे'या शब्दासंबंधी ज्या महानुभाव काव्यांतील म्हणजे'शिशुपाळ वधां'तील अवतरणें मी दिलीं होतीं, त्या काव्यांतील कठीण शब्दांचा अर्थ सांगणारी 'टीपग्रंथा'ची

हस्तलिखित प्रत मला पुनः वाचावयास मिळाली. आणि तेथे 'कातळे' म्हणजे पांढरा, श्वेत असाच अर्थ आहे.

(आ) आणखी एका महानुभाव काव्यांत 'कातळे' शब्द आढळला व तेथील प्रसंगावरून माझ्याच प्रतिपादनाला अधिक पुष्टी मिळते. पंधराव्या शतकाच्या अंतिम चरणांत झालेल्या 'संतोषमुनि कृष्णदास' यांच्या 'रुक्मिणी स्वयंवर'[१] ग्रंथाच्या चौदाव्या 'प्रसंगांत' —अध्यायांत— पुढील ओव्या आढळतात. प्रसंग असा आहे की, श्रीकृष्णच 'नोवरा' आहे असें पाहून सर्व देवतागणांचें 'वऱ्हाड' निघालें आहे व त्यांतील हत्ती, घोडे, रथ, इत्यादिकांचें वर्णन कवि करीत आहे. येथे अवतरण देतांना अनवश्यक ओव्या सोडून बाकीचा भाग दिला आहे. हा ग्रंथ महानुभाव लोकांच्या नेहमीच्या वाचनांत असल्याने या ग्रंथाचें महत्त्व आहे.

'आणौनि नोवरा रावो मुरारी। हाकारा झाला त्रीभुवना माझारीं।
तें वऱ्हाड आलें सपरीवारीं। सकळ देवतागणें॥

× × ×

सैन्य[१]भीन्नलें अद्‌भुत। गज रथ घोडे आमीत[२]।
पायेदळ असंक्षात[३]। कवण जाणे॥

× × ×

आणि जे रागावागा[४] नीपुण[४]: रूपस तुरंगम समगुण।
ते देवाचे घोडे आसाहाने: वर्णु कवण जाणे॥
ते उच्चश्रव्यापस्ये[५] गाढे: बळें पराक्रमें दळभीडे।
आन[६] मनापस्ये वेगाडे: गती चालणें ते॥

ते[१] जैसे चंद्रबींबाचे वोतीले: की क्षीरसागरीं क्षीराचे मुर्त जाले।
तैसे ते उजळ गांगे मीर्वले: तेजी श्रीकृष्णाचे॥

× × ×

[यानंतर अनेक रंगाच्या घोड्यांचें वर्णन आलें आहे, त्यांतहि 'कातळ' हा रंग आहे.]

आन येक पुसे वर्ण नळि: वर जैसी नीळोत्पळाची कीळ[२]।
नाना ते पाचाचे[३] वोतीले केवळ: मज पातां॥
येक घोडे पीवळे कनकवर्ण: जैसे जांबुनदाचे सुवर्ण।
पुटी दीधले तैसे वर्ण: येका तेजीयाचे॥

× × ×

---

१ माझ्याजवळ सध्या असलेली जुनी हस्तलिखित प्रत शके १७१२ मधील आहे. त्यांतून वरील ओव्या घेतल्या आहेत.

१ मिळालें. २ पुष्कळ. ३ असंख्यात, अगणित. ४ स्वाराची लगामाने दिलेली सूचना जाणण्यांत कुशल. ५ एक नामांकित घोडा; ६ अधिक, आणिक.

१ हें वर्णन 'शिशुपाळवधांतील' वर्णनाशीं तंतोतंत जुळणारें आहे. 'श्वेत' म्हणून प्रसिद्ध असलेल्या, चंद्रबिंब–क्षीरसागर व गंगा या तीहींशीं त्यांचें सादृस्य वर्णिलें आहे. २ किरण. ३ पाचूचें.

येक बहुत वर्ण मीश्रित श्वेत हारित आन पीत
येक आर्ध काळे आर्ध आलोहित तेजी मीर्वताती ॥
येक बोर एक जर्दे जाल्हैरे येक श्वेत कुमैत आती खरे
येक करडे कातळे उचासीरे येक काळे राजवाहान ॥

× × ×

हेमगिरीचे कनकवर्ण मानस सरोवरीचे मांगसे तुरंगम
काश्मीरीचे कुमैत उत्तम करडे कळींग देशीचे ॥
सींध देशीचे सबळ घोडे जाज नगरीचे जरदे गाढे ।
बद्रीकाश्रमींचे बोर आती वेगाडे चालने मनापरते ॥

× × ×

आन कैसे रथ मीर्वती जैसी गीरी दुर्गे चालती
ध्वजस्थंबीं [1]टके उभारीले नीगुती घनघनीती महाघंटा ॥

× × ×

तेथ च्यार च्यार घोडे जींतीले[2] रथी तयावरी पाखरा शोभती
ते बाप म्हणती तया सरीसे वोळगती गगनमंडळासी ॥
ऐसे रथ [3]संजोगिले सारथी वर आयुध्यें आभरणें लेईले महारथी
तेथ ध्वजस्थंबीं बैसले निगुती वर चवरें ढळताति ॥

अशा प्रकारें वरील ओव्यांवरून हें स्पष्टतर सिद्ध आहे की, 'कातळे' शब्द रंगवाचक म्हणून विशेषण असून क्रियापद नाही; व अर्थ 'पांढरा, श्वेत' असाच महानुभावीय काव्यांत परंपरेने आढळतो. तसेंच, 'रथाला जोडणें' या अर्थी 'कासिलें', 'कातिले' असे शब्द वापरले जात नाहीत. अद्यापि तसें इतर उदाहरण मला तरी आढळलें नाही.

(इ) 'ज्ञानेश्वरी'त इतर अध्यायांतील उल्लेख पाहिल्यास याच म्हणण्यास पुष्टि मिळते. जसें:—'तरी संसारपांती' जुंतलिया । भंवतचि असावें ॥ ८·२४४; म्हणौनि व्यापारा हातीं । उसंत दीहा न रातीं । तैसयाचीये पांतीं । जुंपिजे जो ॥ १४·२४१; चतुरंगा परिवारा । संजोडिया रहवरा ॥ ११·३९७. तसेंच, 'बांधणें' यांतील सूक्ष्म अर्थाच्या छटा दाखविण्यास इतर शब्द योजलेले यादवकालीन काव्यांत आढळतात. कासणे (पीतांबरासारखें वस्त्र ओढून खोचणें, घट्ट बांधणें); दाटणें (दोन वस्तू एकमेकाला अगदी खेटून बांधणें);

कळासणें (खुंटी मारून घट्ट बसविणें, जोडून देणें); आकळणे (स्वाधीन करून घेणें, वश करणें); आळिला (सांखळीनें खांबाशीं घट्ट बांधून टाकला) पण 'रथाला, गाडीला जोडणें' या अर्थी वरील शब्द वापरलेलें 'ज्ञानेश्वरीं'त आढळत नाहीत, एवढेंच नव्हे, तर इतरत्र काव्यांतहि तसा उल्लेख आढळला नाही.

३ सारांश वरील नवीन पुरावाहि माझ्याच प्रतिपादनास पोषक असल्याने रा. गुप्ते यांचे आक्षेप व सूचना शांतपणें लक्ष्यांत आणूनहि मला विचारांत बदल करावासा वाटत नाही.

१ निशाणें, ध्वज. २ जुंतीले ? ३ युक्त केले. 'रथाला जोडणें' अशा अर्थी संजोगिलें, (जींतीले), जुंतले हे शब्द मननीय आहेत.

४ रा. गुप्ते यांच्या आक्षेपांचा विचार :— त्यांच्या म्हणण्याचा निष्कर्ष त्यांच्या पत्रांतील शेवटच्या भागांत असल्यानें त्याची पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन नाही.

(अ) ‘ जेथ गरुडाचिये झावळिचे[1] । कासले[2] चान्ही ॥ ’ असा रा. गुप्ते यांनी सुचविलेला पाठ ज्ञानेश्वरीच्या ज्या अनेक प्रती उपलब्ध आहेत त्यांत मला तरी कोठें आढळला नाही. त्यांना तो कोठे आढळला असला तर तें त्यांनी स्पष्ट केलेलें नाही, तेव्हा तो ‘काल्पित’ असावा, असें वाटतें. तेव्हा ती उपपत्ति होईल, पण सिद्धांताच्या जोडीला आधारावाचून येणार नाही. ‘ पदपाठाच्या ’ चर्चेत, सूचित पाठ कोणत्या तरी आवृत्तींत स्वीकारलेला असलेला बरा.

(आ) ‘ पूर्वी सुचला नाही, म्हणून नव्याने कोणाला सुचूं नये, असें म्हणणें उचित नाही, ’ असा पक्ष घेऊनहि रा. गुप्ते यांची सूचना सदोष वाटते. ‘ जावळिया’ व ‘ झावळे ’ हे दोन्ही शब्द ज्ञानेश्वरींत इतर आध्यायांत आढळतात; पण त्यांचे अर्थ अगदी वेगवेगळे आहेत. जसें—‘ जैसे चंद्राआड आभाळ । सदट दाटे सजळ । मग गडद ना उजाळ । ऐसें झावळें होए ॥ (ज्ञा. ८·२२९). चंद्राच्या वर पाण्याने ओथंबलेला दाट मेघ आला, तर त्याचें तेज अगदी **मंद** होतें. तो **अस्पष्ट** दिसूं लागतो. हा अर्थ रा. गुप्ते यांच्या अर्थाच्या अगदींच विरुद्ध जातो. ‘ येऱ्हवी संकल्पाचिये सांजवेळे । नावेक तिमिरेजती बुद्धीचे डोळे । म्हणौनि अखंडिताचि परि **झावळे** । भूतभिन्न ऐसे देखे ॥ (ज्ञा. ९·७२) या ठिकाणींहि ‘अस्पष्ट’ हाच अर्थ लागू पडतो, संध्याकाळीं अंधार पडूं लागला म्हणजे डोळ्यांना वस्तु ‘मंद, अस्पष्ट’ दिसूं लागतात, हा व्यावहारिक दृष्टांत येथे ज्ञानेश्वरांनी दिला आहे. महानुभावीय काव्यांतून असेंच आढळून येतें; जसें—‘अद्वैत प्रतीतींत्रळें । न फिटति भ्रांतीचीं पडळें । चांदिणेयांचे **झावळें** । देखणें जैसे ॥ (उद्धवगीता,१९९).

(इ) जावळी (समता, सादृश्य), जवळीक (सान्निध्य), जावळिया (सोबती), असें शब्द यादवकालीन काव्यांत व इतरत्रहि आढळतात; पण त्या ठिकाणीं कोठहि चुकून देखील ‘झावळे, झावळिया’ असा पाठ सूचित नाही. जसें— कृतांताचिये **जावळी** । (ज्ञा. ११. ३९६); मग गोमटेया तया जावळी असे धनंजया (ज्ञा.१४.-२१७). म्हणून उच्चारांच्या नियमानुसार फरक होतांना ‘ज’ च्या जागीं ‘झ’ होणें शक्य असलें, तरी अर्थाचा पाठपुरावा केल्यास, रा. गुप्ते यांनी कोणतेंहि उदाहरण आधाराला न दिल्याने एवढेंच नव्हे, तर ‘ज्ञानेश्वरीं’त इतरत्र आढळणारे उल्लेख पाहिल्यास ते त्यांच्या विरुद्ध जातात.

(ई) ‘ कासिलें ’ या सूचनेविषयीं वरील आक्षेपच लागूं असल्याने रा. गुप्ते यांचें म्हणणें मान्य करवत नाही. जुन्या मराठी वाङ्मयांत ‘ कासे कासिला पीतांबर ’ इत्यादि वाक्यांत म्हणजे ‘ वस्त्र ओढून, नीट खोचून, नेसणें ’ अशा अर्थींच हा शब्द वापरलेला आढळतो. ‘ रथाच्या ’ बाबतींत योजिल्याचें उदाहरण रा. गुप्ते यांनी दिलें नाहीं तेव्हा त्यांचें म्हणणें मला अजून पटत नाही.

---

१ ‘ जावळीचे ’ याबद्दल सुचविलेला शब्द. २ ‘ कातले ’ या जागीं सुचविलेला शब्द.

५ सामान्यवाचक भावाचे भुकेलेले असतात. मूळ ओवीतील शब्द कोणता हें जाणण्याची त्यांना जरूरी नसते, 'रथाला चार घोडे जुंपलेले आहेत' एवढा भावार्थ त्यांना पुरेसा वाटतो. पण विद्यापीठांत मराठी वाङ्मयाचा योग्य अभ्यास कसा असावा, असा विचार मनांत आला, म्हणजे 'पदपाठाचा' विचार करतांना आपल्या मनाच्या लगामाचे दोरे कसे खेचले पाहिजेत, याचा मासला म्हणून 'ज्ञानेश्वरी'तील एका ओवीचा दाखला मी घेतला. ज्ञानेश्वरकालीन जी भाषा होती त्या भाषेत कोणत्या शब्दांचा व्यवहार कोणत्या अर्थयोजनेसाठी असे, याचा विचार करून इतरत्र आढळणारे उल्लेख एकत्रित आणून मग 'पदपाठाचा' विचार करावयास पाहिजे. किंवा, अतिउच्च मनोभावनेच्या दृष्टीने ज्ञानेश्वरांच्या तोंडून प्रत्यक्ष निघालेला शब्द कोणता असावा व त्यांच्या श्रीमुखांतून पवित्र झालेल्या वाणीचा ज्याला पूर्ण आधार आहे, असा तो पाठ आहे ना, हा विचारहि महत्त्वाचा आहे. ज्ञानेश्वरी ही ज्ञानदेवांची वाङ्मयमूर्ति असल्याने तिला विसंगत अशी कोणतीहि कल्पना आपण बाजूला सारली पाहिजे. 'ज्ञानेश्वरी पाठीं। जो ओवी करील मऱ्हाटी। तेणें अमृताचें ताटीं। जाण नरोटी ठेविली ॥' या नाथांच्या सूचनेंतील मर्म लक्ष्यांत घेऊन व 'ज्ञानेश्वरी'च्या आधाराने व यादवकालीन ग्रंथांतील उदाहरणांवरूनच मनांत उत्पन्न झालेल्या शंकांचें समाधान करणें अवश्य आहे. आपल्याला सुचलेली कल्पना कितीहि चांगली वाटली, तरी प्रत्यक्ष उदाहरणांचा पाठिंबा तिला मिळेपर्यंत वाङ्मयक्षेत्रांत तिला सिद्धांताची प्रतिष्ठा येणार नाही. एक रम्य उपपत्ति एवढाच त्या कल्पनेचा अर्थ होईल.

ह. ना. नेने.

' प्रेम आणि लोणी '

मुळ लेखक : ओ. हेन्री
अनु. मधुकर श्री. मंगरूळकर,
बी. ए., एल् एल्. बी.

[O. Henry यांच्या ' Witche's Loaves ' या कथेचा अनुवाद.]

★

रस्त्याच्या एका कोपऱ्यावर मिस् मार्था मिक्यॅमचं ब्रेड विकण्याचं दुकान होतं. तीन पायऱ्या चढून लोटलेलं दार आंत ढकलतांच, वर टांगलेल्या छोट्या छोट्या घंट्यांच्या किण् किण् नादानं, गिऱ्हाइक आल्याची वर्दी मिळे.

मार्थानं चाळिशीच्या घरांत प्रवेश केला होता. तिच्या बँकेच्या पुस्तकांत तिच्या नावानं दोन हजार डॉलर्सचा आकडा जमेस पडला होता. समोरच्या पडलेल्या दोन दातांची जागा नवीन खोटे दांत बसवून भरून काढली होती. तिचं हृदय संस्कारक्षम होतं. तिच्यापेक्षा रूपागुणांत कमी असलेल्या स्त्रियांची लग्नं होऊन गेलीं होतीं. पण ती अजून 'कुमारी'च होती !

अलीकडे, आठवड्यांतून दोनतीनदा ब्रेड विकत घ्यायला येणाऱ्या एका गिऱ्हाइकाबद्दल तिला नकळत ' विशेष ' वाटायला लागलं होतं. तो अर्धवयाचा गृहस्थ होता. डोळ्याला चष्मा आणि हनुवटीवर काळजीपूर्वक राखलेली टोकदार दाढी, असा त्याचा रुबाब. त्याच्या इंग्रजी उच्चारांत जर्मन वळण होतं. तसा तो गरीब असावा, असं दिसत होतं. त्याचा पोषाख ठिकठिकाणीं फाटला होता आणि त्याला ठिगळं लावलीं होतीं. इस्तरीचा स्पर्श चुकूनहि त्या कपड्यांना झालेला नसावा.

इतकं असूनहि त्याचा पोषाख नीटनेटका आणि वागणूक तरी किती शालीन, किती सभ्य !

त्याचं आपलं ठरलेलं ! दोन शिळ्या पावरोट्या घ्यायच्या. ताज्या ब्रेडला पांच सेंटस् पडत आणि तेवढ्याच किंमतींत दोन शिळ्या ब्रेडस् मिळत. त्यानं शिळ्या ब्रेडशिवाय इतर वस्तूची त्या दुकानांत कधींच मागणी केली नव्हती.

एकदा त्याच्या बोटावर लालपिवळ्या रंगाचे डाग तिला दिसले. मार्थानं ताडलं, तो दरिद्री चित्रकार असला पाहिजे. बिचारा एखाद्या माळ्यावरच्या खोलींत चित्र रंगवीत असेल आणि भूक लागली की, आपल्या दुकानांतून घेतलेल्या या शिळ्या ब्रेडस् पोटांत ढकलत असेल....

जेव्हा मार्था पुडाच्या वड्या, ब्रेड, जॅम, चहा-वगैरे साहित्य घेऊन जेवायला बसे, तेव्हा हटकून तिला त्याची आठवण खिन्न करून सोडी. ती उसासा टाके. तिला वाटे, त्यानं यावं, आपल्या चविष्ट अन्नांत भागीदारी घ्यावी. तिथं त्या ओलसर मार्डीत, वाळलेली ब्रेड कुरतडत बसण्यापेक्षा, माझ्या सहवासांत—तिचं हृदय फारच भावनाक्षम होतं !

तो खरोखरंच चित्रकार आहे की नाही, हें पाहाण्यासाठी तिनं एक युक्ति योजिली. तिनं एक चित्रं कांही दिवसांपूर्वी विकत घेतलं होतं. तो दुकानांत यायच्या अगोदर त्याच्या नजरेस सहज पडेल अशा ठिकाणी तें टांगून ठेवलं.

तो व्हेनिसमधला जलमार्गाचा देखावा होता. दूरवर पाण्यांत संगमरवरी दगडाचा पुतळा होता. डौलदार 'गोंडोला' जातीच्या नावा इतस्ततः विहार करीत होत्या. एका नौकेंत एक रूपमदा पाण्यांत हात टाकून बसली होती. त्या नौकेची जलरेषा पाण्याच्या पृष्ठभागावर दूरपर्यंत उठली होती. पुंजक्या पुंजक्यांनी इकडेतिकडे पळणारे ढग, मधूनच डोकावून पाहणारें निळें आकाश आणि छायाप्रकाशाचा मनोहर खेळ त्या चित्रांत पुरेपूर होता. कुणाहि कलावंताचं मन आकर्षित व्हांवं, असं त्या चित्रकार्याचं कसब— !

त्यानंतर दोन दिवस गेले. तो ब्रेड घ्यायला आला.

'शिळ्या ब्रेड असतील न आपल्याकडे? द्या बरं दोन–' आणि ती ब्रेड गुंडाळीत असतां त्याचं लक्ष त्या चित्रानं वेधलं.

'सुंदर चित्र आहे बरं का बाई–' त्यानं सहज उद्गार काढले.

'खरं ?'–आपली युक्ति सफळ झाल्याचा आनंद, पण चेहऱ्यावर आश्चर्य उठवीत मार्था उद्गारली,

'मला कलेची फार आवड आहे–आणि त्यांतल्या त्यांत चित्रकला म्हणजे—' हें ती उघडपणें म्हणाली. पण तिला खरं म्हणायचं होतं, 'तुझ्यासारखा 'चित्रकार' मला 'चित्रा' पेक्षाहि जास्त प्रिय आहे–'.

'खरंच का तुम्हाला, हें चित्र एवढं सुंदर वाटतं' ती म्हणाली.

'आता असं पाहा, तो म्हणाला, चित्रकाराच्या शास्त्रीय दृष्टीनं त्यांत कितीतरी चुका आहेत. चित्रवस्तूची निवड तेवढी निर्दोष नाही....आणि—चित्रांतील खोली......उठावदारपणा देखील......पण राहूं दे......येतो हं, नमस्कार–'

त्यानं तिच्या हातून ब्रेड घेतली. लवून नमस्कार केला आणि घाईघाईनं रस्ता सुधारला.

तो चित्रकार असल्याबद्दल मार्थाची खात्री झाली होती. तिनं तें चित्र आंत नेऊन ठेवलं. त्या चित्राचं काम संपलं होतं. त्याच्याबद्दल तिला मोठं कौतुक वाटत होतं. चष्म्याच्या जाड भिंगाआड लुकलुकणारे त्याचे डोळे किती नम्र होते... अन् कपाळ तरी किती भव्य ! एका दृष्टिक्षेपांतच चित्राचे गुणावगुण सांगायचे म्हणजे केवढी बुद्धिमत्ता पाहिजे ... आणि अशा प्रतिभावान् कलावंतानं शिळी ब्रेड

खाऊन दिवस गुजरायचे बहुतेक कलावान लोकांना कीर्ति मिळण्यापूर्वी असंच परिस्थितीशीं झगडावं लागत असेल का ?... तिच्या मनांत नाना विचार उठत...

तिला वाटलं, आपले बँकेतले दोन हजार डॉलर्स,' हें ब्रेडचं दुकान आणि आपल्यासारखी कनवाळू स्त्री ही जर त्याच्या मागे उभी राहिली, तर त्याच्या प्रतिभेला किती बहर येईल.

— पण हीं सारीं मार्थाला पडणारीं स्वप्नं ठरायचीं होतीं !

यानंतर तो जेव्हा दुकानांत येई, तेव्हा थोडाशा अवांतर गप्पा सांगायचा. मार्थाच्या गोड गोड गुलगुलीत शब्दासाठी जणु तो भुकेला दिसे !

त्यानं शिळी ब्रेड घेणं बाकी सोडलं नव्हतं—तिच्या केक्स, निरानिराळ्या स्वादिष्ट वड्या यांनी त्याच्यावर कधी भुरळ घातली नाही.

—तिला वाटलं, त्याचा धीर खचत चालला आहे. कारण अलिकडे तो रोडकेलासा होऊं लागला होता. त्याच्या त्या तन्हेवाईक खाण्याच्या जिन्नसेंत कांही तरी चांगली वस्तू खाण्यासाठी बांधून द्यावी, असं तिला वाटे. पण हिंमत मात्र होत नव्हती. कलावंत लोक मोठे मानी असतात, हें तिला माहीत होतं.

तिच्यांत मात्र फरक दिसत होता. ठेवणींतला निळ्या ठिपक्याचा ब्लाउझ घालून ती दुकानांत बसूं लागली.

एक दिवस नेहमीप्रमाणे तिचं 'तें' गिन्हाईक आलं. नाणं टेबलावर टाकून नेहमिप्रमाणेच शिळ्या ब्रेडची त्यानं मागणी केली. मार्थानं ब्रेड घ्यायला हात लांब केला. तितक्यांत रस्त्यांत कसला तरी गलका झाला. मागोमाग घंटा बडवीत एक आग विझवायची गाडी गेली. लोकांची आरडाओरड होत होती.

ब्रेड घ्यायचं सोडून उत्सुकतेनं तो दाराशीं बाहेर आला आणि मार्थानं ती संधी साधली.

आलमारीच्या तळखणांत एक पौंड ताजं लोणी दहा मिनिटांपूर्वीच डेअरींतून आलेलं ठेवलं होतं. मार्थानं सुरी घेऊन त्याचा भला मोठा लपका काढला आणि काळजीपूर्वक ब्रेडच्या तुकड्यांना लावून ते एकमेकावर बेमालूम जुळवून दिले. तिचं गिन्हाईक आंत वळायच्या अगोदरच ब्रेड कागदांत गुंडाळल्या गेली होती.

थोड्या गप्पा मारून तो निघून गेला. त्याच्या त्या मधुर स्मृतीनं मार्था स्वतःशीं हसली. तिला आनंद झाला होता खरा, पण तिला उगाच हुरहुर वाटत होती आपण वाजवीपेक्षा जास्त धीटपणा तर दाखविला नाही ना....त्याला अपमान झाल्यासारखा तर नाही ना वाटणार !

...'छे ग...तसं नाही,' तिचं मन तिचं सांत्वन करूं लागलं, 'हें काय उद्धटपणाचं वागणं झालं ! लोण्यासारखी नाजुक वस्तू म्हणजे काय अकुलीनतेचं लक्षण आहे!

दिवसभर तो प्रसंग तिच्या मनांत रेंगाळत होता. आपल्या या नाजुक फसवेगिरीचा त्याच्यावर काय परिणाम होईल, या प्रसंगाचीं काल्पनिक चित्रं ती मनांत जुळवित होती.

...तो आपल्या हातांतील रंगफलक आणि कुंचले खाली ठेवील. त्याच्यासमोर चित्रित होत असलेलं निर्दोष जातिवंत चित्र, फलकावर टांगलेलं असेल... मग तो आपल्या फराळाची तयारी करील...शिळी भाकर नि पाणी—! तो ब्रेडचा एक

 लचका दांतांनी तोडील आणि—पं ......

मार्था स्वत:शींच लाजली. ... ज्या हातांनी तें लोणी ठेवलं, त्या हातांची त्याला आठवण येईल का...ज्या...दाराची घंटी कर्कशपणें ओरडली. कुणी तरी मोठमोठ्यानं आरडाओरड करीत येत होतं.

मार्था लगबगीनं पुढं झाली. दोघंजणं उभे होते.

एक ठेंगणेलासा अनोळखी गृहस्थ पाईप ओढीत उभा होता. आणि दुसरा तिचा...लाडका आर्टिस्ट... !

त्याचा चेहरा लाल बुंद झाला होता, हॅट डोक्यावर मागं कलली होती. डोक्यावरचे केस अस्ताव्यस्तपणे पिंजारले होते. त्यानं दांत ओठ खाऊन हाताच्या मुठी वळल्या आणि मार्थाकडे पाहून गरजला.

" Dummkopf—" गळ्याच्या शिरा ताणवतील तेवढ्या ताणवून तो ओरडला. त्या जर्मन शब्दांचा तिला कांहीं अर्थ समजला नाहीं. पुन्हां तो ओरडला, " Tausendonfer ... "

आता मात्र त्याच्या बुटक्या मित्रानं त्याला बाजूला सारायचा प्रयत्न केला.

—मी जाणार नाही— ! हिला अक्कल शिकविल्याशिवाय हालणार नाही जागचा—'

त्यानं मार्थाच्या टेबलावर मुठी आदळून म्हटलें.

' तूं माझा सत्यानाश केलास ... त्याचे निळे डोळे चष्म्याच्या जाड भिंगाआड खदिरांगारासारखे चमकत होते. !

' थेरडे—! मांजरे ! कुठं गेली होती तुझी अक्कल !""अं"" ! '

मार्था त्या हबक्यानं खचून गेली, आलमारीचा कसाबसा आधार घेत कमरेवर हात टेकवून ती उभी होती. तो निळ्या ठिबक्याचा रेशमी ब्लाउझ तिच्या हाताखाली कमरेजवळ दबला होता.

त्याच्या मित्रानं त्याच्या गळ्यांत हात टाकून त्याला बाहेर नेलं, ' चल रे, बुवा, जरा बाहेर. भारीच संतापतोस झालं. आता किती ! कांहीं मर्यादा आहे की नाही"" ! '

जवळ जवळ ओढत त्याला बाहेर नेऊन तो बुटका इसम पुन्हा दुकानांत आला, व म्हणाला—

बाई, हा सारा गहजब पाहून आपण भांबावल्यासारख्या झालां आहांत. सारं तुम्हाला सांगायलाच हवं. त्याशिवाय कसं कळणार तुम्हाला !— त्याला रागा करायला तसंच कांहीं तरी जबरदस्त कारण"".!

' हें पहा, तो गृहस्थ ड्राफ्टमन आहे. घरादारांचे नकाशे त्याला तयार करावे लागतात. मी त्याच्या बरोबर काम करीत असतों. त्याचं नांव ब्लुम बर्गर.

—आपल्या शहरांत एक मोठा हॉल बांधण्यांत यायचा आहे. त्यासाठी नकाशा तयार करायला तो गेले तीन महिने अहोरात्र मेहनत करीत आहे. सरकारनं त्यासाठी मोठें बक्षिस जाहीर केलं आहे. ज्याचा नकाशा मंजूर होईल, त्याला तें बक्षिस आणि मान मिळणार होता...

—याच्या नकाशाची कच्ची रूपरेषा कालच तयार झाली. त्यानं बाऱ्या रेषा शाईनं कालच काढल्या. तुम्हाला माहित असेल, या लोकांना प्रथम पेन्सिलनं कच्चं स्केच करावं लागतं आणि सर्व मनाजोगतं झालं, म्हणजे मूठभर शिळ्या ब्रेडचे तुकडे घेऊन त्या नकाशावर घासायचे म्हणजे नकाशाचा मळका कागद स्वच्छ होतो आणि रेषा पुसट होऊन शाईनं काम करणं बरं जातं...रबरानं खोडण्यापेक्षा सारे ड्राफ्टमन शिळी ब्रेडच वापरतात या कामाला—

'—हा माझा दोस्त तुमच्या दुकानांतून ब्रेड घेत असे. मला वाटतं, गेले तीन चार महिने तो तुमचा गिऱ्हाइक होता. पण आज.. तुम्हालां सांगायला हवं का तुमच्या मनांत काय आलं, कुणास ठाऊक लोणी लावून का हीं कामं होतात–' आजच ब्रेडला लोणी लावायची तुम्हाला बुद्धि व्हावी–' त्यानं ती ब्रेड कागदावर घासली अन् झालं... त्या कागदाचा त्याला आता काडीमात्र उपयोग नाही....त्याची सारी तपश्चर्या, महत्वाकांक्षा, सारं सारं या तुमच्या लोण्यानं...राग येईल नाहीतर काय हो...?

मार्था सुन्न झाली. ती मुकाट्यानं आतल्या खोलींत गेली. अंगांतला निळ्या ठिपक्यांचा रेशमी ब्लाउझ काढून फेकला आणि पूर्वी वापरीत असलेला विटक्या तपकीरी रंगाचा अंगांत घातला. तीन महिने तिनं या ब्लाउझला स्पर्श केला नव्हता–

—आणि आता निळ्या ब्लाउझचा कांही उपयोग व्हायचा नव्हता.

केशवसुतांची स्वप्नसृष्टि

लेखांक ५ वा

श्रीराम अत्तरदे, एम्. ए.

● प्रस्तुत लेखमालेचा चौथा हप्ता फेब्रुवारी-अंकीं आला आहे. तिचा पाचवा व शेवटचा हप्ता या अंकांत प्रसिद्ध होत आहे.

या लेखमालेचा परामर्श घेणारा लेख कुणी पाठविल्यास त्याला 'युगवाणीं' त अवश्य स्थान देण्यांत येईल.

★

'मूर्तिभंजन' (९६) या कवितेंत प्रतीकवादाचा अवलंब करूनच, रूढींचा उच्छेद करणाऱ्या सुधारकाची कैफियत साध्या सुगम शब्दांत व पद्यविशेषांत परिणामकारक रीतीने पटवून दिलेली आहे. या कवितेंतील मूर्तिभंजक म्हणजे कुणीतरी देवळें फोडणारा 'बुत्‌शिकन्' नसून, प्रतीक उलगडून पाहतां, रूढींवर प्रहार करणारा बुद्धिप्रामाण्यवादीच आहे, एवंच तिच्यांतील मूर्ति ही परंपरेने चालत आलेल्या अन्याय्य रूढींचेंच प्रतीक आहे. ही रूढिरूपी मूर्ति फोडून तिच्यांतील ग्राह्य संपत्ति तेवढी घेऊन बाकीची टाकून द्यायची आहे, असें सांगण्यांत जुन्याचा ग्राह्यांशापुरता आदर करून नव्याकडे वळण्याची दृष्टीच कवींनी प्रतिपादलेली दिसते.

यानंतर १८९६ तें ९८ पर्यंतच्या दीड पावणेदोन वर्षांत कवींच्या मनांत आरंभींच्या काळांतून दिसून येणारी चिंतनावस्था पुन्हा सुरू झाल्याचें निदर्शनास येतें. या काळांतल्या कविता केवळ तात्त्विक व चिंतनपर आहेत. 'काव्यावाचून गुलाब नाहीं', 'रांगोळी घालतांना पाहून', 'तिने जातां चुंबिलें', 'रुष्ट सुंदरीस', 'काव्य कोणाचें', 'सुंदरी दर्शन' 'नैऋत्येकडील वारा', 'दवाचे थेंब', 'फार दिवसांनी भेट', 'कविच्या हृदयीं जसें गुंगती', 'मनोहारिणी', वगैरे या कविता मध्यकालीन आंग्ल निसर्ग प्रेमविषयक संप्रदायाच्याच अनुकरणांतून स्फुरलेल्या आहेत.

चिंतनपरतेच्या या दीडदोन वर्षांच्या मध्यकालानंतर फेब्रुवारी-मार्च १८९८ च्या सुमारास क्रांतिकारक ओजस्वितेने कवीच्या मनांत पुन्हा उचल खाल्लेली दिसते. कारण ८ मार्च १८९८ ला केलेली 'नवा शिपाई' ही कविता एकदम ठळकरीत्या उठून दिसणारी आहे. केशवसुतांच्या लढाऊ सुधारकत्वाचा उत्कट परिपोष तींत

झालेला आहे. या लढाऊपणाचा गाभा बुद्धिवाद हा असून नव्या भांडवलदारी (बूर्ज्वा) आर्थिक मूल्यानुसार व्यक्तिस्वातंत्र्य हा त्याचाहि पाया आहे. 'मनास माझ्या कुंपण पडणें अगदी न मला साहे' असें हा 'नवा शिपाई' म्हणतो, तें उगाच नव्हे. त्याचबरोबर, कवींच्या मनांत घर करून राहिलेला मनोराज्यमय (यूटोपियन) बंधुभावहि-

'जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत.
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत.'

या ओळींत फक्त झालेला आहे. याचाच परिपोष पाहायचा झाल्यास पुढील चरणांचा निर्देश करतां येईल.—

'पूजितसे मी कवणाला! तर पूर्जी मी अपुल्याला,
आपल्यामधे विश्व पाहुनी पूर्जी मी विश्वाला;
'मी' हा शब्दच मजला नलगे; संपुष्टी हे लोक
आणुन तो, निजशिरीं ओढिती अनर्थ भलते देख.
लहानमोठें मज न कळे,
साधुअधम हें द्वयहि गळे,
दूर-जवळ हा भाव पळे.
सर्वेच मोठें-साधु-जवळ, त्या सकळीं मी भरुनी राहें.'

शेवटीं कवि म्हणतात—

'शान्तीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहें!'

सरंजामदारी रूढाचारांवर व विचारप्रणालींवर हल्ला चढवतांनाच आवेशी व बंडखोर केशवसुत आपणांला प्रामुख्याने विलोभनीय वाटतात; तथापि निसर्गप्रेम, 'स्वर्ग' विषयक चुकीची तत्त्वप्रणील, वैयक्तिक दुःखवाद, मनोराज्यमय (यूटोपियन) समाजादर्श, वगैरे गोष्टींचे जे संस्कार त्यांच्यावर झालेले होते, ते कवितेंत या-ना-त्या शब्दांत व्यक्त होऊं लागले, म्हणजे वेगळेच केशवसुत आपल्यापुढे ठाकतात. हे केशवसुत प्रतिगामीच आहेत म्हणायला प्रत्यवाय नाही. आवेशी व बंडखोरपणाच्या कवितांनंतर याच संस्कारांचा वरपगडा झाल्यामुळे सामाजिक दुःखे व अन्याय यांविषयी चीड व्यक्त करणाऱ्या कवितांनाहि पुढेपुढे अत्यंत विपर्यस्त स्वरूप प्राप्त होत गेलें आहे. अखेरीस तर त्यांचें गूढगुंजनात्मक सर्वस्वीं भ्रामक व किंकर्तव्यतासमान स्त्रैण मनोवृत्तींत पर्यवसान झालेलें आढळतें. केशवसुतांच्या कवित्वलेखनाची ही ओहोटी होती, असें मानायला हरकत कसली? देहाने ते अपेक्षेहून लवकर वारले, हें खरें, तथापि त्यांचें युगप्रातिनिधिक काव्य लिहून होऊन त्याला दुसऱ्या टोकापर्यंत ओहोटी लागली होती; हें पाहतां त्यांचें कवित्वदृष्ट्या अवतारकार्य फारच अगोदर संपुष्टांत आलें होतें म्हणणें भाग आहे. 'नवा शिपाई' सारख्या कवितेंत बंडखोरपणाच्या अवसानाचा काव्यदृष्ट्या व शास्त्रीयदृष्ट्या घात करणारा गूढगुंजनी स्वरूपाचा मनोराज्यमय सृष्टिवाद आल्यामुळे त्या कवितेची केवढी हानि झालेली आहे, हें कुणाच्याहि लक्ष्यांत येईल. त्यानंतर तर कवीची चिन्तनशीलता फारच झपाट्याने वाढीला लागल्याचें दिसून येतें. कदाचित् वैयक्तिक दुःखांच्या दडपणाचा हा परिणाम

अनुक्रमणिका

असेल. तद्वतच मुंबईसारख्या शहरांत नव्या चळवळी व वाङ्मय यांच्या परामर्शामुळे मनाला मिळणारा दिलासा व संजीवन हींहि पुढे खानदेशांतल्या भडगाव-फैजपूर सारख्या सावकारी व्यवहाराच्या खेड्यांत मिळणें शक्य नसल्यामुळे कविमनावरील नैराश्याचें पटल अधिक दाट झालें असणें शक्य आहे. आर्थिक हलाखी, व्यवसायांतील खटाटोप व कंटाळवाणेपणा, सामाजिक जीवनांतील स्वारस्यहीनता, व्यासंगाच्या सोयींचा अभाव, गृहजीवनांतील निराशा, वगैरे यांचीं इतर कारणेंहि असूं शकतील. एवढें मात्र खरें की, सामाजिक दुःखें व अन्याय यांची जुगुप्सा मनांत कायम असली, तरी कवीचा बंडखोरपणाचा स्फुलिंग उत्तरोत्तर मालवला जाऊन चिन्तनशीलतेची, 'स्टोभिक' दुःखवादाची अवकळा कळींवर आली. यानंतरच्या कवितांपैकी 'सतारीचे बोल' व 'हरपलें श्रेय' या दोनच कविता कळींच्या तत्कालीन मनःस्थितीच्या व तत्त्वज्ञानाच्या द्योतक आहेत. 'सतारीचे बोल' या कवितेंत कवीच्या मनोराज्यमयतत्त्वज्ञानाला व निराशावादांतून उद्भवणाऱ्या स्वप्नाळु उदात्ततेला परिपक्व स्वरूप आलेलें आहे, तर 'हरपलें श्रेय' (१३१) या कवितेंत निराशावादाची शेवटची परिणति झालेली आढळते. या दुसऱ्या कवितेच्या आरंभीं कवि प्रस्तावांत म्हणतात उदात्त बुद्धीला संसारांत राम नाही. अलौकिक असें जें कांही तिला पाहिजे असतें, तें तिच्या हक्काचें असून देखील त्याच्या प्राप्तीसाठी तिला झुरत पडावें लागत नाही काय? वास्तविक, वस्तुस्थितीच्या ऐतिहासिक दृष्टिकोना ऐवजी मनोराज्यमय समाजादर्शाचीं स्वप्नें पाहणाऱ्या भ्रमिष्ट महाभागाच्या आयुष्यांची वा लेखनकर्तृत्वाची अशीच परिणति होणें अपरिहार्य नव्हे काय? वर्धिष्णु भांडवलदारी (बूर्ज्वा) आर्थिक मूल्यांनी निर्माण केलेल्या नव्या जमान्यांतील सरंजामशाहीविरोधी महान् कवीचा अशा रीतीने अधःपात झालेला पाहिल्यावर त्याचीं कारणें कळींच्या समाजजीवनविषयक चुकीच्या दृष्टिकोनांत व मध्यकालीन इंग्रजी काव्यसंप्रदायाच्या संस्कारांतच सापडतात हें नाकारतां येत नाही. केशवसुतांनंतर तांबे, गडकरी, बालकवि, रेंदाळकर रविकिरण-मंडळींच कांही कवि, ही सगळी प्रभावळ बूर्ज्वा समाजरचनेंतील या-ना-त्या वैचारिक व मानसिक दिशांची निदर्शक आहे.

'सतारीचे बोल' या कवितेबद्दल थोडें लिहिल्यास अप्रस्तुत होणार नाही. चुकीच्या तत्त्वज्ञानामुळे जीवनाच्या भावात्मक चित्रणाचा कसा विचका उडतो, याचें ही कविता एक उत्तम उदाहरण आहे.

रात्रींच्या एकान्तात खोलीबाहेर पडून गल्लींतून कवि हळूहळू फिरत चाललेला आहे; आधींच 'काळोख्याची रजनी,' तशांत 'हृदयीं भरल्या होत्या खंती,' असें असल्यावर कवींचें लक्ष्य 'अंधारांतच गढलें,' यांत शंका नाही. हृदयांतल्या या 'खंती' कोणत्या, तें कवींनी सांगितलेलें नाही; तथापि 'काय करावें, कोठें जावें; नुमजे मजला की विष खावें' अशी त्यांची मनःस्थिति दुसऱ्या कडव्यांत वर्णिलेली आहे, त्या अर्थी वैयक्तिक दुःखें वा आत्मलक्षी दृष्टींतून पाहिलेलीं सामाजिक दुःखें त्यांना व्यथित करीत होतीं म्हणावें लागेल. विशेषतः बहुसंख्य मानव व कवि दुःखांनी गांजलेले असतां ऐश्वर्याच्या तोऱ्यांत त्या भल्या रात्रीं माडीवरच्या खिडकींत आरामांत सतार वाजवीत बसलेल्या त्या 'खुशालचंदा'चा कवींना राग आला व त्याची ती पिरपीर बंद पाडण्यासाठी त्याला मूठ वळवून अपशब्दांची लाखोली ते वाहते झाले. 'खुशालचंद' ही सतार वाजवणाऱ्याची संभावना लक्ष्यांत घेतां, एकीकडे बहुसंख्य

रूढिग्रस्त, अन्यायदलित व दु:खी मानव, तर दुसरीकडे ऐश्वर्यात लोळणारे मूठभर प्रतिष्ठित खुशालचंद, असा देखावा त्यांच्या दृष्टिसमोर उभा होता खास, एवढ्या विस्तारानंतर कवि सामाजिक विषमतेबद्दल कांहीतरी क्रांतिकारक आदेश आपल्या कवितेंत देणार अशी आशा वळावूं लागते. केशवसुतांना सर्वकाळ 'क्रांतिकारक' म्हणणाऱ्या टीकाकारांनी ह्या व अशा त्यांच्या कवितांची मौलिकता व ऐतिहासिक मर्यादा लक्ष्यांत घेतलेल्या दिसत नाहीत. 'आंतिल विषण्णवृत्ती बाह्य भैरवीं घरि ते प्रीति' असें स्वत:च सांगूनहि आलेला खेद झटकून टाकून कवि एकदम जी गिरकी घेतात, ती थेट गूढगुंजनी ('गूढगुंजन' ही काय चीज आहे!) थाटाच्या मनोराज्यमय उदात्ततेच्या गर्तेत! 'खुशालचंदा' वर व त्याच्या सतारीवर दातओठ खाणारे कविमहाशय दोन पावलें पुढे गेले असतील नसतील तोंच त्यांच्या मनांतील अखेरपर्यंत वास्तव्य करणाऱ्या ध्येयवादी उदात्ततेने उचल खाल्ली व 'गति मम वळली तरि माघारी' असें कवींना म्हणावें लागलें. पहिल्या चार कडव्यांत वैयक्तिक वा सामाजिक दु:खें व खुशालचंदांची आतषबाजी यांमधील विरोध भावात्मक स्वरूपांत यथायोग्य व्यक्त केल्यावर पाचव्या कडव्यापासून अखेरपर्यंत कवींनी त्याच विषयावर अभावात्मक जीवनादर्शाचा बोळा फिरवून कवितेचा विचका उडवून टाकला आहे. अशा तऱ्हेच्या कवितांचें भांडवलदारी युगांतील अध:पतित मनोवृत्तींच्या (degenerate bourgeois tendencies) निदर्शक असें वर्णन करणेंच योग्य होईल.

सतारीकडे ओढले जाऊन माघारी फिरलेले कवि

'तेथ कोपरें अंकीं टेकुनि
करांजलीला मस्तक देउनि
बसलों; इतुक्यामाजी करूणा—
रसपूर्ण गती माझ्या श्रवणां-
आकर्षुन नें, ...'

असें स्वस्थितीचें वर्णन करतात. यानंतर 'व्हायचें तेंच झालें!'— 'हृदय निवालें, तन्मय झालें, द्रवलें; आलें लोचनांतुनी तोय कितिकदा ऐकत असतां दिडदा दिडदा'!!

यानंतर सतारीचे बोल कवींना 'आशाप्रेरक' वाटूं लागले. दु:खांच्या व विषमतेच्या भावात्मक चित्रणांतून निर्माण होणारी 'क्रांतिकारकते' ची द्योतक अशी मन:स्थिति नष्ट करणारा दृष्टिकोन आशावादी वा 'आशाप्रेरक' कसा, हेंच कळत नाही. भोवताली पाहात असेपर्यंत सर्वत्र निराशेचा अंधार वाटत होता, परंतु केशवसुतांच्या आवडत्या 'स्वर्गा'च्या दिशेकडील ताऱ्यांवर नजर जातांच त्यांना 'तम अल्प, द्युति बहु' या 'तत्त्वा'ची ओळख पटली व वाद्यांतून अधिकाधिकच उदात्त सुस्वर त्यांना ऐकूं येऊं लागले. दु:खांवर व विषमतेवर आधारलेल्या ज्या समाजावस्थेंत प्रत्यक्षच 'द्युतिअल्प' (किंबहुना ती नाहीच), तम बहु' अशी वस्तुस्थिति आहे, तिच्या जागीं कवींना 'तम अल्प, द्युति बहु' असा 'साक्षात्कार' होतो, याचा अर्थ काय? दु:खी, गांजलेल्या, पददलित, सामाजिक मनाने प्रस्तापित (existing) समाजव्यवस्थेंतच 'खरें पाहतां' तम अल्प असून द्युतीच विपुल आहे, असें म्हणणें हा कोणत्या गावचा क्रांतिकारकपणा? मग

चोखामेळा, बहिणाबाई, महीपति, वगैरे लोकांनी तरी काय वे

सांगितलें होतें ! संपुष्टांत आलेल्या इंग्रजी काव्यसंप्रदायांचा वा मराठी संतांच्या सरंजामदारी तत्त्वप्रणालीचा कवींवर उरलेला व शेवटपर्यंत प्रभावी ठरलेला जो संस्कार होता, त्यांचेंच प्रतिपादन प्रस्तुत कवितेंत ५ व्या कडव्यापासून आलेलें आहे. प्राप्त विषम परिस्थितींतहि उदात्ततेचाच आविष्कार अधिक आहे, असें मानणारांना वा बाह्य ध्येयसृष्टीकडे धाव घेणाऱ्या 'जीवनात्पलायनवादी' (escapist) स्वप्नाळूंना, आधी त्वेषानें भारणाऱ्या 'तारीच्या बोलांच्या श्रवणानें नंतर 'सुरांगना तों नाचति भूवर' एवढेंच नव्हे, तर 'स्वर्गधरेला चुंबायाला खाली लवला' अशी भुताटकी दिसूं लागली, तर आश्चर्य नव्हे ! अशा उसन्या व भ्रामक उदात्ततेने भारलेल्या त्या 'शान्त शान्त' समयीं कवि घरीं आले, म्हणून बरें, नाहीं तर या अघोमार्गी 'बूर्ज्वा' विचारसरणीचें पर्यवसान कुठल्या ब्रह्मज्ञानांत झालें असतें, तें कवींच्या 'स्वर्गा' तील 'तुंबळ संग्रामातें' करणारे 'सुर'च जाणोत !

तथापि आधुनिक महाराष्ट्रांतील वर्धिष्णु भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक काळांतील प्रतिनिधिक अशा व्यक्तीच्या, सरंजामशाही विरोधी तत्वप्रणालीवरील विश्वास नष्ट होऊन स्वप्नाळू उदात्ततेंत त्यांचें पर्यवसान करणाऱ्या, अधःपाती (degenerate) मानसिक अवस्थेचे द्योतक म्हणून 'सतारीचे बोल' व 'हरपलें-श्रेय' या कविता निर्देशितां येतील. 'हरपले श्रेय' या कवितेंत अशा भ्रामक तात्त्विक बैठकीच्या मनुष्याची होणारी अनुकंपनीय अवस्थाच पदोपदीं प्रतीत होते. 'तात्त्विक' दृष्ट्या ही कविता कवींच्या अत्युत्कृष्ट कवितांत मोडते, असें म्हणणारेहि महाभाग महाराष्ट्रांत आहेत ! 'द्वन्द्वां'च्या पलीकडे गेलेल्या (?) 'मुमुक्षु' जनांच्या 'मानसिक उत्कण्ठेचें व तळमळीचें वर्णन या गीतांत आहे;' त्याचप्रमाणे, या 'गीतामध्ये जीवात्म्याची तळमळ केशवसुतांनी वर्णन केलेली आहे' वगैरे निरर्थक विधानें या व अशाच कवितांबाबत अनेकवेळां करण्यांत आलेलीं आहेत. परंतु मानवजीवनाच्या ऐतिहासिक विरोधविकासी दृष्टिकोनांतून पाहतां, केशवसुत ज्या आर्थिक व सामाजिक मूल्यांच्या विशिष्ट टप्प्यावरील प्रभावी कवि आहेत, असें म्हणावें लागतें, त्यांतून निर्माण होण्याऱ्या कांही साधकबाधक वैचारिक पंथांच्या कमीअधिक प्रभावाप्रमाणें कवींच्या काव्यांचें मूल्यमापन केलें, तरच तें वास्तवदर्शी होऊं शकेल.

'बूर्ज्वा', 'भांडवलदारी', 'सरंजामदारी' वगैरे शब्दांना शिव्यांचें स्वरूप आलेलें आहे, असा कित्येकांचा समज असतो, ही जाणीव प्रस्तुत लेखकाला आहे; तथापि अटीतटीच्या सामाजिक व राजकीय संघर्षांच्या धुमश्चक्रीच्या वेळेस या शब्दांचे अर्थ कधी कधी या स्वरूपाचे होऊं शकतात, हें मान्य असूनहि मला असें म्हणावेंसें वाटतें की, या संज्ञाबाबत मार्क्सवाद्यांची वा विरोधविकासी भौतिकवादाच्या पुरस्कर्त्यांची भूमिका शास्त्रीय परिभाषेच्या दृष्टीची असून त्यांना त्या त्या युगांतील प्रारंभिक काळांत विधायक व नंतरच्या काळांत हानिकारक (पिळणुकीवर आधारल्यामुळे) असे दोन्ही प्रकारचे लक्षणार्थ संभवतात. केशवसुतांना 'बूर्ज्वा' (भांडवलदारी) जमान्याचे प्रभावी उद्गाते म्हटलें, याबाबत अशा पूर्वग्रहदूषित टीकाकारांचा रोष होईल, परंतु एवढे या ठिकाणीं सांगितलें पाहिजे की, सरंजामदारी अवस्थेहून भांडवलदारी अवस्था अधिक प्रगत व म्हणून क्रांतिकारक स्वरूपाची असते, अतएव, केशवसुतांच्या बाबतींत याच गोष्टींचा विचार केलेला आहे. भांडवल-

शाहीचे प्रगतिपर अवतारकार्य संपून ती उच्चाटनास पात्र ठरते, अशा कालखंडाशीं केशवसुतांचा संबंध पोचत नाही, आजच्या कवींचा पोचतो. अर्थात् सरंजामदारी अवस्थेशीं तुलना करतां व तिचें उच्चाटन करण्याचें क्रांतिकारक कार्य लक्षांत घेतां भांडवलशाहीच्या वर्धिष्णु व प्रगतिपर अशा अवस्थेंतील सामाजिक व राजकीय वैचारिक युगाचें प्रतिनिधित्व इतर गद्यलेखक व समाजसुधारक यांच्या बरोबरच केशवसुतांकडेहि येतें. प्रतिगामी विचारसरणीचे आदर्शाचे जे संस्कार त्यांच्यावर झालेले होते, त्यामुळे त्यांच्या कोणत्या कविता तौलनिक अर्थानें क्रांतिकारक नाहीत, प्रगतिपर भांडवलदारी अवस्थेंत त्यांचें प्रतिगामित्व व अधोमार्गित्व कसें कबूल करावें लागतें, हें सांगितलेंच आहे. केशवसुतांची निंदा वा स्तुति करायचा मानस नाहीं. केवळ मार्क्सवादी दृष्टिकोनांतून त्यांच्या काव्याचें जसें स्वरूप दिसलें, तसें तटस्थवृत्तीनें सांगण्याचा प्रयत्न केला आहे. असे (मार्क्सवादी) प्रयत्न मराठींत प्रस्तुत कवींच्या बाबतींत झालेले नसल्यामुळें माझ्या प्रयत्नांत अर्धवटपणा वा कांही दोष यांचा प्रादुर्भाव झालेला असेल; तथापि दोषाचा परिहार करणें हेंहि आवश्यकच आहे.

या विवेचनांतून कांही वाचक अशी शंका काढतील कीं, कवींच्या काव्यांत मानव जीवनविषयक दृष्टिकोनापलिकडे दुसरें काहीएक नसतें कीं काय? रस, अलंकार, शैली, औचित्य वगैरे गोष्टींना कांहींच महत्त्व नाही की काय! याबाबतींत मला स्पष्टपणें सांगायचें आहे की, रस, अलंकार, शैली वगैरे गोष्टींना मार्क्सवादी गौण लेखीत नाहीतच, उलट त्यांचा 'उदोउदो' करून 'कलेसाठी कला' या सारख्या विचारसरणींचा डांगोरा पिटणाऱ्या साहित्यमुखंडांतून मार्क्सवाद्यांना रसालंकारादिकांची अधिक मातबरी वाटते. वाङ्मय, विशेषत: ललित वाङ्मय हें 'उत्तम' असलें पाहिजे, रसालंकारादि गोष्टींच्या सम्यक् अवलंबाने तें खरेंखुरें आनंददायक व हृदयसंवेदी झालेलें पाहिजे, परंतु साहित्यशास्त्रदृष्ट्या असलेलें वाङ्मय प्रगतिपर व प्रतिगामी अशा दोन्ही प्रकारांचें असूं शकतें, आणि इथेच मार्क्सवादी अत्यंत कठोरपणाने विचारसरणींची चिरफाड करायला आग्रहाने ठाकतात. ललित वाङ्मय 'उत्तम' तसेंच प्रगतिपरहि असलें पाहिजे, असा त्यांचा आग्रह असतो व तो योग्यहि आहे. वाङ्मय ही अेक शक्ति आहे, तिच्या द्वारें जीवनाचें भावात्मक चित्रणच वाचकांपुढे आलें पाहिजे, यांत शंका नाही. 'भावात्मकते'बद्दल व 'प्रगती' बद्दल मार्क्सवाद्यांचें जें शास्त्र आहे तें, मानवी जीवनाच्या स्वाभाविक विकासाचें शास्त्र आहे; तें प्रयोग करण्यासाठी निर्माण झालेलें वा एखाद्या महाभागाच्या डोक्यांत स्फुरून जगाला त्यावर हुकूम बदलण्यासाठी 'तयार केलेलें' (Cooked up) नव्हे. मानवी जीवन जसें बदलत आलें आहे व सांप्रतच्या भांडवलदारी व साम्राज्यशाही अवस्थेंत जे अंतर्विरोध असल्यामुळे त्यांच्याहि उच्चाटनांतून स्वभावत:च जी नवी घडी बसायची आहे, त्या सगळ्या गोष्टींचें सरळ कथन तें शास्त्र करतें. त्या दृष्टीनें तें सगळ्यांत अधिक वास्तवताप्रधान शास्त्र आहे. मानवी इतिहासाचें व वर्तमानकालीन समाजव्यवस्थेचें पृथक्करण करून शास्त्रदृष्ट्या आपोआप निघणारे सिद्धांतच तें प्रतिपादितें. सांगण्यांतला मुद्दा एवढाच कीं, ललितवाङ्मय हें प्रगतिपर व 'उत्तम' असावें, असा उचित आग्रह मार्क्सवादी मांडीत असतात. केशवसुतांच्या काव्याच्या साहित्यशास्त्रविषयक गुणदोषांचा

परामर्श पुष्कळांनी, विशेषतः फारसे मतभेद न होतां, घेतलेला असल्यामुळे विस्तारभयास्तव तें कार्य मी वगळलें आहे. वाङ्मयगुणांची कदर ही बाळगलीच पाहिजे. याबाबत जॉन स्ट्राची यांचे विचारच नमूद करायला हरकत नाही—

(वाङ्मयाची मार्क्सवादी दृष्टिकोनांतून चिकित्सा करतांना) ग्रॅनविल हिक्स पुष्कळ वेळा एक मोठी चूक करतो. पुष्कळशा मार्क्सवादी टीकाकारांकडून नकळत ही चूक होत असते. हिक्स हा लेखकाच्या लेखनगुणांकडे फारसें लक्ष्य देत नाही, ही ती चूक होय. लेखनगुणांचें महत्त्व कधीहि नाकारून चालणार नाही आणि अमेरिकेंतील सर्वांत मोठा मार्क्सवादी टीकाकार या नात्याने हिक्सने वाङ्मयाच्या सौन्दर्यगुणांकडे वारंवार दुर्लक्ष करणें ही तर अत्यंत शोचनीय गोष्ट म्हटली पाहिजे. खरें पाहतां, गेल्या चारशे वर्षांत जगांत भांडवलदारी (बूर्ज्वा) वर्गाच्या प्रभावाखालीं कला व वाङ्मय या क्षेत्रांत जी आत्यंतिक प्रगति झालेली आहे (तिच्याकडे दुर्लक्ष करणें तर दूरच राहो, उलट), तिच्यांत जास्तींत जास्त प्रावीण्य मिळवणें हें मार्क्सवादी टीकाकारांचें फार महत्त्वाचें कर्तव्य आहे. बूर्ज्वा संस्कृति ही आता अपूर्व गतीने नाशाच्या मार्गाने चाललेली आहे. तेंव्हा ज्यांनी नव्या जगाची उभारणी करण्याचें कंकण हातीं बांधलें आहे, त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. मानवी संस्कृतीचा हा परंपरेने प्राप्त झालेला ठेवा नष्ट होत चाललेल्या जुन्या जगांतून नव्या जगाच्या हवालीं करणें हें केवळ मार्क्सवादी क्रांतिकारक लेखकांचें व कलावंतांचेंच कर्तव्य आहे. नाहींतर, बूर्ज्वा संस्कृतींतील हीं चांगलीं फळें फासिस्ट शक्तींकडून झपाट्याने नष्ट केलीं जातील. (फासिस्ट) इटालींत व जर्मनींत 'सुसंस्कृत' जीवन जगणें अशक्यप्राय होऊन बसलें आहे. (आणि या भस्मासुरास आळा न घातल्यास आजच्या सर्व भांडवलदारी देशांत संस्कृतीचें तेंच भवितव्य होणार, हें निश्चित. कामगारक्रांतीचें तत्त्व स्वीकारण्यास नाखूष असलेल्या सर्व लेखकांना भयंकर निराशावाद ग्रासल्याशिवाय राहणार नाही. (भांडवलदारी संस्कृतीचा हा ठेवा पुढील नव्या जगाला देण्याचें कार्य मार्क्सवाद्यांचेंच आहे.) (फासिझम् ॲन्ड कल्चर-जॉन स्ट्राची पृष्ठ ६२-६३; इंडिया पब्लिशर्स, अलाहाबाद)

केशवसुतांबाबत मी केलेल्या विवेचनाविषयीं वाचकांनी हाच व मागें सांगितलेला दृष्टिकोन अवलंबिल्यास कवींना दूषण देण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत मुळींच केलेला नाहीं, हें दिसून येईल.

साहित्यसमालोचन
संपादक

प्रकाशकः— श्री. वि. दामले, एन्. के. पब्लिशिंग हाऊस,
६२७ बुधवार पेठ, पुणें. २.

१ पुसलेलीं चित्रें (ले. सौ. सुधा साठे, बी. ए., बी. टी., किं. रु. ४||)– साहित्यिक असलेल्या विद्याधराशी नलिनी लग्न करते; पण ती सुशिक्षित असूनहि तिला लेखनकला जमत नाही. ललिता नामक तिच्या मैत्रिणीला लेखनकला अवगत असते व ललिता आणि विद्याधर हीं परस्परांकडे आकृष्ट होतात. यामुळे नलिनी मत्सराने जळूं लागते. पुढे ललिता आजारी पडून मरण पावते व त्या दुःखाने नलिनीला सहजगत्या सुंदर लेखन करतां येतें– अशा प्रकारची कथा या कादंबरींत रंगवण्यांत आली आहे. सौ. साठे या मनोविश्लेषणांत तरबेज आहेत व त्यांचे भाषे-वरहि प्रभुत्व आहे. यामुळे ही कादंबरी साधी असूनहि वाचनीय झाली आहे. ललिता-पांडोबा व बापूसाहेब यांची स्वभाव चित्रें मला विशेष आवडलीं. सौ. साठे यांज-कडून पुष्कळ अपेक्षा या कादंबरीमुळे उत्पन्न होतात, एवढें त्यांच्या निदर्शनास आणावेंसें वाटतें.

२ औट घटकेचें राज्य (ले. शं. गो. साठे, बी. ए., एल्एल्. बी., किं. रु. ३) भार्गव नामक वादनपटूशी इंदु लग्न करते. लग्नानंतर ती त्याला स्वतःच्या–म्हणजेच संसाराच्या पाशांत अडकवूं पाहते. पण आपल्या कलेतच पूर्णपणें गढलेला भार्गव इंदूच्या प्रेमपाशांतून सर्वस्वी निसटतो व बिचाऱ्या इंदूला एकाकी जीवन घालवावें लागतें—ही साधीच कथा या कादंबरींत रा. साठे यानी अप्रतिम कौशल्याने मांडली आहे. भार्गवाचें स्वभावचित्र मराठी कथावाङ्मयांत अविस्मरणीय असें गणलें जाईल. या कादंबरीने मराठींत उत्कृष्ट पुस्तकाची भर पडली आहे.

३ प्रीतिपथावर (सौ. पद्मा, बी. ए., किं. रु. २)—या काव्यसंग्रहांत कवयित्री 'पद्मा' यांच्या ८१ कविता संगृहीत केलेल्या आहेत. प्रणयाचे इतके विविध पैलू मराठी कवितेंत यापूर्वी कुणीच दाखविले नव्हते. या दृष्टीने 'पद्मा' यांच्या या संग्रहास मराठी काव्य वाङ्मयांत स्वतंत्र स्थान प्राप्त होत आहे. कवयित्रीचें भाषा व छंद यावरील प्रभुत्वहि वाखाणण्याजोगें आहे.

४ जुन्या जखमा (ले. भालचंद्र लाड, बी. ए., एल्.एल्. बी. किं. रु. २||) या पुस्तकांत रा. लाड यांच्या पंधरा लघुकथा आलेल्या आहेत. लेखकाचा नवशिके-पणा सर्वच लघुकथांवरून दिसून येतो ! उदा० 'तिनें असें का केलें ! या कथेंतील इंदु केवळ पतीकरता - स्वतः करता नव्हे ! वसंताकडून प्रजोत्पादन करून घेते म्हणे!! संग्रहांतील कोणतीच लघुकथा मनाची पकड घेत नाहीं !

५ वृत्तें व अलंकार (ले. प्रा. वि. म. कुलकर्णी, एम्. ए. किं. ।||') या चिमुकल्या पुस्तकांत कांही वृत्ते व अलंकार यांची सोदाहरण माहिती दिलेली आहे. प्रा. कुलकर्णी हे वृत्तांबाबत कै. प्रा. माधवराव पटवर्धन यांचेच अनुकरण करतात. पण माधवरावांच्या सिद्धांतांस अनेक विद्वान आक्षेप घेतात, हें त्यांच्या लक्ष्यांत असेलच. विशेषतः कांही जुन्या वृत्तांची परंपरागत रूढ नांवें बदलून कै. पटवर्धनांनी

काय साधलें, हेंच कळत नाही! खुद्द प्रा. कुलकर्णी हे 'साकी'ला साकीच म्हणतात, पटवर्धनांप्रमाणें 'लवंगलता' म्हणत नाहीत, यावरून त्यांनाहि पटवर्धनांची सारींच नांवें बदलण्याची खटपट मान्य नसावी, असें दिसतें!—पुस्तक विद्यार्थ्यांस उपयुक्त आहे.

६ संगीत काहूर नाटक (ले. सौ. उमाबाई सहस्रबुध्दे, किं. रु. १॥) केवळ संवादांमुळे 'नाटक' नामक वाङ्मयप्रकार सिद्ध होऊं शकत नाही, याची लेखिकेस जाणीव नसावी, असें दिसतें! पुस्तक अगदी सुमार आहे.

७ तपस्वी परांजपे चरित्र (ले. स. ह. बल्लाळ, प्र. त्र्यं. स. बापट वकील, चिटणीस तपस्वी परांजपे चरित्र मंडळ, यवतमाळ किं. रु. ४) तपस्वी बाबासाहेब परांजपे हे जुन्या पिढींतील महान् देशभक्त म्हणून प्रसिध्द आहेत. विशेषत: वऱ्हाड प्रांताला देशभक्तीची दीक्षा देणारे तेच पहिले कार्यकर्ते होते, या दृष्टीनें त्यांची योग्यता अनन्यसाधारण आहे. अशा थोर व्यक्तीचें हें साधार व सुंदर चरित्र माजी 'लोकमत' कर्ते रा. बल्लाळ यांच्या सारख्या सराईत लेखकाने लिहिलेलें आहे. पुस्तकाला बिहारचे हल्लीचे गव्हर्नर नामदार अणे यांची मार्मिक प्रस्तावना जोडलेली आहे. या पुस्तकाने मराठींत एक उत्तम चरित्रग्रंथाची भर पडली आहे.

८ यावलीचा स्वातंत्र्य-संग्राम (ले. वैद्य ह. वा. देशपांडे, प्र. वीर पंजाबराव यावलीकर, अध्यक्ष यावली शहीद स्मारक समिति, यावली, ता. अमरावती, वऱ्हाड किं. रु. ६)-१९४२ च्या 'चले जाव'च्या आंदोलनांत उमरावती तालुक्यांतील यावली या चिमुकल्या गांवीं तेथील स्वातंत्र्यप्रेमी जनता व तत्कालीन परकीय नोकरशाही यांच्या ज्या झटापटी झाल्या, त्यांचा रोमांचकारक इतिहास या पुस्तकांत रा. हरिहरराव देशपांडे यांच्या सारख्या खंद्या लेखकाने या पुस्तकांत दिलेला आहे. तो वाचून यावलीच्या बहाद्दर स्वातंत्र्यवीरांपुढे कुणाचेंहि मस्तक नम्र झाल्यावाचून राहणार नाही! पुस्तकांत अनेक चित्रें दिलेलीं असून शिवाय वीर वामनराव जोशी यांची ओजस्वी प्रस्तावना देण्यांत आली आहे.

संपादकीय

चालू जोड-अंक

'युगवाणी'चा प्रस्तुत अंक एप्रिल व मे या दोन महिन्यांचा जोड-अंक म्हणून काढावा लागत आहे, याबद्दल वाचकांनी क्षमा करावी. छापखान्याच्या अडचणींमुळे जोड-अंक काढणें अपरिहार्य झालें. छापखान्यांचा ज्यांना अनुभव आहे, त्यांना छापखान्यांतील अडचणी पुष्कळदा कशा आकस्मिक व अपरिहार्य असतात, याची पूर्ण कल्पना असते. तेव्हा इच्छा नसतांहि एखाद वेळेस जोड-अंकाचा अवलंब करावा लागल्यास निदान अनुभविकांना तरी आश्चर्य वाटावयास नको.

या अंकांत जास्त मजकूर देऊन अंशत: भरपाई करण्याचा प्रयत्न केला आहे.

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी
सरचिटणीस
वि. सा. संघ यांजकडून

ता. ७-३-४८ रोजीं अमरावती येथे भरलेल्या सभा

वार्षिक साधारण सभा

ता. ७-३-४८ रोजीं अमरावती येथे न्यू हायस्कूलमध्ये भरलेल्या वार्षिक साधारण सभेंत नवीन संघाध्यक्ष प्रा. वि. भि. कोलते यांना केलेल्या अधिकार-प्रदानाचा वृत्तान्त ' युगवाणी 'च्या मार्च ४८ च्या अंकांत देण्यांत आलाच आहे. त्या सभेंत याशिवाय इतर जें महत्त्वाचें कामकाज झालें त्याची माहीती खालीं देण्यांत येत आहे.

घटना दुरुस्ती

या सभेंत घटनेंत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यांत आली.

नियम ११—दर्यापूर येथील संमेलनांत दुरुस्त झालेला नियम—

" संघाची वार्षिक साधारण सभा संमेलनाच्या ठिकाणीं खुलें अधिवेशन भरण्यापूर्वी भरवावी व तींत संघाचा वार्षिक अहवाल व जमाखर्च सभासदांपुढे मंजुरीकरिता मांडण्यांत यावा. याच सभेंत आधीचे अध्यक्ष नवीन अध्यक्षांस अधिकारप्रदान करतील व तदनंतर भरणारें संमेलन हें नवीन वर्षाचें व नवीन निवडलेल्या संघाध्यक्षाच्या अध्यक्षतेखालीं भरेल. "

ता. ७-३ ४८ रोजीं वरील नियमांत झालेली दुरुस्ती:—'तदनंतर ... हे शब्दांऐवजीं " तदनंतरच्या डिसेंबर महिन्यांत भरणारें संमेलन हें चालू वर्षाचें संमेलन चालू वर्षाच्या सभासदांनी निवडलेल्या संघाध्यक्षाच्या अध्यक्षतेखालीं भरेल. " हे श

नियम २७ खालील प्रमाणें वाचावा:—

" संघाध्यक्षाची निवडणूक संघाच्या सर्व सभासदांकडून सतत सभासदांमधून स्वतंत्र रीतीने केली जाईल. या शिवाय कार्यकारी मंडळा संघाच्या सर्व सभासदांकडून सतत दोन वर्षें असलेल्या संघसभासदांतू

नियम ३७ मध्ये " शाखासभेच्या सभासदामागे प्रत्येकी " शाखासभेच्या पहिल्या वर्षाच्या सभासदामागे प्रत्येकीं आठ आणे मागे प्रत्येकी १ रु. " असे शब्द घालावें.

वरील प्रमाणे घटना दुरुस्ती झाल्यानंतर वि. सा. सं जमाखर्च सभासदांपुढे मंजुरीकरिता ठेवण्यांत आला व तो मंजूर ' युगवाणी ' त स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यांत येईल.

कार्यकारी मंडळाच्या सभेंतील

ता. ७-३-४८ रोजीं जुन्या व नव्या कार्यकारी मं स्कूलमध्ये भरली. तींत अध्यक्षाखेरीज इतर पदाधिकाऱ्यां अंकीं आलाच आहे. त्याशिवाय खालील प्रमाणे महत्त्वा

१. वि. सा. संघाचा १९४७ चा अहवाल व ज

२. संघाचे सभासद वाढविण्याची मोहीम स
निदान २५ नवे सभासद जून अखेर पर्यं

३. यंदा डिसेंबरमध्ये भरणाऱ्या वि. सा. सं
साजरा करावा असा निर्णय घेण्यांत

४. खालील सभासदांची " संस्कृत ग्रंथ
प्रा. ग. त्र्यं. देशपांडे (आमंत्रक) अमराव

प्रि. ह. ना

विदर्भ साहित्य सं

वि. सा. संघाच्या का. मं. चे स

किंमत ८ अ

काय साधलें, हेंच कळत नाही! खुद्द प्रा. कुलकर्णी हे 'साकी 'ला साकीच म्हणतात, पटवर्धनांप्रमाणें 'लवंगलता' म्हणत नाहीत, यावरून त्यांनाहि पटवर्धनांची सारींच नांवें बदलण्याची खटपट मान्य नसावी, असें दिसतें!—पुस्तक विद्यार्थ्यांस उपयुक्त आहे.

६ संगीत काहूर नाटक (ले. सौ. उमाबाई सहस्रबुद्धे, किं. रु. १॥) केवळ संवादांमुळे 'नाटक' नामक वाङ्मयप्रकार सिद्ध होऊं शकत नाही, याची लेखिकेस जाणीव नसावी, असें दिसतें! पुस्तक अगदी सुमार आहे.

७ तपस्वी परांजपे चरित्र (ले. स. ह. बल्लाळ, प्र. त्र्यं. स. बापट वकील, चिटणीस तपस्वी परांजपे चरित्र मंडळ, यवतमाळ किं. रु. ४) तपस्वी बाबासाहेब परांजपे हे जुन्या पिढींतील महान् देशभक्त म्हणून प्रसिध्द आहेत. विशेषत: वऱ्हाड प्रांताला देशभक्तीची दीक्षा देणारे तेच पहिले कार्यकर्ते होते, या दृष्टीनें त्यांची योग्यता अनन्यसाधारण आहे. अशा थोर व्यक्तीचें हें साधार व सुंदर चरित्र माजी 'लोकमत' कर्ते रा. बल्लाळ यांच्या सारख्या सराईत लेखकाने लिहिलेलें आहे. पुस्तकाला बिहारचे हल्लीचे गव्हर्नर नामदार अणे यांची मार्मिक प्रस्तावना जोडलेली आहे. या पुस्तकाने मराठींत एक उत्तम चरित्रग्रंथाची भर पडली आहे.

८ यावलीचा स्वातंत्र्य-संग्राम (ले. वैद्य ह. वा. देशपांडे, प्र. वीर पंजाबराव यावलीकर, अध्यक्ष यावली शहीद स्मारक समिति, यावली, ता. अमरावती, वऱ्हाड किं. रु. ६)-१९४२ च्या 'चले जाव'च्या आंदोलनांत उमरावती तालुक्यांतील यावली या चिमुकल्या गांवीं तेथील स्वातंत्र्यप्रेमी जनता व तत्कालीन परकीय नोकरशाही यांच्या ज्या झटापटी झाल्या, त्यांचा रोमांचकारक इतिहास या पुस्तकांत रा. हरिहरराव देशपांडे यांच्या सारख्या खंद्या लेखकाने या पुस्तकांत दिलेला आहे. तो वाचून यावलीच्या बहाद्दर स्वातंत्र्यवीरांपुढे कुणाचेंहि मस्तक नम्र झाल्यावाचून राहणार नाही! पुस्तकांत अनेक चित्रें दिलेलीं असून शिवाय वीर वामनराव जोशी यांची ओजस्वी प्रस्तावना देण्यांत आली आहे.

संपादकीय

चालू जोड-अंक

'युगवाणी'चा प्रस्तुत अंक एप्रिल व मे या दोन महिन्यांचा जोड-अंक म्हणून काढावा लागत आहे, याबद्दल वाचकांनी क्षमा करावी. छापखान्याच्या अडचणींमुळे जोड-अंक काढणें अपरिहार्य झालें. छापखान्यांचा ज्यांना अनुभव आहे, त्यांना छापखान्यांतील अडचणी पुष्कळदा कशा आकस्मिक व अपरिहार्य असतात, याची पूर्ण कल्पना असते. तेव्हा इच्छा नसतांहि एखाद वेळेस जोड-अंकाचा अवलंब करावा लागल्यास निदान अनुभविकांना तरी आश्चर्य वाटावयास नको.

या अंकांत जास्त मजकूर देऊन अंशत: भरपाई करण्याचा प्रयत्न केला आहे.

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी
सरचिटणीस
वि. सा. संघ यांजकडून

ता. ७-३-४८ रोजीं अमरावती येथे भरलेल्या सभा

वार्षिक साधारण सभा

ता. ७-३-४८ रोजीं अमरावती येथे न्यू हायस्कूलमध्ये भरलेल्या वार्षिक साधारण सभेंत नवीन संघाध्यक्ष प्रा. वि. भि. कोलते यांना केलेल्या अधिकार-प्रदानाचा वृत्तान्त 'युगवाणी 'च्या मार्च ४८ च्या अंकांत देण्यांत आलाच आहे. त्या सभेंत याशिवाय इतर जें महत्त्वाचें कामकाज झालें त्याची माहिती खालीं देण्यांत येत आहे.

घटना दुरुस्ती

या सभेंत घटनेंत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यांत आली.

नियम ११—दर्यापूर येथील संमेलनांत दुरुस्त झालेला नियम—

" संघाची वार्षिक साधारण सभा संमेलनाच्या ठिकाणीं खुलें अधिवेशन भरण्यापूर्वी भरावी व तींत संघाचा वार्षिक अहवाल व जमाखर्च सभासदांपुढे मंजुरीकरितां मांडण्यांत यावा. याच सभेंत आधीचे अध्यक्ष नवीन अध्यक्षांस अधिकारप्रदान करतील व तदनंतर भरणारें संमेलन हें नवीन वर्षाचें व नवीन निवडलेल्या संघाध्यक्षाच्या अध्यक्षतेखालीं भरेल. "

ता. ७-३ ४८ रोजीं वरील नियमांत झालेली दुरुस्ती:—'तदनंतर ... हे शब्दांऐवजीं " तदनंतरच्या डिसेंबर महिन्यात भरणारें संमेलन हें चालू वर्षाचें संमेलन चालू वर्षाच्या सभासदांनी निवडलेल्या संघाध्यक्षांच्या अध्यक्षतेखालीं भरेल. " हे श

नियम २७ खालील प्रमाणें वाचावा:—

" संघाध्यक्षाची निवडणूक संघाच्या सर्व सभासदांकडून सतत . दे व उ
सभासदांमधून स्वतंत्र रीतीने केली जाईल. या शिवाय कार्यकारी मंडळा नच निव
संघाच्या सर्व सभासदांकडून सतत दोन वर्षें असलेल्या संघसभासदांतू १ रु. "

नियम ३७ मध्ये " शाखासभेच्या सभासदामागे प्रत्येकी व दुसऱ्या
" शाखासभेच्या पहिल्या वर्गाच्या सभासदामागें प्रत्येकीं आठ आणे
मागे प्रत्येकी १ रु. " असे शब्द घालावें.

वरील प्रमाणे घटना दुरुस्ती झाल्यानंतर वि. सा. संघाचा १९४७ झाला. हा अहवा
जमाखर्च सभासदांपुढे मंजुरीकरितां ठेवण्यात आला व तो मंजूर
'युगवाणी 'त स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यांत येईल.

कार्यकारी मंडळाच्या सभेंतील कामकाज

मंडळाची सभा अमरावती रे
ता. ७-३-४८ रोजीं जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाच्या झालेल्या निवडणुकीचा वृत्त.
स्कूलमध्ये भरली. तींत अध्यक्षांखेरीज इतर पदाधिकाऱ्यांचे कामकाज या सभेत झालें.
अंकीं आलाच आहे. त्याशिवाय खालील प्रमाणे महत्त्वा
माखर्च मंजूर झाला.

१. वि. सा. संघाचा १९४७ चा अहवाल व ज
सुरू करून, का. मं. च्या प्रत्येक सभासदा.
२. संघाचे सभासद वाढविण्याची मोहीम
त करावे असा निर्णय एकमताने घेण्यांत आला.
निदान २५ नवे सभासद जून अखेर पर्य
मेलनाबरोबर वि. सा. संघाचा रौप्यमहोत्सव
३. यंदा डिसेंबरमध्ये भरणाऱ्या वि. सा. सं
आला.
साजरा करावा असा निर्णय घेण्यांत
समिति " नेमण्यांत आली—
४. खालील सभासदांची " संस्कृत ग्रंथ
ती. प्रा. स. गो. सोमलवार, नागपूर.
प्रा. ग. त्र्यं. देशपांडे (आमंत्रक) अमराव
नेने, अमरावती.
प्रि. ह. ना

विदर्भ साहित्य संघाचे सभासद व्हा !

वि. सा. संघाचे सभासद वाढविण्याच्या मोहिमेवर
वि. सा. संघाच्या का. मं.
यांनी त्यांना सहकार्य यावें ही विनंती.

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104|Genl I A अन्वयें 'युगवाणी' मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९। ४२५ मुधोळकर [illegible] अमरावती. येथे प्रकाशित केलें.